## मगरमिठीत सापडलेला चेकोस्लोव्हाकिया




# माणूस

३१ ऑगस्ट १९६८ । चाळीस पैसे

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : चौदावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## क्षमस्व

★ १५ ऑगस्ट ऋणमुक्तता अंकात मो. ग. तपस्वी यांनी घेतलेल्या सहा मुलाखती प्रसिद्ध झालेल्या आहेत. यापैकी एक मुलाखत जनसंघ-नेते श्री. सुंदरसिंह भंडारी यांची आहे. 'अनवधानाने जनसंघनेत्यांचे नाव सुंदरसिंह भंडारी पडले आहे, ते स्वतंत्रसिंह कोठारी हवे' असे दिल्लीहून श्री. तपस्वी यांनी कळविले आहे.

★ २४ ऑगस्ट अंकात 'ऑगस्ट २४ ते ३०' या आठवड्याचे म्हणून दिले गेलेले राशिभविष्य संपूर्ण सप्टेंबर महिन्याचे आहे. त्यामुळे या अंकात भविष्य नाही.

**संपादक**

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कल्पित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# चेकोस्लोव्हाकिया

वा. दा. रानडे

चेकोस्लोव्हाकियात लोकशाहीवादी नेता डुबचेकची राजवट उलथून आपल्या तंत्राने चालणारी राजवट पुनः प्रस्थापित करण्यासाठी रशिया व पूर्व युरोपच्या चार राष्ट्रांच्या ७५ हजार सैनिकांनी २१ ऑगस्टला पहाट चेकोस्लोव्हाकियात आक्रमण केले आणि सर्व महत्त्वाची ठाणी घेतली. रशियाच्या या आक्रमणाने जगाला धक्का बसला. जगातील सर्व लोकशाही राष्ट्रांच्या नेत्यांनीच केवळ नव्हे तर युगोस्लाव्हिया व रुमानियाचे नेते, तसेच फ्रेंच व इटालियन कम्युनिस्ट पक्षांच्या नेत्यांनीही या आक्रमणाचा निषेध केला आहे. चेकोस्लोव्हाकियात लोकशाही सुधारणांचे नवे युग सुरू करणारे नेते अलेक्झांडर डुबचेक आणि अध्यक्ष लुडविग स्लोबोडा यांना अज्ञात स्थळी नेण्यात आले आहे. काही मंत्री युगोस्लाव्हियात गेले असून तेथून आम्ही लढा चालवू असे त्यांनी जाहीर केले आहे. रशियाचे हे आक्रमण जग निमूटपणे पाहणार की ते परत घ्यायला लावण्यासाठी कडक उपाय योजणार हे येत्या काही दिवसातच स्पष्ट होईल. गेल्या काही वर्षांतील आपल्या शांततावादी धोरणाने रशियन नेत्यांनी जगात जी सदिच्छा निर्माण केली होती, ती या आक्रमणाने धुळीस मिळाली असून केवळ रशियाचीच नव्हे तर जागतिक कम्युनिस्ट चळवळीची फार मोठी हानी झाली आहे.




स्वातंत्र्याची झेप

रशिया व पूर्व युरोपच्या चार राष्ट्रांनी चेकोस्लोव्हाकियाचा विश्वासघात केला आहे. सिओर्ना व ब्राटिस्लाव्हा येथील बैठकीनंतर चेकोस्लोव्हाकियाचा पेचप्रसंग तडजोडीने व वाटाघाटींनी मिटला असे वाटले होते. पण या दोन बैठकीतील निवेदने व करार म्हणजे चेक नेत्यांनी गाफील राहावे म्हणून दिलेली हुलकावणी होती की काय अशी शंका वॉर्सा करार राष्ट्रांनी केलेल्या पद्धतशीर आक्रमणावरून येते. डुबचेक यांचा विजय झाला, रशियाने नमते घेतले अशी या वाटाघाटींची प्रतिक्रिया जगभर झाली होती. त्यामुळेही रशिया व पूर्व युरोपचे नेते बेचैन झाले असावेत. डुबचेक यांनी सुरू केलेल्या लोकशाही प्रयोगाचे लोण आपल्याकडेही येईल. ती लाट थोपविणे कठीण जाईल, त्या लाटेत कदाचित आपण सत्तेवरून दूर फेकले जाऊ अशी भीती या नेत्यांना वाटली. डुबचेक अधिकारावर आल्यापासूनच ही भीती त्यांना वाटत होती. लष्करी संचलनाचे निमित्त करून लष्करी हस्तक्षेपाची धमकी त्यांनी दिलीही होती. सिओर्ना व ब्राटिस्लाव्हा वाटाघाटीत डुबचेक यांचा विजय झाला या प्रतिक्रियेने ही भीती अधिक दृढ झाली. कम्युनिस्ट भूमीमध्ये डुबचेक यांनी लावलेले लोकशाहीचे रोपटे वाढू लागण्यापूर्वीच उखडून टाकावे म्हणून रशिया व पूर्व युरोपच्या चार राष्ट्रांनी चेकोस्लोव्हाकियावर आक्रमण केले.

## चेकोस्लोव्हाकियाचे लष्करी महत्त्व

चेकोस्लोव्हाकिया आपल्याच तंत्राने चालणाऱ्या राजवटीखाली असला पाहिजे असे रशियन नेत्यांना वाटण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे वॉर्सा करार राष्ट्रांच्या लष्करी योजनेत चेकोस्लोव्हाकियाचे असलेले महत्त्व. चेकोस्लोव्हाकियातील पर्वतांवर रडार केंद्राचे जाळे उभारण्यात आलेले आहे. या केंद्रावरून पाश्चात्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवता येते. या केंद्रांवर आपले नियंत्रण रशियाला यासाठीच हवे आहे. चेकोस्लोव्हाकियात आपल्या काही फौजा ठेवण्याची मागणी रशियाने केली होती ती याच उद्देशाने. पण डुबचेक यांनी ही मागणी फेटाळली. डुबचेक नेते असेपर्यंत रशियाचे उद्देश साधणे शक्य नव्हते. म्हणून त्यांचे सरकार उलथून आपल्या बाजूचे सरकार प्रस्थापित करण्यासाठी रशियाने ही लष्करी मोहीम केली.

आपल्या लष्करी हस्तक्षेपाचे समर्थन करण्यासाठी नेहमीच्या सबबी रशियन नेत्यांनी पुढे केल्या आहेत. भांडवलदारी राष्ट्रांच्या मदतीने चेकोस्लोव्हाकियातील प्रतिक्रांतिकारकांनी केलेल्या हालचालींमुळे तेथील समाजवादी पद्धतीस धोका निर्माण झाला आहे. तेव्हा तेथील समाजवादी पद्धती टिकविण्यासाठी तेथील सरकारच्याच काही मंत्र्यांच्या विनंतीनुसार वॉर्सा करार राष्ट्रांच्या फौजा चेकोस्लोव्हाकियात गेल्या आहेत, असा प्रचार रशियन वृत्तसंस्थेने केला. पण यातले अक्षरही खरे नाही. चेकोस्लोव्हाकियाचे अध्यक्ष, पंतप्रधान व नॅशनल कौन्सिलचे सभासद यांना वॉर्सा करार राष्ट्रांच्या आक्रमणाची थोडीही पूर्वकल्पना नव्हती. रशियन हस्तक्षेपाची मागणी कोणी केली असेल तर ती पदच्युत अध्यक्ष नोव्होट्नीचे बाजूच्या लोकांनी केली असली पाहिजे हे उघड आहे. या अंदाजास दुसऱ्या एका बातमीन दुजोरा मिळतो. एका परदेशी विमानातून प्रागवर काही पत्रके टाकण्यात आली. नोव्होट्नी यांना एका गटाने पदच्युत केले असले तरी तेच अजूनही कायदेशीर अध्यक्ष आहेत असे या पत्रकात म्हटले आहे. हे पत्रके टाकणारे विमान वॉर्सा करार राष्ट्रांपैकीच एकाचे असले पाहिजे. पदच्युत अध्यक्ष नोव्होट्नी यांना पुनः अधिकारावर आणण्याच्या उद्देशानेच हे आक्रमण झालेले आहे. पूर्ण लोकशाही पद्धतीने नेत्याची निवड होऊन डुबचेक नेते झालेले आहेत ही वस्तुस्थिती आहे. असे असता लष्करी हस्तक्षेप करून नोव्होट्नींना किंवा त्यांच्या एखाद्या साथीदारास अधिकारावर आणणे हा लोकशाहीचा उघडउघड खून आहे.

चेकोस्लोव्हाक कम्युनिस्ट पक्षाची कॉंग्रेस ९ सप्टेंबरला भरावयाची होती. बहुसंख्य प्रतिनिधी डुबचेक गटाचेच निवडून आले असल्याने डुबचेक यांच्याच नव्या कार्यक्रमावर ही कॉंग्रेस शिक्कामोर्तब करणार हे उघड आहे. पक्षाच्या कॉंग्रेसमध्ये लोकशाही मार्गाने बहुमत मिळवून अधिकारावर येण्याची आशा नोव्होट्नी गटास वाटत नव्हती. तेथे नोव्होट्नी गटाचा पराभव झाल्यावर डुबचेक गटाचे वजन व

लोकप्रियता अधिकच वाढली असती. या काँग्रेसनंतर लष्करी हस्तक्षेप करण्याने रशिया अधिकच बदनाम झाला असता. म्हणून ही काँग्रेस भरण्यापूर्वीच आक्रमण करण्याचे रशियाने ठरविले असावे.

## तुलनात्मक लष्करी बळ

रशिया व पूर्व जर्मनी, पोलंड, हंगेरी आणि बल्गेरिया या पूर्व युरोपच्या चार राष्ट्रांनी चेकोस्लोव्हाकियावर आक्रमण केले आहे. पश्चिम जर्मनी व ऑस्ट्रियास लागून असलेली सीमा सोडली तर चेकोस्लोव्हाकिया बाकी सर्व बाजूंनी पूर्व जर्मनी, पोलंड, रशिया व हंगेरी या चार राष्ट्रांनी वेढलेला आहे. युगोस्लाव्हिया व रुमानिया ही चेकोस्लोव्हाकियाची मित्र राष्ट्रे पण त्यांच्या सीमा चेकोस्लोव्हाकियास भिडलेल्या नाहीत. मध्ये हंगेरी आहे तेव्हा त्यांना चेकोस्लोव्हाकियास सहज मदत पाठविणे कठीण आहे.

या संघर्षातील राष्ट्रांचे तुलनात्मक लष्करी सामर्थ्य पुढीलप्रमाणे आहे.

### वॉर्सा करार राष्ट्रे

**रशिया :** वीस लाख सेना, ३२ हजार रणगाडे, ८६ मोटराइज्ड रायफल डिव्हिजन.

**पूर्व जर्मनी :** ८५००० सेना, रणगाड्याच्या दोन डिव्हिजन्स ( रशियात शिक्षण घेतलेल्या ).

**पोलंड :** १,८५,००० सेना.

**हंगेरी :** ९५ हजार सेना

**बल्गेरिया :** १,२५,००० सेना.

### चेकोस्लोव्हाकिया व त्याचे मित्र

**चेकोस्लोव्हाकिया :** पावणे दोन लाख सेना, दहा पायदळ व चार चिलखती डिव्हिजन्स, थोडे हवाईदल.

**युगोस्लाव्हिया :** १,८०,००० सेना.

**रुमानिया :** १,५०,००० सेना.

वॉर्सा करार राष्ट्रांचे लष्करी सामर्थ्य कितीतरी पट मोठे आहे हे उघड आहे.

# डुबचेक

कम्युनिस्ट राष्ट्राचा नेता म्हटला की त्याच्या जवळपास शरीररक्षक नेहमी घोटाळत असावयाचे. बंद, पडदे लावलेल्या मोटारीतून तो जाणार. खेड्यातील त्याच्या निवासस्थानाभोवतीही नेहमी पहारा असणार या रूढ कल्पनेपेक्षा डुबचेक यांचे व्यक्तित्व अगदी निराळ्या प्रकारचे आहे. कोणतीही भीती न बाळगता लोकांमध्ये ते मोकळेपणाने मिसळतात. त्यांच्याशी बोलतात. त्यांना धूम्रपान किंवा मद्याचे व्यसन नाही. स्लोव्हाकियाची राजधानी ब्राटिस्लाव्हाजवळच्या खेड्यात त्यांचे साधे छोटेसे घर आहे. त्याच्या भिंती रंग द्यावयास झाल्या आहेत. पण अशा गोष्टींना ते फारसे महत्त्व देत नाहीत. बेल वाजविताच त्यांची पत्नी ॲना स्वतः दार उघडते. बाजारहाट ती स्वतः करते. तिला त्यात काही कमीपणा वाटत नाही. डुबचेक जुनीच मोटार वापरतात. पेट्रोल संपले की ते भरून घेण्यासाठी इतरांप्रमाणे रांगेत उभे राहतात व पेट्रोल भरताच त्याचे पैसे लागलीच स्वतःच्या खिशातून देतात.

डुबचेकना पोहण्याची आवड आहे. राजधानीत विशेष महत्त्वाचे काम नसले की आठवडाअखेर ते खेड्यातील आपल्या घरी मोटारने जातात. तेथील सार्वजनिक तलावावर पोहायला जाऊन आकर्षक सूर मारतात. पोहणे झाल्यावर ते जमिनीवर आराम करतात. त्या वेळी त्यांची सही घेण्यासाठी मुले त्यांच्याभोवती नेहमीच गर्दी करतात.

डुबचेक यांनी जो लोकशाही सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला आहे त्याचा फायदा प्रतिक्रांतिकारक घेतील व डुबचेकना पदच्युत करून आपल्या हाती सत्ता घेतील अशी भीती रशियन नेत्यांना वाटत होती, म्हणून डुबचेक यांनी हा कार्यक्रम सोडावा यासाठी सर्व प्रकारचे दडपण रशियन नेते आणीत होते. पण त्याचा उलटाच परिणाम झाला. सबंध राष्ट्र डुबचेक यांच्या पाठीशी उभे राहिले व त्यांचे नेतृत्व अधिकच ठाम, निश्चयी व स्थिर झाले. "सर्व कम्युनिस्ट डुबचेकसारखे असतील तर आम्हीही पक्षात सामील होऊ" असे प्रागमधील नागरिक म्हणू लागले. ही डुबचेक यांच्या यशस्वी नेतृत्वाची पावतीच म्हटली पाहिजे.

गेल्या जानेवारीत नोव्होट्नींचे जागी डुबचेक यांची नेता म्हणून निवड झाली. त्यापूर्वी त्यांच्यासंबंधी फारशी माहिती कोणास नव्हती. पण आता ते सर्वांना चांगले परिचित झाले आहेत. लोकांनी आपल्यावर विश्वास ठेवल्याबद्दल व आपल्याला पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी अनेकदा त्यांचे आभार मानले आहेत. जनतेने ज्याच्यावर विश्वास ठेवावा असा नेता चेक व स्लोव्हाक जनतेस १९३८ नंतर प्रथमच लाभला आहे.

अलेक्झांडर डुबचेक यांचे वडील स्टेव्ह डुबचेक पहिल्या महायुद्धापूर्वी अमेरिकेत

गेले होते. तेथे १९१७ साली ते कम्युनिस्ट धोरणाच्या इलिनोइस समाजवादी पक्षात सामील झाले. १९२१ साली ते परतले. अलेक्झांडरचा जन्म त्याच वर्षी नोव्हेंबरात उऱ्होवेक खेड्यात झाला. नंतर ते रशियास गेले. स्टेव्ह डुबचेक व तीनशे चेकोस्लोव्हाक नागरिकांनी सोव्हिएट आशियातील फ्रुंझजवळच्या 'इंटरहेल्प' सहकारी शेताचे सभासद झाले. किरगिझियामधील शाळेत अलेक्झांडर जाऊ लागला. तो सतरा वर्षांचा झाल्यावर डुबचेक कुटुंब स्वदेशी परतले आणि पश्चिम स्लोव्हाकियामधील ट्रेनसिन येथे स्थायिक झाले. पुढे १९५५ ते १९५८ या काळात मॉस्कोत रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीने चालविलेल्या राजकीय शाळेत अलेक्झांडरने शिक्षण घेतले. रशियन मन व रशियन संस्थांचा त्यास जवळून परिचय झाला. रशियाशी झालेल्या संघर्षात याचा त्याला फार उपयोग झाला.

## ब्रेझनेव्हना चोख उत्तर

डुबचेक यांच्याकडे नेतेपद आले तेव्हा प्रथमदर्शनी त्यांचा प्रभाव पडला नाही. आपले पहिले जाहीर भाषण त्यांनी अडखळत अडखळत वाचले. श्रोत्यांना ते कंटाळवाणे वाटले. त्यांचे सौम्य व्यक्तित्व म्हणजे कमकुवतपणा व लवचिकपणा म्हणजे ठामपणाचा अभाव अशी चुकीची समजूत रशियन नेत्यांनी करून घेतली होती. पण बाह्यतः सौम्य वाटणाऱ्या या नेत्याने आपल्या खंबीरपणाचा चांगलाच प्रत्यय रशियन नेत्यांना आणून दिला. मॉस्कोतील मेमधील वाटाघाटीचे वेळी डुबचेक यांच्या एक सहकाऱ्यास ब्रेझनेव्ह रागाने म्हणाले, "तुम्ही जे बोलत आहात त्याचा मार्क्सवादाशी काही संबंध नाही. ते मांडवलदारी तत्त्वज्ञान आहे व ते सांगण्याची ही जागा नव्हे". या वेळी डुबचेक ब्रेझनेव्हकडे सरळ रोखून पाहत म्हणाले, "लिओनिड इलिच, खऱ्या मार्क्सवादाचे पेटंट आपल्यालाच मिळाले आहे असा दावा करण्याचा कोणाला हक्क आहे का ?" ब्रेझनेव्हशी झालेल्या या शाब्दिक चकमकीनंतर डुबचेक यांच्यात एक नवा निर्धार त्यांच्या सहकाऱ्यांना दिसला.

डुबचेक अठराव्या वर्षी कम्युनिस्ट पक्षात सामील झाले. डुबनिका येथील स्कोडा कारखान्यात काही दिवस शिकाऊ कामगार म्हणून त्यांनी काम केले. युद्धानंतर ट्रेनसिन येथील दीस्ट कारखान्यात त्यांना काम मिळाले. छोट्या शहरांच्या राजकारणात ते भाग घेऊ लागले. बान्स्का बिस्ट्रिका येथील कम्युनिस्ट पक्षशाखेचे नेते म्हणून १९५३ मध्ये त्यांची निवड झाली. पाच वर्षांनी ते ब्राटिस्लाव्हा विभागाचे सेक्रेटरी झाले व आणखी पाच वर्षांनी म्हणजे १९६३ मध्ये स्लोव्हाक कम्युनिस्ट पक्षाचे पहिले चिटणीस म्हणून त्यांची निवड झाली. कोणाशी कसे वागावे, कोण आपले आदेश मोडण्याचा संभव आहे, पक्षयंत्रणेतून कामे कशी करून घ्यावीत याचा अनुभव छोट्या शहरातील या कार्यातून त्यांना मिळाला.

## स्लोव्हाक जनतेसाठी झगडा

डुबचेक स्लोव्हाक आहेत. चेकोस्लोव्हाकियात गेल्या वीस वर्षांत चेक नेत्यांचेच

वर्चस्व होते. डुबचेकचे निवडीने एका स्लोव्हाक नेत्यास प्रथमच राष्ट्राचे नेतेपद मिळाले आहे. स्लोव्हाक जनतेच्या हितासाठी ते अनेक वर्षे झगडले. स्लोव्हाकियास अधिक स्वायत्तता मिळावी यासाठी नोव्होट्नींशी त्यांनी प्रथम झगडा दिला. पण स्लोव्हाक जनतेची गाऱ्हाणी म्हणजे नोव्होट्नींच्या हुकूमशाही राजवटीखाली सबंध देशाला ज्या हालअपेष्टा भोगाव्या लागल्या त्याचाच एक भाग आहे असे त्यांना दिसून आले. सबंध देशात लोकशाही क्रांती झाल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही या निष्कर्षावर ते हळूहळू आले.

जर्मनांविरुद्ध १९४४ साली झालेल्या उठावात एक कम्युनिस्ट व स्लोव्हाक देशभक्त म्हणून त्यांनी भाग घेतला. त्यांच्या पायास दोनदा ज़खम झाली व त्यांचे बंधू ज्यूलियस ठार झाले. स्लोव्हाकियाच्या विकासासाठी अधिक प्रमाणात भांडवल गुंतविले गेले पाहिजे या मागणीसाठी त्यांनी नोव्होट्नीशी झगडा केला. नोव्होट्नीचे सत्तेस पहिले आव्हान ट्रेनसिनच्या पक्षशाखेने दिले हा केवळ योगायोग नव्हता तर त्यामागे डुबचेक यांचे नेतृत्व होते.

स्लोव्हाकियाच्या कम्युनिस्ट पक्षाचा पहिला चिटणीस या नात्याने स्वातंत्र्याचा लढा आणि लोकशाहीचा लढा यांची सांगड डुबचेक यांनी घातली. स्लोव्हाक लेखक व पत्रकारांना त्यांनी लेखनस्वातंत्र्य दिले. स्टालिनवादी राजवटीतल्या गुन्ह्यांवर ब्राटिस्लाव्हा येथील पत्रातून प्रथम टीकेची झोड उठली.

वास्तववादी डुबचेक आणि स्विटक, गोल्डस्टचुकर यासारखे सुधारणावादी विचारवंत यांच्यात सुरुवातीस बरेच अंतर होते. डुबचेकना स्वातंत्र्याचा खरा अर्थ कळला आहे की नाही अशी त्यांना शंका वाटत होती. स्वातंत्र्याच्या वाटेत डुबचेक सत्तेबाहेर फेकले जातील व आपल्यापकी कोणी नेता होईल असे त्यांचे भाकित होते.

हे भाकित खरे ठरते की काय असे सुरुवातीला वाटू लागले होते. मार्चमध्ये डुबचेक स्वस्थ बसले व घटना होतील तशा होऊ दिल्या. पत्रकारांना त्यांनी पूर्ण लेखनस्वातंत्र्य दिले. रेडिओ व टेलिव्हिजनने आपण होऊन स्टालिनवादाच्या धि:काराची मोहीम सुरू केली. युनियनची स्थापना व धोरण ठरविणे तुमच्या हाती आहे, पक्ष किंवा सरकार काही आदेश देणार नाही असे त्यांनी युनियन्सना सांगितले. कम्युनिस्ट पक्षाची कॉंग्रेस लौकर भरवा अशी सुधारणावाद्यांची मागणी होती. डुबचेकनी ती मान्य केली. नऊ सप्टेंबरला ही कॉंग्रेस भरावयाची होती पण आता रशियन आक्रमणानंतर खुल्या वातावरणात ती भरण्याची शक्यता नाही.

डुबचेक यांनी जनतेकडे पुढाकार दिला. लोक अतिरेकी प्रकार करणार नाहीत असा त्यांचा विश्वास होता. पण या धोरणाने प्रत्यक्षात डुबचेक यांच्या हाती अधिक सत्ता आली. रशियाने दडपण आणण्यास सुरुवात केल्यावर डुबचेक यांनी शांतपणे पुढे येऊन सूत्रे हाती घेतली. देश त्यांच्यामागे एकजुटीने उभा राहिला. डुबचेक हाच योग्य नेता अशी सुधारणावाद्यांचीही खात्री पटली.

"परिस्थिती अधिक गंभीर झाली की तिला तोंड देण्यासाठी डुबचेक यांची पाठ अधिक ताठ होते." अशा शब्दांत एका अमेरिकन वकिलाने त्यांचे वर्णन केले आहे. नेतेपद मिळाल्यावर डुबचेक यांचा विकास खंडित न होता पुढे चालूच राहिला. पहिले जाहीर भाषण त्यांनी अडखळत वाचले असेल. पण त्यांची अलीकडची टेलिव्हिजनवरील भाषणे अत्यंत प्रभावी होती. भाषणात ते मार्मिक विनोदाची पखरणही करू लागले. नुकतेच एका भाषणात ते म्हणाले, "पक्षाच्या नेतृत्वाबद्दल लोकांमध्ये असमाधान होते. लोक बदलणे शक्य नव्हते म्हणून त्यांनी नेतेच बदलून टाकले."

## स्वातंत्र्याचे, लोकशाहीचे वारे

डुबचेक नेते झाल्यापासून नोव्होट्नीच्या काळातील दहशतीचे, भीतीचे, संशयाचे, हुकूमशाहीचे वातावरण जाऊन स्वातंत्र्याचे, लोकशाहीचे वारे खळू लागले. इस्रायलशी राजकीय संबंध प्रस्थापित करावे अशी मागणी करणारा तीस हजार सह्यांचा अर्ज परराष्ट्र खात्याच्या कचेरीस सादर करण्यात आला. तेव्हा त्यांच्या प्रतिनिधींना चहासाठी व सरकारी धोरणाची चर्चा करण्यासाठी परराष्ट्र कचेरीत बोलावण्यात आले. सभांमधून कोणतीही भीती न बाळगता धीटपणाने प्रश्न विचारले जातात. मोराव्हस्का येथील सभेत एका मुलीने प्रश्न विचारला, "'डॉक्टर झिवागो' चित्रपट आम्हांला का दाखविला जात नाही?" नोव्होट्नीच्या राजवटीत अशी दृश्ये कधी दिसली नाहीत. कोणी प्रश्न विचारले, मतभेद दर्शविले की लागलीच त्यांना दडपून टाकण्यात येई.

प्रवासावरील निर्बंध गेल्याने दोन्ही बाजूंनी प्रवाशांची वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली. कस्टम अधिकारी सीमेवर त्रास देईनासे झाले, परदेशी प्रवाशांच्या सामानाकडे ते नुसती दृष्टी टाकीत व सामान न तपासताच त्यांना जाऊ देत. पासपोर्ट व व्हिसा मिळविण्यासाठी तासन्तास ताटकळत राहावे लागत नसे. पश्चिम युरोपात सुटी घालविण्यासाठी निघालेल्या चेकोस्लोव्हाक प्रवाशांची सीमेवरील ठाण्यांवर गर्दी झालेली दिसे. पोलीस ओळखू यावेत यासाठी त्यांना फिती दिल्या गेल्या. कम्युनिस्ट राष्ट्रात एकट्या चेकोस्लोव्हाकियानेच ही सुधारणा केली.

रेडिओवरील निर्बंध गेल्याने रेडिओ ऐकण्याबद्दल लोकांमध्ये कमालीची उत्सुकता आढळते. संध्याकाळी सात वाजता बातम्या असतात. त्या चुकू नयेत यासाठी अनेकांनी जेवणाची वेळ एक तास अलीकडे ओढली. नोव्होट्नी राजवटीतील जुलमाची कोणती नवी गोष्ट आज उघडकीस आणली जाते हे जाणण्याची त्यांना उत्सुकता असे. पाश्चात्य रेडिओ कार्यक्रम ऐकण्यात सरकार अडथळे (जॉमिंग) आणते अशी तक्रार एका श्रोत्याने नुकतीच प्राग रेडिओकडे केली. रेडिओवर लागलीच संस्कृती खात्याचे मंत्री मिरोस्लाव्ह गेलुस्का यांनी दिलगिरी व्यक्त केली व अडथळे आणले जाणार नाहीत असे जाहीर केले.

लेखक व वृत्तपत्रांना बरेच लेखनस्वातंत्र्य मिळाले आहे. दडपशाहीला विटून परदेशात गेलेले लेखक परत येऊन स्थायिक होत आहेत. लेडिस्लाव्ह नॅको हे प्रमुख लेखक परत आले असून एका कम्युनिस्ट नेत्याच्या अध:पातावर त्यांनी लिहिलेली 'सत्तेची चव' (दि टेस्ट ऑफ पॉवर) ही कादंबरी चेकोस्लाव्हाकियात प्रथमच प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

## टप्प्याटप्प्याने सुधारणा

वृत्तपत्रांवरील सर्वच निर्बंध उठलेले नाहीत. 'सरकारी गुपिते' म्हणून बारा हजार विषयांची यादी करण्यात आली असून त्यासंबंधी लिहिण्यास वृत्तपत्रांना बंदी आहे. मांसाची किंमत, सुताचा भाव यासारखे निरुपद्रवी विषय यात आहेत. ही दुसऱ्या स्वरूपातील सेन्सॉरशिपच आहे असे अनेक संपादकांना वाटते. पण परि-स्थितीवरचे आपले नियंत्रण कायम ठेवून लोकशाही व स्वातंत्र्याची कक्षा हळू हळू वाढवावी असे डुबचेक यांचे धोरण असावे. आपल्या सुधारणांचा गैरफायदा घेतला जाऊन देशात भांडवलशाही यावी असे त्यांना वाटत नाही. लोकशाहीकरणाचा कार्यक्रम ते अतिशय जागरूकपणे टप्प्याटप्प्यान अंमलात आणू पाहत होते.

आपल्या मुख्य भूमिकेच्या बाबतीत डुबचेक यांनी रशियन नेत्यांपुढे माघार घेतली नाही हे खरे. पण सिओर्ना येथील वाटाघाटींहून रशियन नेते अगदीच रिकाम्या हाताने परतले नाहीत. त्यांनी काही सवलती मिळविल्या. वॉर्सा करार व कोमिकॉन (पूर्व युरोपीय राष्ट्रांची आर्थिक संघटना) बळकट करण्यासाठी सहकार्य करण्याचे डुबचेक यांनी मान्य केले. वृत्तपत्रांतून रशियाविरोधी व कम्युनिझम-विरोधी प्रचार मोहीम थांबविण्याचेही त्यांनी आश्वासन दिले आणि पश्चिम जर्मनीशी राजकीय संबंध जोडण्याचा विचार तूर्त रद्द केला. या सवलतींनी आपले समाधान झाल्याचे रशियाने दाखविले खरे. पण खरोखर रशियाचे समाधान झाले नव्हते हेच त्यांच्या नव्या आक्रमणाने उघड झाले.

पाश्चात्य लोकशाही राष्ट्रांप्रमाणे अनेक पक्षपद्धतीचा अवलंब डुबचेक एवढ्यातच करणार नाहीत. अधिकारारूढ संयुक्त आघाडीतील पक्षापलीकडे नव्या कोणत्याही पक्षाला मान्यता दिली जाणार नाही हे स्पष्ट करण्यात आले आहे. अनेक पक्ष-पद्धतींपेक्षा कम्युनिस्ट पक्षातच अंतर्गत लोकशाही अधिक कशी आणता येईल या दृष्टीने उपाय योजण्यावर डुबचेक यांचा अधिक भर दिसतो. पक्षातील निवडणुका गुप्त मतदानाने व्हाव्यात. एकाच व्यक्तीने दोन महत्त्वाच्या पदांवर उभे राहू नये या सूचना त्याच दृष्टीने करण्यात आल्या आहेत.

## नवा कार्यक्रम

चेकोस्लोव्हाक कम्युनिस्ट पक्षाने गेल्या एप्रिलमध्ये २४००० शब्दांचा कार्यक्रम प्रसिद्ध केला. वॉर्सा कराराशी सहकार्य राहील पण वॉर्सा कराराचे धोरण केवळ

[पृष्ठ ५८ वर]



# ग्यानबाचं गुऱ्हाळ

## ‘ बरसात ’ में हमसे मिले तुम....

नाटक हे संसाराचे चित्र आहे असे म्हणतात. नाटकाचा परिणाम पुढे भलताच वाढला. इतका की, संसार हे नाटकाचे चित्र आहे असे म्हणण्याचा मोह गडकऱ्यांना झाला. नाटकाची जागा हल्ली सिनेमाने-विशेषत: हिंदी सिनेमाने घेतली आहे. सिनेमात जीवनाचे प्रतिबिंब पडण्याऐवजी जीवनातच सिनेमाची प्रतिबिंबे पडू लागली आहेत. परवा मुंबईला भर पावसात घडलेला एक प्रसंग माहीत आहे ना ? दोन-तीन आठवड्यापूर्वीची गोष्ट आहे. भर दुपारी पावसाने मुंबईला झोडपून काढले होते, पण धोबीतलावाच्या आसपास मात्र भर पावसात एक नाट्यपूर्ण प्रसंगाने लोकांची चांगली करमणूक होत होती. कारण ‘ बरसात ’ चित्रपटातला प्रसंग त्यांच्या डोळ्यासमोर प्रत्यक्ष घडत होता.

म्हणजे गंमत काय झाली-आझाद मैदानावर मेट्रो थिएटरच्या दिशेने एक तरुण व तरुणी हातात हात घालून येत होती. मुसळधार पावसात दोघेही भिजत होती. भोवतालच्या वातावरणाची त्यांना कसलीही फिकीर नव्हती. ‘ बरसात ’ चित्रपटातले ‘ बरसातमें-हमसे मिले तुम तो सजन, तुमसे मिले हम ’ हे लोकप्रिय गीत ही जोडी तन्मयतेने गात चालली होती. दृश्य अपूर्व ! तिकीट काढून पाहू म्हटले तरी पाहायला मिळणार नाही असे. मग काय विचारता महाराज ! हा अपूर्व देखावा पाहण्यासाठी शाळा-कॉलेजातले तरुण तरुणी जागीच थबकले. मार्केटकडे चाललेले व्यापारी थांबले. सगळेच थांबले. पांच मिनिटात हा ‘ शीन ’ बघायला गर्दीच गर्दी झाली. थोड्या वेळाने या कबूतराच्या जोडीच्या ध्यानात आले की ही गर्दी आपल्यासाठीच जमलेली आहे. तेव्हा दोघेही ओशाळले म्हणे आणि मिळेल ती टॅक्सी पकडून तेथून पसार झाले. हे जिवंत नाट्य इतक्या लवकर संपावे याची चुटपूट प्रेक्षकांना लागून राहिली.

वृत्तपत्रात आलेली ही बातमी वाचली. मन कसे प्रसन्न झाले. ‘ मृच्छकटिक ’ नाटकात ‘ वसंतसेना ’ भिजत भिजत चारुदत्ताला भेटायला येते. अंगे भिजली जलधारांनी । ऐशा ललना स्वय येउनि । आलिंगिती ज्या पुरुषा लागुनि । तेचि पुरुष भाग्याचे । असे तेव्हाचे वर्णन आहे. वसंतसेनेच्या भूमिकेत बालगंधर्व रंगमंचावर

येत आणि त्या वेळचे लोक मिटक्या मारीत ही भिजलेली खोटी वसंतसेना पाहत. आता जमाना बदललेला आहे. आता स्त्रीपार्टीची गरज काय ? अन् रंगभूमीवरचे खोटे भिजणे तरी कशाला पाहिजे ? प्रत्यक्ष जिवंत दृश्य पाहा आणि नेत्राचे पारणे फेडा. फार चुटपुट लागली हो ! नुसते वर्तमानपत्रातले वर्णन वाचले. असला रम्य देखावा प्रत्यक्ष पाहायला हवे होते ! 'त्याचे भाग्य विशेष, दुर्लभ जगी तो योग त्याला घडे।' असे कवीने म्हटलेच आहे. असा दुर्लभ योग क्वचित येतो. गेला तो चान्स. आता त्याचे काय ! . . .

## 'तीन मूर्ती'चा वाद

दिल्लीत एक नवीनच वाद मधू लिमये यांनी उकरून काढला. या समाजवादी लोकांना काही उद्योग नाही का हो ? आता 'तीन मूर्ती' प्रकरणच घ्या. नव्या दिल्लीतली एक प्रासादतुल्य इमारत. स्वातंत्र्यापूर्वी भारताचे (ब्रिटिश) सरसेनानी तेथे रहात. स्वातंत्र्य मिळाल्यावर हा ब्लॉक रिकामा झाला आणि पंडित नेहरू तेथे रहायला गेले. या बंगल्याच्या समोर तीन मूर्तीचा एक पुतळा आहे. म्हणून या राजवाड्याला तीन मूर्ती म्हणतात. [आम्ही एकदा दिल्लीत समक्ष हा राजवाडा पाहिला म्हणून हे कळले. तोपर्यंत आमची समजूत निराळीच होती. पंडित नेहरू, त्यांचे गुलाबाचे फूल आणि इंदिराबाई यांना उद्देशून हे नाव दिलेले आहे ही आमची कल्पना. असो.] हा प्रासाद आणि त्याच्या भोवतालचे उद्यान दोन्ही प्रचंड आहेत. पंडित नेहरू स्वतःच सांगत होते की, अगदी ऐसपैस राहूनसुद्धा या राजवाड्यातल्या कित्येक खोल्या रिकाम्याच राहतात म्हणून. पुढे पंडितजी गेले. त्यांचे निवासस्थान पुढे खरे म्हणजे लालबहादूर शास्त्रींना द्यायचे, पण ते न देता नेहरूंच्या नावाने तेथे एक 'वस्तु संग्रहालय' काढण्यात आले. पंडितजी पंतप्रधान म्हणून ज्या वास्तूत वावरले त्या ठिकाणी दुसऱ्या कुणीतरी पंतप्रधान म्हणून राहावे ही कल्पनाच कशीशी वाटते नाही ? कॉंग्रेसवाल्यांना तर ती गोष्ट आवडणे कधीच शक्य नव्हते. म्हणून शास्त्रीजी बिचारे आपल्या पहिल्याच घरी राहिले. पुढे शास्त्रीजी गेले, इंदिराबाई पंतप्रधान झाल्या. त्यांचे आसनही पक्के झाले. त्या 'तीन मूर्ती'त पूर्वी पंतप्रधानांची लेक म्हणून राहातच होत्या. आता पंतप्रधान म्हणून त्या कदाचित पुन्हा तेथे राहायला जातील. परवाच त्यांच्या गैरहजरीत मोरारजीभाईंनी मंत्रिमंडळाची बैठक घेतली. या बैठकीत पंतप्रधानांनी 'तीन मूर्ती' प्रासादात राहावे असा ठराव करण्यात आला. सर्व मंत्रिमंडळाचा एकमुखी निर्णय, मनात नसले तरी इंदिराजींना तो अंमलात आणलाच पाहिजे.'

आता मला सांगा, समाजवादी पुढाऱ्यांना यात आपले नाक खुपसण्याचे काही कारण आहे का ? पण नाही ! जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही म्हणतात ते काही खोटे नाही. मधू लिमये यांनी भर लोकसभेत असा आरोप केला की, इंदिरा-

बाईंनाच हा वाडा रहायला हवा होता. आणि, त्यांना खूप करून आपले मंत्रिमंडळातले स्थान पक्के करण्यासाठी मोरारजींनी हा उद्योग केलेला आहे. म्हणजे आता कमाल आहे की नाही ?

आपले तर असे स्वच्छ मत आहे की, इंदिराजींनी शक्य तितक्या लवकर आपले सध्याचे बिऱ्हाड मोडावे आणि नव्या घरात रहायला जावे. लालबहादूर शास्त्री हा गरीब माणूस होता. एवढ्याशा टीचभर जागेत राहायची त्यांना पहिल्यापासून सवय. त्यांना हा महाल मुळीच शोभला नसता. एवढीशी मूर्ती आणि प्रचंड राजवाडा. तुम्हीच कल्पना करा. हिंडता हिंडता राजवाड्यातल्या दालनात तेच कुठेतरी चुकले असते आणि त्यांचा शोध करताकरता नोकर चाकरांच्या नाकी नऊ आले असते, ते तिथे राहिले नाहीत हेच छान झाले ! पण इंदिराबाईंची गोष्ट तशी नाही. त्या तिथे राहिलेल्या आहेत. वावरलेल्या आहेत. पंडितजी हयात असताना त्यांना दुसरे काही कामही नव्हते. त्या वेळी त्या या वाड्यात, उद्यानात खूप हिंडलेल्या असणार. वाड्याचा कोपरान् कोपरा त्यांना ठाऊक असणार. मग माहीतगार माणसाने ह्या वाड्यात राहावे हे मोरारजीभाईंचे म्हणणे असलें तर त्यात चूक काय ? आणखी एक गोष्ट मोरारजीभाईंच्या ध्यानात आली असली पाहिजे. इंदिराबाईंचे कुटुंब तीन माणसांचे आहे. त्या आणि त्यांची राजीव-संजीव ही दोन मुले. त्याही दृष्टीने 'तीन मूर्ती'त त्यांनी राहणे अगदी उचित होणार नाही काय ? [त्यांच्या कुठल्यातरी एका मुलाचे लग्न झाले आहे आणि एक इटालियन सूनबाई घरात आल्या आहेत ही गोष्ट खरी. पण तो विस्तार झाला. मूळ कुटुंब तीन मूर्तींचेच.]

आणखीही एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. 'जातीच्या सुंदरांना काहीही शोभते' असे महाकवी कालीदासाने म्हटले असले तरी म्हणू द्या. सुंदर वस्तूंना चौकटही सुंदर पाहिजे. ('चौकट' शब्द जरा रुक्ष झाला का ? मग 'कोंदण' म्हणा हवं तर.) तीन मूर्ती भवन सुंदर आहे. त्याभोवतालचे उद्यान मनोहर आहे. म्हणून पंडितजींसारखा देखणा पुरुष त्या ठिकाणी शोभून दिसला. शास्त्रीजी शोभण्यासारखे नव्हतेच. इंदिरादेवीही आपल्या पित्याला शोभेल अशाच आहेत. अत्यंत आकर्षक व्यक्तिमत्त्व असलेल्या माणसाने तितक्याच आकर्षक ठिकाणी


# शिलंगणाचे सोने

ब. मो. पुरंदरे

आवृत्ती समाप्त

मुक्काम ठोकला पाहिजे. दिसायला बरे दिसते. रामराव आणि लक्ष्मीबाई चाळीत शोभतात. आणखी कोणी बंगल्यातच शोभून दिसतात. मग या तर भारताच्या पंत-प्रधान इंदिरादेवी. त्यांना हेच घर शोभेल. देवीजी, उठा. ' चल लगबग शुभ घटिका '......

# संतति–नियमनासाठी नवा उपाय

'संतति–नियमन' या प्रकारालाच प्रौढ भाषेत हल्ली 'कुटुंब नियोजन' असे म्हणतात. आपल्या देशात लोकसंख्या बेसुमार वाढली आहे हे कोण नाकारील ? ही संख्या कशी थोपवावी हाच एक प्रश्न विचारवंतांसमोर उभा आहे म्हणतात. आता सरकारनेच ही मोहीम हाती घेतलेली आहे. त्यामुळेच ही योजना यशस्वी होईल की नाही अशी धास्ती शाहण्या मंडळींना पडली आहे. गोळ्या काय, लूप काय, शस्त्रक्रिया शिबीर काय नुसता घूमघडाका मध्यंतरी उडाला होता. लूप प्रकरणे तर फारच गाजली. इतकी की त्यांच्या प्रचारकांच्या तोंडाला कुलूप बसले. 'कुटुंब लहान, सुख महान' असल्या घोषणाही खेड्यापाड्यातल्या भितीपर्यंत जाऊन पोचल्या. पण त्याचा अर्थ समजावून सांगण्याची तसदी कुणी घेतली नाही. [एका प्रचारकाने तर या समारंभात भाग घेऊन भाषणही ठोकले. 'कुटुंब लहान तर सुख महान' ही घोषणा आपल्याला तंतोतंत पटली असल्याचे त्यांनी प्रतिज्ञेवर सांगितले. या कार्यकर्त्याला पाच पोरे आणि चार पोरी होत्या. हे काय गौडबंगाल आहे ते लोकांना कळेना. सरकारी अधिकाऱ्यांनाही कळले नाही. त्याने सहज त्यांच्या भाषणाबद्दल खुलासा विचारला. मुलांच्या संख्येचा आणि या घोषणेचा संबंध आहे हे यांच्या गावीही नव्हते. त्यांनी बायकांच्या घोळक्यात पदर डोक्यावर घेऊन मर्यादेने उभ्या राहिलेल्या आपल्या बुटक्या बायकोकडे हात केला. "म्हनून तर म्हंतो मी–ते म्हणाले, " कुटुम्ब ल्हान तर सुख म्हान हे मला आनुभवानं पट-लेलं आहे !"......असो. ]

सांगण्याचा मुद्दा असा की, संतति-नियमनाचा गाजावाजा फार झाला. शिबिर तर गावोगाव झाली. नाही त्या माणसावरही शस्त्रक्रिया झाल्या. त्यातून ब्रह्मचारीही सुटले नाहीत. हे सगळे आजच का आठवले ? परवाच वर्तमानपत्रात एक बातमी वाचली. केरळ आयुर्वेद मंडळाच्या अधिवेशनाची बातमी होती. या अधिवेशनात भाग घेणाऱ्या वैद्यांनी या बाबत आपले मत मांडले आहे. ते म्हणतात की, सशाचे रक्त आणि बुटी मोनोस्पर्माच्या फुलांचा रस यांचे मिश्रण बाईला द्यावे. किंवा 'हिबिस्कस रोजा सिन्युएन्सस'च्या फुलांचा रस आणि लिंबाचा रस यांचे मिश्रण बाईला द्यावे. हे मिश्रण प्राशन केले तर स्त्रीला कायमचे वंध्यत्व येईल असे त्यांचे म्हणणे आहे.

केरळच्या वैद्यराजांनी हा जो शोध जाहीर केला आहे तो स्वागतार्ह आहे. आपले सरकार त्याचा लाभ घेईलच. पण माझ्यासारख्या माणसाला प्रश्न पडतो तो असा की, हे सगळे कसे काय जमणार ? सशाचे रक्त जर संतति-नियमनासाठी हवे असेल तर ते भरपूर मिळवावे लागेल. म्हणजच माणसांची पैदास कमी करायची असेल तर सशांची पैदास वाढवावी लागेल. ससा हा फारच खादाड प्राणी आहे म्हणतात. म्हणजे त्यांच्या वाढत्या खाद्याचीही सोय आपल्याला करावी लागेल की काय ? अन् तशी ती लागणार असेल तर मग माणसांच्याच खाद्याची –अन्नधान्याची पैदास वाढवणे जास्त शहाणपणाचे नाही काय ? माणसे रोग्यांना वाचवण्यासाठी रक्तदान करतात. उद्या माणसांची ही अडचण दूर करावी म्हणन ससे रक्तदान करण्यासाठी लाईनमध्ये उभे आहेत हे चित्र कल्पनेने डोळ्यापुढे उभे करा पाहू. अंगावर रोमांच उभे राहतात की नाही ?

आणि याचा परिणाम काय तर कायमचे वंध्यापण. म्हणजे जन्मात पुन्हा पोरे होण्याची आशा नाही. संततीचे नियमन करणे निराळे आणि अजिबात प्रसूतीकळाच काढून टाकणे वेगळे. छे: छे: ! सशाच्या रक्तात इतके धोकेबाज गुणधर्म असतील हे कधी आपल्या टाळक्यातही आले नव्हते. ससा हा प्राणी गरीब ना ! इसापनीतिसारख्या पुस्तकात त्याच्या कितीतरी गरीबपणाच्या गोष्टी आपण वाचल्या आहेत ! मग ही अवदसा त्याला कुठून आठवली ? जाऊ द्या झाले. सध्या सरकारची आणि देशाची अवस्थाच अशी आहे की, कुणीही काही नवीन सुचवावे आणि त्याचा प्रयोग करून पाहावा. इतके दिवस माणसावर प्रयोग झाले. आता प्राण्यावर संक्रात आली आहे. आता उद्या सशावरचे बाळगीत असे असेल काय ?

**एक होता ससा । एक होता ससा**
**पांढऱ्या पांढऱ्या कापसाचा । छोटा ढोंग जसा**
**ससुल्या हळूच येतो । हॉस्पिटलमध्ये जातो**
**रक्तदाना फिरतो । मुलेच बंद करतो**
**नियोजनाचा असा । प्रचार करतो ससा**

## पुण्यातील ‘मटका मारुती’ प्रकरण

पुण्यात ‘मटका मारुती’ या नवीन मारुतीची स्थापना झाली आहे असे परवा कुणीतरी मला सांगितले तेव्हा मला मुळीच आश्चर्य वाटले नाही. मारुतीचे अवतार पुण्यात व्हायचे नाहीत तर कोठे व्हायचे ? पुण्याचा आणि मारुतीचा संबंध फार जुना आहे. पुण्यात भांग्या मारुती आहे. भिकारदास मारुती आहे. छिनाल बालाजी आणि दाढीवाला दत्त आहे. पासोड्या विठोबा आहे आणि निवडुंग्या विठोबाही आहे. मग मारुतीचेच वेगवेगळे प्रकार का नसावेत ? मागे म्युनिसि-

पालटीच्या सभत सारख्या तहकुबीच्या सूचना येऊन सभा तहकूब होत. म्हणून विश्रामबागवाड्याच्या समोर एक 'तहकुब्या मारुती' स्थापन करण्याचा बूटही निघाला होता. त्याचा प्रत्यक्षात अवतार झाला की नाही ते समजले नाही. पण कल्पना उत्तम होती. माणसांच्या गरजेनुसार आणि आवश्यकतेनुसार देवांचे अवतार झाले पाहिजेत की नकोत ? रावणाला मारण्यासाठी रामाची गरज. कंसाला मारण्यासाठी कृष्णाची आवश्यकता. जुन्या काळात जुन्या पद्धतीने अवतार झाले. आज माणसांच्या गरजा बदलल्या आहेत. आज तहकुबीचे तत्त्व आणि महत्त्व लोकशाहीत मान्यता पावले असेल तर तहकुब्या मारुतीचा अवतार होणे ही गरजच आहे.

मटक्या मारुतीचे मी त्या दृष्टीनेच स्वागत करतो. आजचा काळ हा मटक्याचा आहे. मटका दिल्याशिवाय चांगल्या वर्तमानपत्रांचे भागत नाही. मग बिचाऱ्या मारुतीनेच असे काय पाप केले आहे ? मटक्याचा एकूण कारभार व्यवस्थित चालावा यासाठी एखाद्या स्वतंत्र मारुतीची अपॉइंटमेंट झाली तर त्यात बिघडले कोठे ? मी तर याच्यापुढे जाऊन म्हणणार आहे की मारुतीची राष्ट्राला आवश्यकता आहे. पुण्याला वीर मारुती आहे, तसाच दास मारुतीही आहे. असेच वेगवेगळे हनुमंत वेगवेगळ्या ठिकाणी स्थापन झाले तर काय हरकत आहे ? उदाहरणार्थ आपण असे समजू या की, मौजे टगेवाडी या ठिकाणी एका मारुतीची स्थापना करायची आहे. त्यासंबंधीची बातमी उद्या वर्तमानपत्रात अशी आली तर किती उत्कृष्ट होईल—

## टगेवाडीत 'टग्या मारुती'चा उदय

"......मौजे टगेवाडी हे गाव इतिहास काळापासून टगेपणाबद्दल प्रसिद्ध आहे. येथील टगे एकापेक्षा एक नामांकित आहेत. येथील काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात परवाच बजरंगबलीची स्थापना करण्यात आली. तिला 'टग्या मारुती' हे सार्थ नाव मारुतीच्या उद्घाटनप्रसंगी गृहकलहनिर्माणमंत्र्यांनी दिले. दर शनिवारी एकातरी विरोधकाला या मारुतीपुढे आणून बेदम चोपायचे असे समस्त टगेवाडीच्या पुढाऱ्यांनी ठरवले आहे. टग्या मारुतीची मूर्ती इतर मूर्तीप्रमाणेच आहे. फक्त त्याच्या डोक्यावर पांढरी टोपी असून उजव्या हातात त्याने परमिट धारण केले आहे. शेपटीबद्दल लोकांच्या तक्रार अर्जांची भेंडोळी गुंडाळलेली असून हे अर्ज लागेल तेवढे असल्यामुळे मारुतीचे शेपूट कितीही लांबवता येण्याची सोय आहे. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या मोटारीवर पुढच्या बॉनेटवर त्याची स्थापना केलेली आहे. या अप्रतिम कौशल्याबद्दल मूर्तिकार सुदामराव रोडगे यांचा मंत्र्याच्या हस्ते या प्रसंगी सत्कारही करण्यात आला. मूर्तीच्या दर्शनासाठी आबालवृद्ध सोडून बाकी सगळ्यांची रीघ लागली आहे..."

# लालवाडीत भाई मारुतीची स्थापना

"...लालवाडीत काल रोजी जागतिक कामगार क्रांतिदिनामित्त येथील भाई आणि ताई यांनी भाई मारुतीची स्थापना पार्टीच्या ऑफिसजवळ केली आहे. लालवाडीत तसे अनेक मारुती पूर्वीचे आहेतच. पण ते सर्व 'बूर्ज्वा' असल्याचे पार्टीचे मत आहे. हा मारुती मात्र साम्यवादी प्रकृतीचा आहे. त्याच्या एका हातात म्युनिसिपालिटीचा झाडू आहे तर छातीवर हृदयाच्या ठिकाणी 'संप' ही अक्षरे खोदलेली आहेत. हा मारुती बोडकाच असला तरी त्याच्या झिज्या कपाळावर आलेल्या आहेत. याच्या हाताच्या मुठी वळलेल्या दिसतात. सभेत भाषण करण्याच्या तयारीत असलेल्या वक्त्याप्रमाणे याचा पवित्रा आहे. या मारुतीला 'कॉम्रेड मारुती' म्हणावे अशी सूचना प्रथम करण्यात आली होती. पण ती उजव्या गटाच्या मॉस्कोवादी भाईंनी केल्यामुळे डाव्या गटाच्या भगतगणांनी तिला कडाडून विरोध केला. त्यामुळे तेथेच दोन्ही गटांचे तुंबळ युद्ध होऊन एक मारुती सोडून बाकी सगळ्यांची डोकी फुटली. शेवटी निरुपायाने तडजोड होऊन याला 'भाई मारुती' असे संबोधण्याचे ठरले. दर शनिवारी याला मॉस्कोहून आणलेले तेल घालण्यात येणार असून सकाळ–संध्याकाळ 'कॅपिटॉल–स्तोत्र' म्हणण्यात येणार आहे असे एका भाईच्या बोलण्यावरून समजते. पुढील वर्षी या मारुतोला रशिया भेटीचे निमंत्रण आले असून पुढील हिवाळ्यात 'भाई मारुती' रशियाला रवानाही होतील असे खात्रीलायक वृत्त आहे .."

असे कितीतरी मारुती निर्माण होण्यासारखे आहेत. सहकारी बँकेच्या दिवाणखान्यात 'सहकार मारुती', समाजवादी पुढाऱ्यांच्या घराजवळ 'साथी मारुती', स्वतंत्र पार्टीच्या ऑफिसमध्ये 'इंडिपेंडंट मारुती', मंगल कार्यालयात 'वाशिंग मारुती'–अनेक मारुतींची गरज आहे. कुणी या उद्योगाला वाहून घेईल काय ?—



व्यं. न. कुलकर्णी

# रस्त्यावरचं 'फॉरेन एक्स्चेंज!'

"पैसा रस्त्यावरही पडलेला असतो, तो पाहायला डोळे उघडे ठेवा आणि उचलायला खाली वाकण्याचे श्रम घ्या!"

हाम्बुर्ग (प. जर्मनी) येथील "हांबुर्गर आबंडब्लाट्" या दैनिकानं एकदा वरील घोषवाक्यावर एक प्रात्यक्षिकच आखलं होतं. त्या वृत्तपत्रानं प्रत्येक रविवारी हाम्बुर्ग शहरातील लहान-मोठ्या रस्त्यावर नाण्यांच्या आकाराच्या हजार-पाचशे सुंदर चकत्या टाकायचं ठरविलं. या योजनेची चिक्कार जाहिरातही केली. जो कोणी चकत्या आणून देईल त्याला त्या चकतीवर छापलेल्या किमतीची खरी नाणी बक्षीस! योजना खूप गाजली, लोकांना खरोखरीचे पैसे मिळाले. अगोदरच तीन लाख खपाच्या घरातल्या त्या वृत्तपत्राला आणखी अनेक सहस्र नवे वाचक निश्चितच मिळाले असणार!

अप्रत्यक्षपणे जनतेला जुनंच तत्त्वज्ञान नव्या पद्धतीनं शिकविण्यात वृत्तपत्र यशस्वी ठरलं. रस्त्यावर पैसा पडलेला असतो हे सांगत सांगत या वृत्तपत्रानं हसत-खेळत स्वतःचा खप—रस्त्यावरचाही वाढविला—रस्त्यावरचा पैसा गोळा केला!

जर्मनीत असताना मी अनेकदा स्वीडनला गेलो होतो. त्यामुळं आता नक्की कोणत्या साली ते नक्की आठवत नाही. एका पार्टीच्या प्रसंगी एक कोटयाधीश भेटले. (आश्चर्य नको. तिकडे रस्तोरस्ती असे लक्ष्मीपुत्र पडलेले आहेत!) आदल्याच दिवशी भारतातून परत आले होते ते. अमाप उत्साहानं ते म्हणाले, "काय तो अजिंठा! काय ती वेरूळची लेणी! अन् ते महाबलिपुरम्. म्हैसूरची ती कोणती गार्डन बरं, हां हां "ब्रिंदाबन!" जयपुरसारखं दृष्ट लागण्यासारखं शहर. एक की दोन! तुमच्या हिंदुस्थानात शेकडोनी टूरिस्ट अॅट्रॅक्शन्स आहेत. अरे कोटी-कोटींनी तुमच्या देशाला टूरिस्ट येऊ शकतील अन् तुमचा देश हां हां म्हणता श्रीमान होऊ शकेल. पैसा तुमच्या देशात अक्षरशः रस्त्यावर पडलेला आहे! का उचलत नाही हे रस्त्यावरचं धन तुम्ही भारतीय?"

त्यांच्या प्रवासाची योजना एका खासगी प्रवासी-कंपनीने आखली होती. एक महिन्याचा विमान प्रवास. भारतातही अवश्य तेव्हा विमानाचा किंवा खासगी टूरिस्ट बसचा प्रवास. खर्च अवघा सहा हजार रुपये. कंपनीनं दोनही वेळेच्या

प्रवासाकरता एक विमान चार्टर करून ठेवलं होतं. जाहिरात केल्याबरोबर हा हा म्हणता विमानभर प्रवासी मिळाले. कंपनीला पुष्कळ फायदा झाला. थोडक्या खर्चात भारतातल्या रम्य स्थळांचं दर्शन घेता आलं म्हणून टूरिस्ट मंडळीही खूष. त्यांनी हिंदुस्थानात साड्या घेतल्या, चंदनी, हस्तीदंती वस्तू घेतल्या, मोरादाबादी कला-कुसरीची भांडी खरीदली, काश्मीरी शाली पेहरल्या ..

गेला बाजार भारताला तीस-चाळीस हजारांचं परकीय चलन पौंडांच्या नि डॉलर्सच्या रूपात मिळालं ! ही घटना किंवा अशा गोष्टी समजूनही उमजत नाहीत फक्त आमच्या मठ्ठ सरकारला ! किंवा तुम्हा आम्हांला, कारण हे मठ्ठ किंवा घट्ट सरकार तुम्ही आम्ही शिष्ट मतदारांनीच निवडलेलं असतं ना !

अशा अनेक अमेरिकन, ब्रिटिश, जर्मन, स्विस इ. प्रवासी कंपन्या दरसाल अशा प्रकारे देशोदेशींच्या प्रवास योजना आखतात. भारताच्याही वाट्याला थोड्याफार योजना येतात. पण त्या आखण्यात त्यांना फारसा उत्साह वाटत नाही. कारणे उघड आहेत. अत्यंत महागडी हॉटेल्स, (किंवा अगदीच गचाळ), यात्रास्थळी घडणारे महारोग्यांचे दर्शन, भिकाऱ्यांचा त्रास, सरकारी अधिकाऱ्यांचे उर्मट वर्तन. ही शेवटची मंडळी निदान पासपोर्ट तपासणी, कस्टम्स तपासणीच्या वेळी तरी चुकवता येत नाहीत. तिथं ते आपला इंडियन इंगा दाखविल्याशिवाय सोडतील होय ? भारतीय प्रवास व्यवस्थेची अशा रीतीनं अपकीर्ती होते. रस्त्यावरचा पैसा रस्त्यातच कुजत पडतो.

## शेजारचे देश आघाडीवर

आताच एक स्विस वर्तमानपत्र झ्यूरिकहून माझ्या हाती येऊन पडलं आहे आंतरराष्ट्रीय प्रवास-व्यवहार करण्यात तरबेज असलेल्या थॉमस कुक् कंपनीच्या स्विस् शाखेनं तेवीस दिवसांच्या दोन भारत यात्रा योजिल्या आहेत. एक दि. २८ जुलैला निघणारी आणि दुसरी २० ऑक्टोबर रोजी निघणारी. खर्च प्रत्येक प्रवाशामागे ४३९५ स्विस् फ्रँक्स. अंदाजे भारतीय रुपये आठ हजार !

स्वित्झर्लंडमधून आता हे शेकडो प्रवासी इकडे येऊन आम्हाला परदेशी चलन मिळवून देणार. तेव्हा त्यांचे आभारपूर्वक स्वागत करू या !

भारत-प्रवासाच्या या जाहिरातीच्या शीर्षस्थानी दुसरी एक जाहिरात आहे ती बँकाक, अंकोर, जपान, हाँगकाँग इकडील होय, पाच प्रवास यात्रांची ! २५ दिवसांची यात्रा. खर्च ६१०० स्विस् फ्रँक्स, म्हणजे अंदाजे अकरा-बारा हजार रुपये !

याचाच अर्थ असा की परदेशी प्रवाशाना आमच्या शेजारच्या अनेक देशांचं अधिक आकर्षण वाटतं. त्या देशात परदेशी टूरिस्टची सोय अधिक तत्परतेनं पाहिली जात असावी हे उघड आहे. रस्त्यावर पडलेला पैसा कसा उचलावा याची अक्कल त्यांना अधिक असावी ! O

# एका विद्यापीठाला आपण सारे मुकलो

प्रभाकर त्र्यंबक चाफेकर

आता कुठे पन्नाशी उलटली होती—छे—छे ! उलटली तरी कसली ? ३० ऑगस्टला पन्नास वर्षे पूर्ण व्हायची होती. पंडित सातवळेकरांनी पन्नाशीनंतर त्यांच्या प्रचंड कार्याला तर प्रारंभ केला होता. इथे तर व्युत्पन्न विद्वत्ता वयाची तिशी गाठायच्या आधी लोकांना जाणवली होती. केले एवढे कार्यहि भारताच्या इतिहासात स्पष्टपणे लक्षात यावे इतके मोठे व चांगले ठरले होते पण यानंतर तिप्पट कार्य करण्याची लोकांची या विद्वान चालत्या—बोलत्या व्यासपीठापासून आशा होती. हाती घेतलेले डॉ. मुंजे यांचे चरित्र—लेखन पूर्ण होऊ घातले होते. वेदविद्येच्या, जगद्‌गुरू शंकराचार्यांच्या महान कार्याच्या, कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या चाणक्याच्या आज पुढे ठेवून धडे गिरवावेत असल्या मुत्सद्देगिरीच्या, रामायण—महाभारत या आमच्या पवित्र ग्रंथांच्या संदेशाच्या लोकांना करून दिलेल्या परिचयाने सारे स्तिमित झाले होते, खूप ज्ञान मिळवण्याची अपेक्षा बाळगून होते आणि सारे उत्थापनच संपले ! तो, एखाद्या धीरगंभीर गर्जना करत कोसळणाऱ्या प्रचंड प्रपाताप्रमाणे असलेला वक्तृत्वाचा ओघ एकदम लुप्त झाला. ती अस्खलित वाणी अकल्पितपणे विरून गेली, ते प्रवचन वा व्याख्यान ऐन रंगात आल्यावर कुणी आपल्या बोलण्याने वा कुजबुजीनेही त्याची रंगत घालवणाऱ्याला न राहवून खडसावणे आणि ते मागून पार विसरून जाणे—सारे संपले.

महाराष्ट्रातल्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या विद्वत्‌रत्नांतले एक रत्न बाळशास्त्री हरदासांच्या अकाली निधनाने गळून पडले आहे. खरे नागपुरी अगत्य, नागपुरी खाक्या, नागपुरी रसिकता, नागपुरी शौर्य, नागपुरी दिलदारपणा, नागपुरी निर्भयता जुन्या नागपुरात—महाल इतवारी विभागात मुख्यत: एकवटली आहे. अजून या भागाला सुदैवाने पोशाखी शिष्ठपणाचा, नकली व खोटचा विनयाचा स्पर्श झाला नाही; लोकशाही आली तरी मराठचांच्या वैभवाबद्दलचा आदर भोसले



राजघराण्याविषयी अजूनही विनम्र भावना ठेवून नागपूरकर व्यक्त करतात. अजून जगन्नाथाच्या देवळात आषाढी–कार्तिकी एकादशीला दिंडी जाते आहे. आणि अजूनही दक्षिणामूर्ति–मंदिरात ज्ञान मिळवायला जाण्याऱ्या लोकांचा प्रवाह अखंडित आहे. पण आता या घटकेला तरी म्हटले पाहिजे की दक्षिणामूर्ति–मंदिराचे वैभव एकदम बाळशास्त्री हरदासांच्या मृत्युमुळे अस्ताला गेल्यासारखे झाले आहे. श्रावण महिन्यात सकाळी भागवत ऐकायला आणि संध्याकाळी बाळशास्त्रींचे कीर्तन ऐकायला लोकांची झुंबड लागत असे. देऊळ अगदी लहान नाही पण या देवळाच्या आवारात शिरायला वेळेच्या पाच मिनिटे आधीही वाव नसे. चार–चार पाच–पाच मैलांवरून अगदी पांढरपेशे, विद्वान, विद्यापीठाच्या पदव्या घेतलेले तरुण नागरीकदेखील गर्दी करीत असत. शास्त्रीबुवांचा दौरा हिन्दुस्थानभर असायचा. तथाकथित इंग्रजी शिक्षण न घेताही त्यांनी गेल्या काही वर्षांत इंग्रजीतूनदेखील भाषणे दिली होती ! शालेय जगतात सहा वर्षेही पूर्णपणे न घालवलेल्या शास्त्रीबुवांनी आपल्या विद्वत्तेने आणि वक्तृत्वाने पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री घेतलेल्या अनेकांना आपल्यापुढे नतमस्तक व्हायला लावले होते. कामकोटी पीठाच्या शंकराचार्यांचे शिष्यत्व पत्करल्यावर त्यांनी तमीळ भाषेचा अभ्यासदेखील सुरू केला होता. आणि त्यांचे विद्वत्तेच्या क्षेत्रांतले प्रचंड पराक्रम माहिती असलेल्यांना खात्री होती की लवकरच त्यांनी दाक्षिणात्य प्रांतात त्यांच्याच भाषांत अस्खलित विद्वत्ताप्रचुर व्याख्याने दिल्याचे वृत्त ऐकायला मिळणार. शास्त्रीबुवा चातुर्मासी नागपूरलाच राहत असत. श्रावण महिन्यातल्या सकाळच्या भागवतावरील प्रवचनात व संध्याकाळच्या कीर्तनात खंड पाडायला प्रकृती दुरुस्त होण्याकरिता त्यांच्या फॅमिली डॉक्टरांनी–डॉ. रामदास परांजप्यांनी त्यांना सांगितले पण अनेक वर्षांची चालू असलेली ही विद्यादानाची परंपरा कोणत्याही कारणास्तव खंडित करायला बाळशास्त्री तयार

झाले नाहीत. या वर्षी मधुमेहाने खूप अशक्तता आली होती, जलोदराचाही त्रास होऊ लागला होता. धुळ्याचे प्रा. मुरलीधर शहा एक अतिशय चांगले हिंदी वक्ते आहेत. शरदोत्सवानिमित्त धुळ्यात होणाऱ्या व्याख्यानमालेत निदान एकतरी पुष्प शास्त्रीबुवांनी गुंफावे अशी त्यांची इच्छा होती. जुलै महिन्यात प्रा. शहांचे पत्र घेऊन मी शास्त्रीबुवांकडे गेलो तेव्हा त्यांची प्रकृती खूप खालावल्यासारखी वाटली. ते मला म्हणाले, " चातुर्मासात मी कुठे जात नसतो हे तर तुम्हाला माहितीच आहे. पुन्हा केव्हातरी येईन असे शहांना कळवा." मी शास्त्रीबुवांना विचारले की, श्रावण महिन्यात या वर्षी विश्रांति का घेत नाही? ते म्हणाले, " कसली विश्रांती? उद्यापासून श्रावण सुरू होईपर्यंत ज्ञानेश्वरीवर प्रवचन रोज द्यायचे आहे. या वर्षी नवीन अध्याय घ्यायचा आहे." गेल्या वर्षी त्यांच्या पायांच्या अंगठ्यांवर डॉ. परांजपे यांनी शस्त्रक्रिया केली होती—आषाढ महिन्यातच. श्रावण महिन्यातल्या प्रवचनाचा आणि कीर्तनाचा नेम काही त्यांनी चुकवला नाही! या वर्षी त्यांच्या अनेक श्रोत्यांनीही त्यांना विश्रांतीकरता प्रवचन व कीर्तन करू नये असे प्रेमाने सुचवले. पण शास्त्रीबुवा अनेक वर्षांची दक्षिणामूर्ति—भगवानाची सेवा करण्याची परंपरा सोडायला तयार झाले नाहीत. आणि त्या गाजलेल्या व्यासपीठावरून ज्ञानदान शरीर जरी व्याधिग्रस्त होते तरीही खणखणीत असलेल्या वाणीने देत असतानाच त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि मग मात्र अगदी नाइलाजास्तव ते मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये भरती झाले. अगदी शेवटी त्यांना भेटलो तेव्हाचा प्रसंग. तेव्हाही अशक्तता गेल्यावर डॉ. ईश्वरचंद्रांकडून डोळ्यांवर शस्त्रक्रिया करून घ्यायची आहे असे ते म्हणाले. लिहिण्या-वाचण्यात आजकाल त्यांना चष्म्याशिवाय एका भिंगाचा उपयोग करावा लागत असे. पण त्याचीही फारशी जरुरी नसेच म्हणा. पुतण्याच्या मुलाला संस्कृत शिकवत होते— दोन तीनदा त्यांनी तो श्लोक त्याला वाचून दाखवला. चौथ्यांदा पुस्तक मिटून खणखणीत तोंडाने म्हणून शिकवणे चालू ठेवले! बरेचसे लेखनकार्य पुढे होते, व्याख्यानमालांकरता अभ्यास करण्याची सवय अजून होती त्यामुळे खूप वाचत असत. हॉस्पिटलमधून खडखडीत बरे होऊन जायचे आणि मग सपाटून आपल्या कार्याचा फडशा पाडायला लागायचे; मग पुन्हा डोळ्यांकरताही परत येणे नको असा बेत त्यांनी बोलून दाखवला. दुर्दैवाने त्यांना खरोखरच इस्पितळात परत येण्याची पाळीच आली नाही. त्यांनी साऱ्या इस्पितळांना —औषधांना—कायमचा नमस्कार केला!

## शास्त्रीबुवा कुठे आहेत?

आम्ही कॉलेजात होतो. नुकतेच स्वातंत्र्य मिळाले होते. १९४५ ते १९४९ या चार वर्षांत खूप चांगली व्याख्याने ऐकायला मिळाली. कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, कादंबरीकार ना. सी. फडके आणि वि. स. खांडेकर, आचार्य अत्रे, अरुणा असफअल्ली यांची भाषणे ऐकून आम्ही सारे खूष झालो होतो, नर्मविनोदी अशी कृप-

लानींची आणि राजगोपालाचारी यांची भाषणेही खूप आवडली. आणि त्याच वेळी नागपूरचे टाऊन–हॉल, चिटणीस पार्क आपल्या भाषणांनी गाजवणारे कै. रामभाऊ रुईकर, जनरल मंचरशा आवारी, भाई दांडेकर यांच्याही भाषणांची चटक लागली. कोणत्याही पक्षाचा दुराभिमान नसल्याने जिथे चांगले भाषण ऐकायला मिळेल तिथे जायचे असा आम्हा मित्रांचा क्रम असे. " विषयच सुचत नाही " या विषयावरचे आचार्य दादा धर्माधिकारी यांचे आणि " अनेक प्रश्नांना एकच उत्तर " या विषयावरचे बाळशास्त्री हरदासांचे आमच्या घराशेजारच्या विठ्ठल मंदिरातले भाषण ऐकले आणि त्यानंतर " तोचि देवो होये शब्दाचा " या विषयावरचे भाऊ पंडितांचे आणि " मी लघुकथा कशा लिहितो " हे पु. भा. भाव्यांचे भाषण एकले आणि वक्तृत्वसौंदर्याच्या विविध कळा बघायला मिळाल्या. या साऱ्यात धाड–धाड–धाड–धाड–अस्खलितपणे आपल्या प्रचंड आवाजात बोलत जाणाऱ्या बाळशास्त्री हरदासांचे वक्तृत्व जोरकस वाटायचे. बाकीच्या वक्त्यांच्या चेहऱ्यांवर भाषणांतले भाव व्यक्त व्हायचे. बाळशास्त्रींचा चेहरा फक्त लालबुंद झालेला दिसायचा, डोळे लकाकू लागायचे. आवाजाचा ओघ जवळजवळ एकसारखा. भाषण संपल्यावर एखाद्या अजस्र पंपातला जलप्रवाह एकदम थांबल्यासारखे वाटे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे वक्तृत्व ऐकून धन्य झाल्यासारखे वाटले. पण " अभिनव–भारत " सोहळ्यानिमित्त नाशकाला ज्या घरी त्यांनी ती संस्था स्थापन केली होती त्या घरीच झालेल्या कार्यक्रमाच्या वेळी तात्यारावांनी शास्त्रीबुवा कुठे आहेत ? त्यांना इकडे बोलवा, असे म्हटले आणि बाळशास्त्रींना तात्याही मान देतात हे बघून आम्हाला बाळशास्त्री नागपूरकर म्हणून मूठभर मांस चढले ! महाराष्ट्राची पुण्यनगरी मानल्या गेलेल्या व खरी परीक्षा होणाऱ्या पुण्यांत बाळशास्त्री यांच्या व्याख्यानमाला गाजतात हा आम्हा नागपुरकरांना अभिमानानं आणि कौतुकानं बोलायचा विषय होता. महाभारत असो, रामायण असो, वेदविषय असो, चंद्रगुप्त–चाणक्य असो, भगवान श्रीकृष्ण असो, क्रांतिकारकांचा विलास असो [ मदनलाल धिंग्रांवर त्यांचे सिटी कॉलेजमध्ये व्याख्यान झाले. अध्यक्ष होते सेनापती बापट, प्रत्यक्ष धिंग्रांचे सहकारी. अध्यक्षीय भाषण करताना सेनापती म्हणाले, शास्त्रीबुवांनी मदनलाल धिंग्रांची जी माहिती सांगितली त्यातली पुष्कळशी मलाही नव्हती !] विषय कोणताही असो शास्त्रीबुवांचे व्याख्यान कधीच पडत नसे. दोन–तीन वर्षांपूर्वी चतुर संगीत विद्यालयातर्फे होणाऱ्या भातखंडे पुण्यतिथीनिमित्त " संगीत " विषयावरचे त्यांचे भाषण ऐकायला मुद्दाम बरेच लोक आले होते. कारण शास्त्रीबुवांना संगीताच्या बैठकीत कधी कुणी बघितले नव्हते. संगितावरचे त्यांचे भरपूर माहिती देणारे व सामवेदातून संगीतशास्त्र कसे निर्माण झाले हे अनेक दाखले देऊन सांगणारे व्याख्यान ऐकून श्रोत्यांनी बोटे तोंडात घातली !

कै. मालकर, नामदार वि. घ. देशपांडे, पु. भा. भावे, द. भा. देशमुख प्रभृति मित्र, कै. वासुदेवराव फडणीस त्या वेळी काढत असलेल्या " सावधान " वृत्तपत्राच्या

कचेरीत जमणारे नेहमीचे मित्र. या साऱ्यांच्याशिवाय कै. जगन्नाथप्रसाद वर्मा, कविवर्य राजा बढे, कै. बिंदुमाधव पुराणिक आदी अनेक हिंदुत्वनिष्ठांची नागपुरी भाषेत बोलायचे तर ती एक चक्री होती. गेल्या वर्षी कै. बिंदुमाधव पुराणिकांच्या छायाचित्राच्या अनावरण–प्रसंगी विक्रमराव सावरकरांनी या अनेक जुन्या मित्रांना एकत्र आणले होते. असे म्हणतात की, त्या वेळच्या हिंदुसभेच्या सभात प्रथम बाळशास्त्री, मग वि. घ., मग पु. भा. भावे व शेवटी द. मा. देशमुख बोलत असत. राजा बढे या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. बाळशास्त्री, मग वि. घ. देशपांडे आणि शेवटी पु. भा. भावे यांची भाषणे त्या जुन्या क्रमानेच ठरवली होती आणि त्या जुन्या सुखद स्मृती उजळण्याकरता नगरभवनाचा दिवाणखाना गच्च भरला होता. जनसंघ अधिवेशनाला गेलेले वि. घ. देशपांडे, गाडी कार्यक्रम संपेपर्यंत न आल्याने येऊ शकले नाहीत. बाळशास्त्री हरदास आणि पु. भा. भावे यांनीच ती सभा गाजवली. बाळशास्त्रींचे भाषण ऐकायचा तो शेवटचा प्रसंग.

परवा बाळशास्त्रींना श्रद्धांजली वाहण्याकरता लोकांची यात्रा लोटली होती. शेवटी देवळाचे दरवाजे बंद करावे लागले. भरल्या डावावरून उठून गेलेल्या पतीच्या निधनामुळे शोकाकुल झालेल्या वीणाबाईंकडे बघवत नव्हते. या कर्मठ संस्कारांच्या घरात त्या दिवशी भिन्न जातींच्या, भिन्न भाषिकांच्या, भिन्न राजकीय पक्षांच्या लोकांच्या अलोट गर्दीने बाळशास्त्रींचे अखेरचे दर्शन घेण्याची शेवटची संधी सोडली नाही. एका घराच्या पत्र्यावर तर इतकी गर्दी स्त्रियांनी केली होती की पत्र्याचे छप्परच कोसळले. दक्षिणामूर्तीची कृपा की कुणी दगावले नाही. पुण्याचे बाळशास्त्रींचे निकटचे मित्र मामा दाते यांच्याकरता अंत्ययात्रा थांबवून ठेवली होती ते ऐनवेळी आले आणि ट्रकवर ठेवलेल्या बाळशास्त्रींच्या पार्थिव शरीराला पुष्पहार घालता घालता जेव्हा रडू लागले तेव्हा त्या ठिकाणचा लोकांचा जमाव हेलावून गेला.

बाळशास्त्रींना श्रद्धांजली अर्पण करण्याकरता धनवटे रंगमंदिरात विदर्भ साहित्य संघाने आयोजित केलेल्या शोकसभेत भाऊसाहेब माडखोलकर, डॉ. मा. गो. देशमुख, डॉ. श्री. भा. वर्णेकर, दि. ब. ऊर्फ भाऊ पंडित, राष्ट्रभाषा प्रचारसमितीचे पंडित हृषिकेश शर्मा, मामाराव दाते अनेकांनी भावपूर्ण भाषणे केली. सगळ्यांच्या भाषणाचा एकच मतितार्थ होता–बालवयातच शास्त्रीपद भूषवणाऱ्या व हरीची भक्ती करत राष्ट्रसेवा करणाऱ्या बाळशास्त्री हरदासांच्या मृत्यूने एका प्रकांड विद्वान अशा मोठ्या माणसाला–नव्हे एका विद्यापीठाला–आपण सारे मुकलो.

रात्री दोन दोन वाजता चिंतन करत शुक्रवार तलावाला फेरी मारत अभ्यास करत हळूहळू फिरत जाणाऱ्या बाळशास्त्रींचे दर्शन नागपुरकरांना पुन्हा होणे नाही. दक्षिणामूर्ति मंदिराची, नागपुरातल्या या महान धार्मिक, सांस्कृतिक पीठाची शोभा आजतरी अदृश्य झाली आहे. ○

चौथी सचित्र आवृत्ती

□□

# राजा शिवछत्रपति

□□

ब. मो. पुरंदरे

□□

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□□

राजहंस प्रकाशन
पुणे

उल्हास लुकतुके

## बेबीची आई

"चावकानं फोडलं पाहिजे मेल्याला भर चौकात ! नाहीतर धिंड काढली पाहिजे गाढवावरून ! सोन्यासारखी पोर माझी—वेडी झाली या हलकटाच्या कृत्यानं—अन् वयाचा तरी काही विचार ? अजून सहा वर्षांचीसुद्धा झाली नाही हो बिचारी. मेल्याचं अंग कसं झडून गेलं नाही असं काही करताना ? बाबूभावजी ! भ्यावजी म्हणे भ्यावजी ! पोर बिचारी सारखी 'बाबू काका,' 'बाबू काका' करायची. तरी मी म्हणत होते पोरीला इतका लळा लावू देऊ नका म्हणून. वळणाचं पाणी शेवटी वळणालाच मिळायचं. हलकटच जात मेली पहिल्यापासून. कितीही सुधारलं तरी तमलेच. कडू कारलं ते. साखरेत घोळलं, तुपात तळलं तरी गोड थोडंच होणार आहे ? पूर्वी कोणी खेटराशी उभं करत नव्हतं तेच बरं होतं. घरात आल्यादिवसापासून खटकतंय मला हे. विचारलंसुद्धा मी तसं. म्हटलं, 'इतका कसा याचा घरात वावर ?' पण सुधारक पडलं ना घर आमचं. यांचं म्हणजे वडलांवर विश्वास अन् रावसाहेबांचं म्हणजे विश्वबंधुत्व ! लहानपणापासून घरात मुलासारखा वाढवलाय म्हणे. मला बाबूभावजी काय म्हणायला लावलं ! पोरीला बाबूकाका काय म्हणायला लावलं !! चांगले फेडले ना पांग आता ? एवढं रामायण घडलं, मेल्याला तिथल्या तिथे पकडला. एखादा असता तर तिथल्या तिथे चार काढल्या असत्या कानफडाखाली. पण अहिंसावादी पडलं ना आमचं घर—हे गप्पच ! मी म्हटलं देऊ मेल्याला सरळ पोलिसात आता. तर रावसाहेबांचं तिसरंच—माझंच शिक्षण काढलं—म्हणे एवढी शिकलीस अन् अजून बुरसट, जुने संस्कार जात नाहीत तुझे अन् अजूनही नीट विचार करता येत नाही तुला ! खोटं का होतं माझं ? मेला वागलाच ना हलकटा-



सारखा—पण हे म्हणजे बापाला बाप म्हणणार नाहीत आणि श्राद्धही करणार नाहीत—अन् नीट सरळ विचार करून यांनी काय उपाय शोधून काढला तर म्हणे, पोलिसात नको द्यायला ! छान्. चांगलं गुंडांचं फावतंय अशा रावसाहेबांच्यामुळे. म्हणे वेडा झालेला दिसतोय. कसला आलाय वेडा ? ढोंग आहे ढोंग ! कातडी बचावण्यासाठी. चांगली सालडी लोंबवली तर आत्ता सरळ येईल. साप मेला—चांगलं दूध पाजून वाढवला तरी डंख केलाच मेल्यानं. बाव्या हलकटा, तू असं का केलंस ? ”

# रावसाहेब

"नाही, नाही, बाबूला मनोविकाराच्या डॉक्टरांकडे न्या."

तुझ्या या वेडचा कृत्यानं किती प्रश्न उभे केलेस बाबू ? का असं केलंस ? कुठे या प्रश्नांची उत्तरं शोधू ? भंगलेल्या श्रद्धा परत कशा सांधू ? नाही बाबू, तू असं करायला नको होतंस. पण केलंस हे वाईट होतं हे कळण्याइतका शहाणा मी तुला खासच बनवला होता. मग तू असं का केलंस ?

अरे, जातिपातीविरुद्ध आम्ही एवढं बंड उभारलं–४२ साली 'इंग्रज चले जाव' म्हटलं त्याबरोबरच 'जातिभेद चले जाव' 'रूढी चले जाव' म्हणून कित्येक विचार रुजवले. त्या वेळेस ६–७ वर्षांचा पिटुकला तू कासवाच्या पिलासारखा उघडा पडला होतास. विवाहबाह्य संबंधातून जन्माला आलेला तू ! बाप सांभाळायला तयार नव्हता–आईला नवऱ्याचा आधार हवा होता म्हणून तीही तुला सोडायला तयार होती. समाजाच्या अथांग समुद्रात पार कुठल्या कुठे बुडून गेला असतास तर पत्तासुद्धा लागला नसता. किंवा गिधाडांनी फाडून खाल्लं असतं तर त्यांच्या चोचीलासुद्धा पुरला नसतास. जातिभेदाविरुद्ध, पूर्वजन्मीच्या संस्कारांविरुद्ध बंड करणारे आम्ही ! मला तुझी दया आली. घरी आणून पोपटाच्या पिलासारखा वाढवला. माझ्या पोराच्या तोंडचा घास तुझ्याही तोंडी भरवला. घडणारा प्रत्येक संस्कार पारखून घेतला. माझ्या पोराला ज्या ऐरणीवर घडवला त्याच ऐरणीवर तुलाही घडवला. जीवनाचा जो मनोहारी अनुभव माझ्या पोराला उपलब्ध होता तोच तुलाही मिळावा म्हणून अट्टाहास केला–माझ्या पोरासारखंच तुझंही रोपटं जोमानं वाढू लागलं तेव्हा केवढा आनंद झाला ! अरे, तुझ्या येणाऱ्या प्रत्येक पालवीबरोबर माझ्या वृद्ध मनातही वसंतबहार फुलत होता खुळचा ! अन् तू हे काय केलंस !

मोठा होत होत झोपडपट्ट्यांचा पुढारी झालास. झोपडपट्टीतल्या त्या दलित वर्गानं तुझा सत्कार केला तेव्हा तुझ्यापेक्षा जास्त आनंद झाला तो मला ! समाजाच्या इच्छेविरुद्ध घरात वाढवलेल्या रोपट्याला आलेली ती फुलं पाहून जीव कसा समाधानानं हसला बघ. 'रावसाहेब, कल्पद्रुम समजून कोरांटीचं रोप लावताय हं' म्हणून समाज बजावायचा, हसायचा. माझ्या डोक्यात खोट्या कल्पना नव्हत्या. रोप कोरांटीचं आहे हे माहीत होतं. पण मी आत्मविश्वासानं म्हणायचा, 'अरे, नीट मशागत केली तर कोरांटीचाही कल्पद्रुम होईल.' परवा येणारा मोहोर पाहून म्हटलं, 'आला, निर्णयाचा क्षण आला !' आता या मोहोराला सुरेख इच्छित फळं येतील म्हणून मीच मोहोरलो होतो अन् हे काय केलंस बाबू ? कसली फळं दाखवलीस ही ? किती जहरी ? किती कडू ? किती किडकी ? अरे, ही का कल्पद्रुमाची फळं ?

जीवनाच्या साऱ्या श्रद्धा धुळीस मिळवल्यास रे! सर्वस्वाची बाजी लावलेला प्रयोग का फसवलास? पूर्वसंस्काराचा, पूर्वसंचिताचा समाजाचा वेडा सिद्धान्त आता खरा ठरणार का? 'देवदानवा नरे निर्मिले' म्हणून जन्मभर फोडलेला टाहो खोटा ठरणार का? 'समतेचा ध्वज उंच धरा रे' म्हणून गर्जना करीत निघालो तर या ध्वजदंडाची सोनेरी शिखरं तू कापून टाकणार का? जीवनातल्या अमंगलतेपासून प्रेरित होऊन तुझं जीवन मांगल्यानं उजळून टाकायला निघालो तर ही ज्योत विझवून टाकणार का! माझी मांगल्यावरची श्रद्धा का उखळून लावलीस? व्यक्तिमत्त्वाचा पाया का उखडून टाकलास? बेबीच्या काय किंवा माझ्या काय, व्यक्तिमत्त्वाच्या सायुज्यतेवर का प्रहार केलास? जीवनाच्या धारणा का कोसळवल्यास? ज्या प्रश्नांना उत्तरं नाहीत ते प्रश्न उपस्थितच का केलेस? का बाबू, तू असं का केलंस?

## बाबू

कोणी म्हणतं फटके मारा. कोणी म्हणतं हे करा, कोणी म्हणतं ते करा. माझी हात जोडून एकच विनंती आहे तुम्हांला. तुम्ही मला...पुढचे शब्द उच्चारण्यापूर्वी माझ्या फुटलेल्या उरात घेता यईल तेवढी हवा घेऊ दे—जळक्या मनात जमवता येईल तेवढं धैर्य जमवू दे...तुम्ही मला क्षमा करा.

समाजनीतिबाह्य वर्तन केलेला विकृत मी. काय तोंड वर करून बोलू? पण रावसाहेब, बाहेर मार खाल्लेलं जनावर आईच्या कुशीत घुसतं. मी कुठे जाऊ? मागे दिलात तसा पुन्हा एकदा आसरा द्या. नाही तर हा समाज मला दगड मारून ठार करील. कुत्र्यासारखा. कुत्र्यालाही आधार असतो—पण तेवढ्याला...? नको रावसाहेब, वाटेलं ते झालं तरी तुम्ही मला क्षमा करा. अशासाठी की तुमची, म्हणजे आईची शपथ घेऊन सांगतो बेबीवर माझं मुलीसारखं प्रेम होतं. मी स्वतःला तिचा खरा काका समजत होतो. मी मानलेला काका आहे याची तिला असेल तितकीसुद्धा जाणीव मला नव्हती इतका मी या कुटुंबात रुळून गेलो होतो. तुम्ही केलेल्या उपकारांची तर मला पूर्ण जाणीव आहे. तुम्ही नसता तर या क्रूर समाजानं मला फाडून खाल्लं असतं. तुम्ही मला नुसतं वाचवलंच नाहीत तर आई आणि वडील दोन्ही दिलेत. दोघांचं प्रेम दिलंत—दोघांची सुरक्षितता दिलीत—इतकी की मी त्यापुढे माझ्या खऱ्या आईवडलांचा तिरस्कार करू लागलो. माझं सर्व यश, किंबहुना माझं सर्व अस्तित्वच तुमच्यामुळे आहे याची मला पूर्ण जाणीव आहे. तुमच्या उपकाराच्या फेडीचे मी किती तरी मनोरथ केले होते. बेबीचे लग्न धुम-धडाक्यात करून द्यायचं हाही त्यातला एक होता. आणि एवढं असूनसुद्धा त्या दिवशी काय झालं हे मला कळत नाही.

बेबी माझ्याबरोबर वर एकटी होती. अन् एकाएकी मला कसल्यातरी विलक्षण उबळीनं पछाडलं. माझ्या मनात कसलं अजगर वळवळू लागलेलं आहे हे कळताच प्रथम मी घाबरलो. मला किळस, ओकारी आली. तो विचार दूर झटकायचा मी आटोकाट प्रयत्न करीत होतो. ही इच्छा भयंकर आहे, गलिच्छ आहे, ती बेबीला आयुष्यातून उठवील, तुमच्या जीवनमूल्यांवर प्रहार करील या सर्व जाणिवा एकत्र उठून ओरडू लागल्या. मी विलक्षण द्वंद्वात सापडलो. पण अजगर भुकेलं होतं. त्याची वाढती वळवळ मला जाणवू लागली. अस्वस्थ करू लागली. माझी विलक्षण तगमग होऊ लागली—अजगर आता वळवळण्याऐवजी सळसळू लागलं होतं. त्याच्या वासनेच्या लांब लांब गलिच्छ जिभा आता लपक् लपक् करीत बाहेर येऊ लागल्या. जाणीवांचा ससा जीव घेऊन पळू लागला. अजगर आणखी सळसळू लागलं. ससा पुढे, अजगर मागे—ससा पुढे, अजगर मागे—शेवटी जिभेच्या एका लपक्यात अजगरानं जाणिवांना पकडलं— अजगराच्या घशात जाण्यापूर्वी सशानं शेवटचा आर्त सूर काढला तो अजून माझ्या मनात घुमतोय. अजगर सळ् सळ् सळ् सळ् करीत पुढे निघालं. पुढचं लक्ष्य काय हे दिसत असलं तरी मला कळत नव्हतं. माझ्या जाणीवा अजगरानं गिळल्या होत्या. दुसऱ्याही सशानं जीवघेणी किंकाळी फोडली तेव्हा माझ्या डोळ्या-पुढे मोठा वणवा चमकला. लाल पिवळ्या ज्वालांचा एक झटका बसला. त्यात काय जळलं, काय राहिलं हेही मला कळलं नाही.

निश्चेष्टतेतून बाहेर आलो आणि समोवताली पाहिलं तर राख ! सगळं बेचिराख ! सगळीकडे भस्म ! माझ्या मनाचंही भस्म ! त्या बेचिराख मणंगात माझ्या जळक्या मनाचे अवशेष शोधायचा खूप प्रयत्न केला—ते सापडले नाहीत—जाणिवा गट्ट झाल्या. संवेदना भस्म झाल्या. मनाची राख झाली. माझं काही काही राहिलं नाही. भग्न व्यक्तिमत्त्वाचा मी, शून्यात बघत, निर्वात पोकळीत बसून राहिलो. हेतुशून्य होऊन राहिलो.

इतकी मोठी जाळपोळ, पडझड झाली तेव्हा मीही स्वतःला विचारलं, 'बाबू, तू असं का केलंस ?'


## १ महिन्यांत वायरमन कोर्स

रविवारचे व ६ महिन्याचे मासिक १० रु. फी असलेले—वेगवेगळे वर्ग. पाळी बदलणाऱ्यांना सोईस्कर अशा वेळा. मराठी, हिंदी व इंग्रजीतून वेगवेगळ्या बॅचेस. इलेक्ट्रिशियन, सुपरवायझर, वाईंडिग व रेडिओ रिपेअरिंगचे वेगळे वर्ग, प्रॅक्टिकलसह शिक्षण. प्रत्येक महिन्याच्या २, ११ व २२ तारखेस नव्या बॅचेस.

भेटा :—सकाळी ७ ते रात्री ८. अगर लिहा :—

**दादर इलेक्ट्रिक इन्स्टिटयूट**

पोर्तुगीज चर्चशेजारी, '१६५' बस स्टॉपसमोर, दादर [वे.रे.], मुंबई २८

## मनोविकार तज्ज्ञ

‘ बाबू, तू असं का केलंस ? ’ खरा आहे प्रश्न तुमचा रावसाहेब. हा प्रश्न बेबीलाही पडलाय, बेबीच्या आईलाही पडलाय, तुम्हालाही पडलाय, खुद्द बाबूलाही पडलाय अन् मला तर रोजच पडतो.

आजपर्यंत मानलेल्या शास्त्राप्रमाणे हे शक्य आहे की बाबूला लहानपणी आई-वडलांचं प्रेम मिळालं नाही. त्यामुळं तो त्या प्रेमाचा भुकेलाच राहिला. घडलेलं कृत्य करताना बाबू हा बाबू नव्हताच मुळी ! खरं वाटणार नाही पण बाबू हा बाबू नव्हताच ! बेबीच्या ठिकाणी तो स्वत:ला समजत होता आणि स्वत:च्या शरीराच्या ठिकाणी स्वत:च्या जन्मदेत्या बापाला. म्हणजे वडील आईवर जितकं प्रेम करतात तितकं प्रेम तो अशा लांबच्या घासानं मिळवू पाहत होता.

या कृत्यानं तुम्हाला त्रास होईल याची त्याला जाणीव नव्हती असं नाही. पण बाबूला स्वत:च्या जन्म देत्या बापाबद्दल तिरस्कार होता. बापाच्या जागी आल्यानं हा तिरस्कार तुमच्याबद्दलही निर्माण झाला. पण तो तुमच्यावर अतिशय प्रेम करून त्यानं वरवर तरी दाबून टाकला होता. या कृत्यात तो तिरस्कार असा उसळी मारून वर आला. तुम्हांला मनस्ताप झाला खरा, पण जन्मदेत्या बापाला अद्दल घडविण्याचं सुख बाबूच्या अंतर्मनाला दुराव्यानं का होईना मिळालं.

इतका त्रास होऊनसुद्धा बाबूला पोलिसात द्यायच्याऐवजी तुम्ही इकडे पाठवलात याबद्दल तुमचं अभिनंदन करायला पाहिजे. असे हजारो रावसाहेब निर्माण झाले पाहिजेत. ज्या परिस्थितीतून असे बाबू निर्माण होतात ती बदलेपर्यंत आम्ही हा प्रश्न रोज किती तरी बाबूंना विचारू. ‘ बाबू, तू असं का केलंस ? ’ □



मध्यपूर्वेच्या मरुभूमीवर सांडलेल्या रक्ताश्रूंची कहाणी




लेखांक तीन

नासरने सुएझ कालव्याचे राष्ट्रीयीकरण करून जो पेचप्रसंग इंग्लंडपुढे निर्माण केला होता, त्या बाबतीत विचार करण्याकरता ईडनसाहेबाने लंडनला बोलावलेल्या २२ राष्ट्रांच्या परिषदेचा सुरुवातीपासून बोजबारा उडत गेला. डल्लेस व भारताच्या प्रतिनिधीने सुएझवर आंतरराष्ट्रीय नियंत्रण ठेवण्याची केलेली सूचना, ईजिप्तने लगोलग फेटाळली. काहीही न ठरवताच हे सुएझ स्वयंवर मोडले. फ्रेंच परराष्ट्र मंत्री पिनेट, याचा तर असा ठाम ग्रह झाला की, सुएझच्या राष्ट्रीयीकरणाला अमेरीकेच्या डल्लेसची उघड उघड फूस आहे व यामुळे नासरविरुद्ध लष्करी कारवाई करायला अँथनी ईडन टरकतो आहे. फ्रान्सचा पंतप्रधान मोलेट व परराष्ट्रमंत्री पिनेट यांनी लंडनमध्ये अँथनी ईडन व ब्रिटिश परराष्ट्रमंत्री सेल्विन लॉईड यांची पुढे १६ ऑक्टोबरला गाठ घेतली, तेव्हा आग्रह धरला की अमेरिकेचा पाठिंबा असो वा नसो, अंग्लो–फ्रेंचांनी नासरविरुद्ध लष्करी कारवाई करून त्याच्या पुंडाईला आळा घातलाच पाहिजे.

बेन गुरियान या सगळ्या प्रकाराकडे औत्सुक्याने पहात होता. काही वर्षांपूर्वी

इस्रायल–जॉर्डन यांच्यात मैत्रीचा करार होऊ घातला असताना, अम्मानमधील ब्रिटिश वकील सर कर्कब्रिज याने जॉर्डनच्या राजाला धमकी दिली होती, की जर इस्रायलशी समझोता कराल तर, पर्यायाने इंग्लंड व इजिप्त यांच्या मैत्रीत बिघाड निर्माण होईल ! जॉर्डनचा राजा अबदुल्ला याने स्वत: ही गोष्ट मोशे दायनला सांगितली होती. याच अब्दुल्लाचा नंतर पाठोपाठ खून पडला. ज्या इजिप्तच्या मैत्रीसाठी इंग्लंड एकेवेळी जीव टाकीत होते त्याच इजिप्तवर लष्करी कारवाईसाठी आता पॅरिसमध्ये खलबते चालू होती, आणि जॉर्डनचा राजा हुसेन हा इस्रायल सरहद्दीवर धुमाकूळ घालणाऱ्या घूसखोरांना पाठीशी घालून सांगत होता, " आम्ही या घूसखोरांविरुद्ध कारवाई करण्यास असमर्थ आहोत. इस्रायलमधून निर्वासित झालेले अरबच ही घूसखोरी करीत आहेत ना ? त्यांनी तरी काय करावे ? आम्ही थोडेच याला जबाबदार आहोत ?"

इंग्लंडने इस्रायलपासून फोडलेला जॉर्डन, तेव्हापासून इजिप्त व इराक यांपैकी कुणाशी नाते जोडावे याच्या संभ्रमात वावरत होता. जून १९५६ मध्ये जॉर्डनचा चीफ ऑफ स्टाफ, अली अबू नाबर हा इराकला गेला होता. इराकचा राजा फैसल व लष्करी अधिकाऱ्यांच्या गाठी भेटी घेऊन त्याने इराककडून आश्वासन मिळवले की इराकी सेना इराक–जॉर्डन सरहद्दीवर सज्ज राहील; व जर जॉर्डनला इस्रायलकडून धोका निर्माण झाला तर हे सैन्य जॉर्डनमध्ये येईल.

हे आश्वासन जाहीर होताच, बेन गुरियानने उघड इशारा देऊन ठेवला होता की– " जर इराकी सेना जॉर्डनमध्ये येईल, तर इस्रायली सैन्य जॉर्डन नदीचा पश्चिम तट व्यापून टाकील. " आता इस्रायल–जॉर्डन सरहद्दीवर निर्वासित अरब घूसखोरांचे अत्याचार सुरू होताच, इस्रायली सेनेने जॉर्डन सरहद्द ओलांडून लहान–सहान चकमकी सुरू केल्या.

ज्या दिवशी म्हणजे १६ ऑक्टोबरला पॅरिसमध्ये इंग्लंड व फ्रेंच पंतप्रधानांच्या, नासरविरुद्ध लष्करी कारवाइचा विचार करण्यासाठी वाटाघाटी चालू होत्या त्याच्या आधी दोनच दिवस, म्हणजे १४ ऑक्टोबरला इराकी सेनेची काही तुरळक आघाडीची पथके जॉर्डन मध्ये पुढे सरकली.

ही घटना वरवर दिसायला इस्रायल विरोधी होती खरी, परंतू त्यात आणखी एक गुंतागुंत होती. २१ ऑक्टोबर १९५६ या दिवशी इस्रायलमधील फ्रेंच वकिलातीतील लष्करी सल्लागार मोशे दायानला भेटण्यास आला. फ्रान्सकडून मिळणाऱ्या शस्त्रास्त्र मदतीच्या संबधांत ही भेट होती. विषय इराकी सैन्याच्या हालचालीचा येताच सल्लागाराने सांगितले–

" इराकी सैन्य जॉर्डनमध्ये घुसावे याला इराकी पंतप्रधान नुरी सैद याचादेखील मनोमन विरोध आहे. परंतु इंग्लंडनेच हे मुद्दाम घडवून आणले आहे. जॉर्डनमध्ये नुकत्याच निवडणुका झाल्या. इराकी सैन्य जॉर्डनमध्ये असले तर नासर-

विरोधी गटाला निवडणुका जिंकणे अधिक सोपे जाईल असा इंग्लंडचा कयास होता. आज इंग्लंडचे नासरशी वैर आहे, तेव्हा नासरला खच्ची करण्याचा हा आहे एक ब्रिटीशांचाच डाव !"

## जॉर्डन इजिप्त युती

ब्रिटिशांच्या दुर्दैवाने दोनच दिवसांपूर्वी जॉर्डनमधील निवडणुकांचे निकाल जाहीर होऊन त्यांत नासरवादी गटालाच घवघवीत येश लाभले होते. या दणक्याने हादरलेल्या जॉर्डन सरकारने, इराकी सैन्याने परत जावे म्हणून आता प्रयत्न सुरू केले व आपल्या हस्तकांना अधिक बळकटी यावी यासाठी नासरनेही जॉर्डनला सर्वतोपरी लष्करी मदत देण्याचे आश्वासन देऊन टाकले.

ब्रिटनला हा मोठा धक्काच होता. परंतु डोळे मिटून चालणाऱ्यांना, धक्केच बसत असतात. जॉर्डनमध्ये राष्ट्रवादाची लाट उसळून त्यांत जॉर्डनचा ब्रिटिश अधिकारी जनरल ग्लब याला अर्धचंद्र मिळाला ही घटना पुरेशी बोलकी असताना, केवळ इराकी सैन्य देशात आले म्हणून नासरप्रेमी राष्ट्रवादी गटाचा पराभव होईल, असे समजणे हा मूर्खपणा होता. आता नासरवादी राजवटीने तर धोरणच जाहीर केले की ब्रिटिश धार्जिण्या इराकी पंतप्रधान नुरी सैदचा नाद सोडून यापुढे जॉर्डन, इजिप्तशी अधिक घनिष्ठ संबंध प्रस्थापित करील.

पूर्वी जाहीर केलेल्या धमकीप्रमाणे इराकी सैन्य जॉर्डनमध्ये येताच, इस्रायली सेनेने जॉर्डन विरुद्ध हालचाल करणे आवश्यक होते. परंतु जॉर्डनमधील अधिकारावर आलेल्या नासरवादी गटाच्या नव्या धोरणानुसार, इराकी सैन्याची परस्पर हकालपट्टी होणार होती. जॉर्डनविरुद्ध आताच कारवाई करायची आवश्यकता नसली तरी नासरच्या कच्छपी लागलेला जॉर्डन, आज ना उद्या नासरच्या इशाऱ्यासरशी इस्रायलवरच चढाई करणार हे उघड होते. किंबहुना नासरला जॉर्डनचा आलेला उमाळा, ही इस्रायल द्वेषाचीच प्रतिक्रिया होती. बेन गुरियानने आता नवा डाव टाकला.

इस्रायलने युद्धाची जय्यत तयारी सुरू करावी परंतु पाहणाराला असे वाटावे की जॉर्डनमध्ये इराकी सेना आली, म्हणून जॉर्डनविरुद्धच ही कारवाई होणार आहे. प्रत्यक्षात मात्र लवकरात लवकर नासरला नेस्तनाबूद करण्याच्या दृष्टीने सिनायमधून धडक द्यायची. हाती आलेल्या बातम्यांनुसार, अँग्लो-फ्रेंचांची इजिप्तविरुद्ध लष्करी कारवाई सुरू होणारच होती. याच मुहूर्तावर इजिप्तला दणका दिला, तर नासरचा नक्षा कायमचा उतरेल, असा सर्व हिशोब बेन गुरियानने केला.

मोशे दायान हा युद्धाच्या तयारीला लागून जवळजवळ महिना होत आला होता. १ ऑक्टोबर १९५६ ला दायान पॅरिसला गेला असताना तेथेच फ्रेंच चीफ ऑफ स्टाफ, जनरल एली याच्याशी त्याने गुप्त भेट घेऊन वाटाघाटी केल्या. सुएझ कालवा प्रकरणात फ्रेंच लष्करी हालचाल करणार की नाही, केल्यास कधी करणार यासंबंधी

जनरल एलीने काहीही बोलण्यास नकार दिला. या विषयावर त्याला बोलता करण्याचे दायानचे सर्व प्रयत्न फुकट गेले. जनरल एलीने दायानला विचारले,

" तुम्हांला आमचेकडून काय मदत हवी आहे ?"

दायानने खिशातली लांबलचक यादी त्याचेपुढे टेवली. १०० सुपर शेरमन टँक्स, ३०० लष्करी मोटारगाड्या, ५० टँकवाहू मोटारी, ३०० ट्रकस्, १००० बंदुका व काही वाहतुकीची विमाने अशी ही मागणी होती.

जनरल एलीने एवढी लांबलचक यादी पाहून आश्चर्य प्रदर्शित करताच दायानने सांगितले—

" आमचा लष्करी व्याप फ्रान्सच्या १/४ एवढा आहे ! आमच्याकडे दारूगोळा व साहित्य आहे ते मात्र २०–३० दिवसांच्या लढाईला पुरेल एवढेच आहे. सिनायांचे द्वीपकल्प, आम्ही १५ दिवसांत कबजात घेऊ. आम्हांला टँकच हवेत असे नाही. टँक कमी पडले तर आम्ही लष्करी वाहनांवर–जीपांवर–बंदुका बसवून चढाई करू. आमची मुख्य गरज आहे ती वाळवंटातून झपाट्याने पळणाऱ्या लष्करी गाड्यांची. इजिप्त कितपत प्रतिकार करील ते मला माहीत नाही. परंतु वाळवंटातली लढाई सोपी जाणार नाही हे मला ठाऊक आहे. यासाठी वाहतुकीच्या लष्करी गाड्या व विमाने आम्हाला विपुल हवी आहेत. "

जनरल एलीकडून शक्य तेवढी मदत मिळण्याचे आश्वासन घेऊन दायान, त्याच रात्री इस्रायलला आला. दुसऱ्या दिवशी इस्रायलच्या जनरल स्टाफची बैठक ठरलेली होती. या बैठकीत लष्करी अधिकाऱ्यांपुढे बोलताना दायानने सांगितले—

" अजून सरकारने पक्का निर्णय केला नसला तरी नासरविरुद्ध चढाई सुरू होण्याची खूपच शक्यता आहे. २० ऑक्टोबरच्या सुमारास ही चढाई सुरू होईल व माझ्या अंदाजाप्रमाणे ती तीन आठवडे चालणार आहे. सुएझ प्रकरणात इंग्लंड व फ्रेंचांची जी प्रतिक्रिया दिसत आहे त्यानुसार, अकाबाच्या आखातातील इजिप्तची नाकेबंदी उठवण्यासाठी लष्करी हालचाल करण्यास योग्य संधी उपलब्ध होईल असे दिसते. सिनायचा ताबा आपल्याला घ्यायचा आहे. जॉर्डन व सिरिया ही अरब राष्ट्रेही इजिप्तच्या मदतीला जाण्याचा संभव आहे. या आघाड्याही सांभाळाव्या लागतील. आपल्या हालचालींचा नासरला सुगावा लागू नये, यासाठी इराकी फौजा जॉर्डनमध्य आल्यास, जॉर्डन नदीचा पश्चिम किनारा व्यापण्याची ही तयारी वाटावी, अशा तऱ्हेने सर्व हालचाल करावयाची आहे. "

परदेशांतील लष्करी महाविद्यालयांतून शिक्षण घेणाऱ्या इस्रायली तरुणांना यासाठी परत बोलावण्याचे दायानने ठरवले. प्रत्यक्ष रणांगणावरचा अनुभव हाच शेवटी सर्वांत महत्त्वाचा असतो.

अरब घूसखोरांनी चालवलेले अत्याचार नादानपणे सहन करीत राहण्यापेक्षा, एकदा या गोष्टीचा सोक्षमोक्ष लावण्यास इस्रायली सेनेतील सर्व लहानमोठे अधि-

कारी अतिशय उत्सुक होते. लष्कराच्या मनातील भाषा दायान बोलू लागताच त्यांच्या मनावरचा सर्व ताण आता संपला. बैठकीच्या अखेरीस एका अधिकाऱ्याने प्रश्न विचारला—

" नासरच्या मदतीला रशिया किंवा रशियांकित लाल राष्ट्रे धावली तर ?"

दायानने प्रश्न आधीच तोडला. तो म्हणाला—

" युद्ध जितके झपाट्यासरशी आपण संपवू तितकी कुणी मदतीला येण्याची आशा कमी. कुणी आलेच तरी रशियन मुळीच येणार नाहीत ! त्यांची प्यादी, झेक किंवा पोलिश सैनिक येतील. ही मदत बहुधा वैमानिकांची असेल. तसे झाले तर त्यांना आपले विमानदळ वरच्यावर अस्मानातच गाठील, याची मला खात्री आहे."

३ ऑक्टोबरला पॅरिसहून इशारा आला की मागितलेले जवळजवळ सर्व रण-साहित्य इस्रायलला निघालेले आहे. दायानचा उत्साह यामुळे शिगेला पोचला. लष्करी गाड्यांची डागडुजी व जमवाजमव सुरू झाली. प्रत्यक्ष आक्रमण सुरू होण्या-पूर्वी फक्त ५–६ दिवस आधीच, मुलकी खात्यांतून काम करणाऱ्या व खासगी उद्योगधंदा करणाऱ्या लष्करी शिक्षण घेतलेल्या देशबांधवांना सैन्यात बोलावण्याचे ठरले. कारण मुलकी कामे, शेतीभाती, कारखाने हे कमीतकमी दिवस बंद ठेवणेच आवश्यक होते.

८ ऑक्टोबरला मोहिमेचा प्रत्यक्ष आराखडा दायानपुढे आला. "सुएझ कालव्याच्या परिसरातील अगदी पश्चिम टोकाची मोक्याची ठाणी छत्रीधारी सैनिकांनी प्रथम कबजात घ्यावी. त्यांच्याशी आक्रमक सेनेला संपर्क साधण्यास निदान ४८ तास लागतील. या पहिल्या घडाक्यानंतर प्रथम अल् अरिश घ्यावे, नंतर अबू अगेला व शार्म एल् शेख यांचा कबजा करावा. मोहिमेच्या अगदी शेवटी गाझा पट्टी सर करावी."

या आराखड्यानुसार छत्रीधारी सैनिकांना दोन महत्त्वाच्या कामगिऱ्या पार पाडावयाच्या होत्या. सुएझ कालव्यानजीकच्या मिट्ला खिंडीचा परिसर प्रथम कबजात घेऊन तो किमान दोन दिवस झुंझवायचा व इस्रायली सैन्य तेथपर्यंत पोचताच पुन: जमवाजमव करून शार्म एल् शेख शहराच्या शत्रू सैनिकांच्या फळी-मागे उतरून शहराला शह लावायचा.

मोहिमेचा आराखडा पक्का करून दायानने काही कमांडरच्या बदल्या अनपेक्षित-पणे केल्या. काही अनुभवी सेनाधिकारी हे लष्करी प्रशालांतून कामे करीत अस-ताना, त्यांच्या जागा इतरांकडे येतात. परंतु प्रत्यक्ष लढाईपूर्वी अशा अनुभवी सेना-धिकाऱ्यांकडेच पुन: सूत्रे देणे आवश्यक असते. ऐन लढाईच्या तोंडावर आपल्या जागा काहींना सोडाव्या लागल्यामुळे, काहीसा असंतोष निर्माण होणे अपरिहार्य असते. परंतु अखेर सेनापतीलाच अधिक कळते ही समजूत पक्की असली की ' अक-थित कहाण्या ' निर्माण होत नाहीत !

## चाचणी प्रयोग

एवीतेवी आता युद्ध होणारच होते. तेव्हा प्रथम युद्ध सुरू होण्यापूर्वी छत्रीधारी सैनिकांची चाचणी घ्यावयास दायान संधी शोधीत होता. याच संबंधात एका चिघळत्या प्रकरणाकडे त्याचे लक्ष वेधले. सप्टेंबर महिन्यात एका इस्रायली खेड्यात शिरून तीन इस्रायली नागरिकांचा जॉर्डन सरहद्दीवर वावरणाऱ्या अरब घूसखोरांनी खून पाडला होता. हे तिघे कोण आहेत याची बातमी इस्रायली गुप्तचर खात्याने मिळवली व लगेच जॉर्डनच्या राजाला, या तिघांविरुद्ध कारवाई करा असा आग्रह धरणारे निषेधपत्र इस्रायलने धाडले होते. या तिघांना सरहद्दीवरील जॉर्डन पोलिसांनी नंतर अटकही केलेली होती. परंतु इस्रायलचा निषेध खलिता पोचताच या तिघांना जॉर्डनच्या राजाने सोडून दिले.

जॉर्डनच्या राजाचे हे कृत्य आगीत तेल ओतणारे होते. इस्रायली नागरिकांचे खून पाडणाऱ्यांना उत्तेजन देणारी ही घटना होती. आगळीक करणाऱ्याचे थोबाड लगोलग फोडले गेले, तरच त्या प्रतिक्रियेचा योग्य तो अर्थ जगात लागतो. निषेधाचा घोळ घालीत कालापव्यय केला, तर संतापही ओसरतो आणि शत्रूही माजतो. या दृष्टीने मोशे दायानने या घटनेचा सूड घेण्यासाठी कारवाई करण्याचे ठरवले. ९ ऑक्टोबरला जॉर्डनच्या राजाने खुनी लोकांना मोकळे केल्याचे वृत्त आले...आणि १०–१०–१९५६ या दिवशी रात्री जॉर्डनच्या सरहद्दीतील, इस्रायलच्या सीमेजवळच्या ' कलकिलिहा ' येथील किल्ल्यावर छापा घालून तेथील लष्करी ठाणे उध्वस्त करण्याचा आदेश सुटला. ही कामगिरी सोपविली गेली छत्रीधारी सैनिकांवर ! मात्र या छाप्यात छत्रीधारी सैनिक किल्ल्यावर उतरून छापा घालण्याची कल्पना नसून या सैनिकांना प्रत्यक्ष घातपातीच्या लढाईचे शिक्षण मिळावे हा हेतू होता.

११ ऑक्टोबरला रात्री ९ वाजता ही ब्रिगेड कलकिलिहा दुर्गाच्या परिसरात पोचली. जॉर्डेनियन सैनिकांनी किल्ल्यावरून गोळीबारी सुरू केली. सर्च लाईट–प्रकाशझोत फेकणारी पथके, इस्रायली सैनिकांबरोबर होती. किल्ल्यावरून सुरू झालेला गोळीबार अंधारात आटोपला. नंतर किल्ल्यावर प्रकाशझोत सोडून २०० यार्डावरून इस्रायली सैनिकांनी किल्ल्यावर तोफा डागल्या. सर्व सैनिकांनी मग किल्ल्यावर एकदम एल्गार केला. २ कंपनी जॉर्डेनियन सैन्य किल्ल्यावर होते. किल्ल्याच्या तटबंदीत हातघाईची लढाई जुंपली. इस्रायली सेनेचा एक कंपनी कमांडर व त्याचा उपाधिकारी असे दोघे धरून आठ इस्रायली सैनिक ठार झाले. ११॥ वाजेपर्यंत झुंज चालू राहिली. मग जॉर्डेनियन सेनेने ठाणे स्वाधीन केले. प्रमुख इमारत निर्मनुष्य करून इस्रायली सेनेने अपरात्री सर्व इमारत बॉम्बगोळ्यांनी उडवून दिली.

या किल्ल्यापासून १० मैलांवर खिरबेट येथे ' अरबलियन 'ची ९ वी बटालियन उभी होती. ही बटालियन जॉर्डेनियनांच्या मदतीला निघेल तेव्हा तिला अडवण्या-

साठी, इस्रायली सेनेची एक तुकडी जॉर्डन सरहद्दीत ६ मल घुसून रस्त्याच्या कडेला दबा धरून बसली होती. अपेक्षेप्रमाणे १५ ट्रक्स भरून अरबलियनचे सैनिक या रस्त्यावरून किल्ल्याकडे जाऊ लागताच, दबा धरून बसलेल्या इस्रायली तुकडीने चौफेर गोळीबार केला. पहिले पाची ट्रक उद्ध्वस्त झाले. पुढच्या पाचांची ही दशा पाहताच मागचे १० ट्रक उलट दिशेने पळत सुटले.

तरीपण कलकिलिहाचा किल्ला उध्वस्त करून परत येणाऱ्या इस्रायली ब्रिगेडला, जॉर्डनेयियन सैन्याने पुनः कात्रीत पकडले. परतताना इस्रायली सैनिक दमलेले होते, व जॉर्डनेनियन सैन्य ताज्या दमात होते. अखेर काही अधिक सैनिक गमवून इस्रायली ब्रिगेड पहाटे ३ वाजता जखमी सैनिकांसह इस्रायली हद्दीत परतली.

कलकिलाहिवरील इस्रायली छाप्याचे पडसाद, फारच तीव्र उमटले. अँग्लो–जॉर्डन संरक्षण करारानुसार जर लढाई सकाळपर्यंत चालू राहती, तर जॉडनच्या राजाच्या विनंतीनुसार इंग्लंड जॉर्डनच्या मदतीला गेले असते असे एका मध्यपूर्वेकडील ब्रिटिश सेनेच्या प्रमुखाने सांगितले. जरूर लागती तर इंग्लंडचे विमानदलही, जॉर्डनच्या मदतीला गेले असते असेही त्याने जाहीर केले.

यानंतर दोनच दिवसांनी इराकचा पंतप्रधान नुरी सैद यावर दडपण आणून इंग्लंडने इराकी सेनेची आघाडीची पथके जॉर्डनमध्ये पुढे आणली. इराकी सेनेचे जॉर्डनमध्ये येणे मंजूर नाही, असे बेन गुरियानने सांगितले असल्याने वरवर पाहणाराला इस्रायल–जॉर्डन यांच्यात लवकरच लढाई पेटणार असेच वाटले तर नवल नाही !

पूर्वी सांगितल्याप्रमाणे बेन गुरियान व मोशेदायान हे मोठा डाव खेळत होते. सिनायवरील हल्ल्याची तयारी सुरू असताना नासर गाफील राहावा, यासाठी जॉर्डनशी जाहीर हुज्जत सुरू करण्यात आली होती. इस्रायली सेनाधिकारी मग्न होते ते मात्र सिनायच्या मोहिमेचा आराखडा आखण्यात. जॉर्डनच्या दिशेने काही गडबड होण्याची आशा तूर्त तर मावळलीच होती. नासरवादी गटाने जॉर्डनच्या निवडणुका जिंकून, इराकी सैन्याला जॉर्डनमध्ये जॉर्डनियनांचाच परस्पर शह बसवला होता. इजिप्तच्या कड्यातून जॉर्डनेला बाहेर काढण्याचा इंग्लंड व इराकचा डाव साफ कोलमडला होता. आता जॉर्डन इजिप्तच्या नासरशहाचे मांडलिक होणार होते, आणि जॉर्डनच्या मदतीने आता इस्रायल नाशाचे स्वप्न अधिक जवळ आले या सुखस्वप्नात नासर होता.

## ‘ कडेश ’ मोहिमेचा आराखडा

सिनायवरील मोहिमेचे कागदोपत्री वापरावयाचे गुप्त नाव ठरले होते–‘ कडेश. ’ ५ ऑक्टोबर १९५६ लाच ‘ कडेश ’ मोहिमेचा आराखडा इस्रायली सेनाधिकाऱ्यांनी तयार केला होता. मध्यंतरीच्या काळात बरेच फेरबदल करून

मोशे दायानने २५ ऑक्टोबरला सिनायच्या चढाईचे हे आज्ञापत्र सहीशिक्क्यानिशी सेनेच्या हवाली केले. ही आज्ञा पुढीलप्रमाणे होती.

अत्यंत गुप्त.

२५ ऑक्टोबर १९५६

विषय–प्रत्यक्ष चढाईचा आराखडा, चढाईचा हेतू :

(१) सुवेझ कालव्याला धोका निर्माण करण्यासाठी, परिसरातील मोक्याची ठाणी जिंकणे.

(२) तिरानची सामुद्रधुनी कब्जात घेणे.

(३) सिनायमधील इजिप्तच्या सेनेत गोंधळ निर्माण करून त्याचा निकाल लावणे.

पद्धत :

सोमवारी दि. २९-१०-५६ ला सायंकाळी ५ वाजता चढाई सुरू होईल.

अध्याय पहिला : पहिल्या दिवसाची रात्र (२९–३०।१०)

(अ) नखल–सुएझ या मार्गातील मिटला खिंड छत्रीधारी सैनिकांनी कबजात घेणे.

(ब) नखल जिंकणे.

(क) कुन्टीलला व रास एन नारवेब जिंकणे.

(ड) नखल–कुस्सिना ही हद्द मोकळी करणे.

(इ) रास एन नाखेब–नखल ही हद्द मोकळी करणे.

(फ) ३०।१० सकाळपासून इस्रायलमधील सर्व संरक्षणाची व्यवस्था जय्यत ठेवणे.

(ग) विमानदल व आरमार यांनी चढाई सुरू झाल्यापासून केव्हाही खालील कामगिरीसाठी सज्ज असावे. इस्रायलच्या आकाशातील शत्रू विमानांचा समाचार, चढाई करणाऱ्या सैन्याला मदत, व इजिप्तच्या विमानतळावर हवाई हल्ले.

अध्याय दुसरा : दुसऱ्या दिवसाची रात्र (३०–३१।१०)

(अ) रास-एन-नाखव–शार्म एल शेख रेषेवर चढाई जारी ठेवणे.

(ब) जॉर्डनच्या दिशेने होणाऱ्या आक्रमणाचा प्रतिकार.

(क) कुस्सिमा जिंकणे.

(ड) सिरिया व लेबानन सरहद्दीची काळजी घेणे.

अध्याय तिसरा : तिसऱ्या दिवशीची रात्र (३१।१० व १।११)

(अ) तिरानच्या आखाताचा कबजा.

(आ) राफा, अबुअघैला आणि अल्–अरिश सर करणे.

(इ) सुएझ कालव्याच्या पूर्वेला १५ किलोमिटर अंतरावर इस्रायली सेनेची समांतर फळी उभारणे.

(ई) सुदर-एल्-हैतान-शार्म एल शेख अशी बिरमोर व बिरतोर मधून जाणारी रेषा मोकळी करणे.

— मोशे दायान

— मेजर जनरल

चीफ ऑफ जनरल स्टाफ.

सेनाधिकाऱ्यांना हा चढाईचा हुकूम सुपूर्त करण्यापूर्वी, त्यांच्यापुढे केलेल्या भाषणात दायानने सांगितले—

"आपल्या मोहिमेचे दोन भाग राहणार आहेत. अँग्लो फ्रेंच यांनी इजिप्तविरुद्ध लष्करी कारवाई सुरु करण्यापूर्वीचा काळ आणि नंतरचा काळ. अँग्लो–फ्रेंच कारवाई सुरू होताच, इजिप्तचे बॉम्बहल्ले थांबतील व विमाने अँग्लो–फ्रेंचांविरुद्ध उपयोगासाठी काढून घेण्यात येतील. सिनायमधून नासर आपले सैन्यही मागे खेचील, जे मागे राहील ते गर्भगळीत झालेले असेल म्हणून अँग्लो–फ्रेंच चढाई सुरू झाल्यानंतर ज्या गोष्टी सहजासहजी घडतील त्या तत्पूर्वी करण्याची घाई आपण करू नये.

आपल्या संरक्षण मंत्र्यांना अशी भीती वाटते आहे की अँग्लो–फ्रेंच लष्करी कारवाई इजिप्तविरुद्ध सुरू होण्यापूर्वी इजिप्तचे विमानदल तेल अव्हिव्ह आणि हैफा या आपल्या शहरावर त्यांच्या 'इल्युशियन' विमानांनी बॉम्बफेक करून, पुष्कळच प्राणहानी घडवतील. मला ही भीती वाटत नाही. अर्थात याचा अर्थ बॉम्बफेक झाली तरी आपली प्राणहानी होणार नाही असा नाही. परंतु मला वाटते की चढाई सुरू होताच, हा हल्ला एका मोठ्या मोहिमेचा भाग आहे ही गोष्ट सुरुवातीला काही काळ इजिप्तच्या ध्यानीच येणार नाही. त्यामुळे इस्रायलवर लगेच बॉम्बफेक ते सुरू करणार नाहीत. सरहद्दीवरच्या नेहमीच्या सूडांच्या चकमकीसारखीच ही हालचाल आहे, या भ्रमात ते काही काळ राहतील.

याच हेतूने मी आज मोहिमेच्या पूर्वीच्या आराखड्यात महत्त्वाचा बदल केला आहे. आता आपण प्रथम झडपेसरशी कबजा करणार आहोत तो मिटला खिंडीचा. भूमध्य समुद्रालगतच्या किनारपट्टीने, सिनायच्या उत्तर पट्टीतून इस्रायल–इजिप्त यांना जोडणारा रेल्वे मार्ग जातो. याच मार्गाशेजारी डांबरी सडक धावते, याच पट्टीत विमानतळ आहेत आणि याच भागात गोडे पाणी आहे. अर्थात याच भागात इजिप्तची प्रायः बहुतांशी फौज एकवटलेली आहे. मिटला खिंड ही सुवेज कालव्याच्या दक्षिण भागालाच निकट आहे. इस्रायलशी ती जोडलेली आहे ती रेताड वाळवंटाने. या खिंडीचा आसमंत तर जवळजवळ निर्मनुष्य आहे. आपल्या छत्रीधारी सैनिकांनी या खिंडीचा कबजा केला, तर तो नुसता छापा आहे असेच अरब सेनेला वाटेल. सिनायमधली अल अरिश–बिर गाफगफा या शहरांना जोड-



**माघार आपल्या सरहद्दीत नको – मोशे दायान**

णारा असा भोवतीचा प्रदेश जिंकल्याखेरीज सिनायचा कबजा करणे शक्य होईल, अशी शंकादेखील इजिप्त सेनानींना येणार नाही. दुसऱ्या दिवशी आपण नखल सर केले तर तेदेखील मिटलावर छापा घालणाऱ्या सैनिकांना निसटता यावे यासाठी आहे, व मिटला व नखल सोडून इस्रायली सैनिक परत जाणार आहेत अशाच समजुतीत इजिप्त सैन्य राहील. इजिप्तला मला मोहिमेचा सुरुवातीचा काही काळ संभ्रमातच ठेवावयाचे असल्याने, चढाईची सुरुवात विमानतळावरील बॉम्बफेकीने या वेळी होणार नाही. जर माझा सर्व अंदाज फसला तर मात्र ही संधी दवडल्याबद्दल पश्चात्ताप करावा लागणार आहे हे मी कबूल करतो.

मला आशा आहे की मीच बरोबर ठरेन. पहिल्या दिवशीची लढाई नखल–मिटला या आसाभोवतीच होईल; आणि याच दिशेने सिनायमध्ये घुसलेले आपले सैन्य वाटचाल करू लागेल. एक–दोन दिवसांतच अँग्लो–फ्रेंचांची कारवाई सुरू होईल. मग आपण दोन दिशांनी रेटा देऊ. दक्षिणेकडे शार्म एल शेखच्या दिशेने एक आघाडी असेल आणि दुसरी उत्तरेकडे अल–अरिशवर मोर्चे लावील. यदाकदाचित अपेक्षेप्रमाणे घटना घडल्या नाहीत, तर नखल - मिटला भागातून माघार घेऊ व नेहमीप्रमाणे हा छापा होता असे जगाला सांगू."

## दायान सावध होता

ही बैठक चालू असताना कुणीतरी विचारले–

' सिनायमध्ये पाय रोवण्याचा आपला विचार आहे की पुन: सिनाय सोडून मागे यायचे आहे ? "

प्रश्न बरोबर होता ! देशासाठी जवानांनी आपले रक्त आणि त्याच्या गोता-

वळचाने आपले अश्रू देऊन महत्त्वाची ठाणी जिंकून घ्यावी आणि पोटातले पाणीही न हलल्यामुळे पोटें सुटलेल्या, राष्ट्राच्या म्होरक्यांनी, शांततेच्या खोट्या मृगजळामागे धावून सेनेला ही ठाणी समझोता म्हणून सोडायला लावावी हा प्रकार नेहमीच घडतो. दायान सावध होता. त्याने उत्तर दिले–

" काहीही असले तरी सगळा सिनाय जिंकून घेणे हे आपले पहिले काम आहे. मग मागे यायला लागले तरी ही माघार आपल्या देशाच्या सरहद्दीत तरी असणार नाही ! "

इजिप्तच्या वतीने जार्डन, या युद्धात उतरणार हे नक्कीच होते. जॉर्डनचे नवे पंतप्रधान नाबुलशी व चीफ ऑफ स्टाफ अली अबू नावर ही नासरचीच प्यादी होती. यामुळे २६ तारखेला रात्रीपासून इस्रायलच्या गुप्तचर–विभागाने इराकी सैन्य जॉर्डनमध्ये शिरल्याच्या बातम्या पसरवण्यास सुरुवात केली.

रणसाहित्य घेऊन निघालेली फ्रेंचांची जहाजे २७ ऑक्टोबरला इस्रायलला पोचली. यात प्रमुखतः रणगाडे व लष्करी वाहने होती. त्याच दिवशी सायंकाळी इजिप्त–इस्रायल सरहद्दीवरील, निट्झाना, कुस्सिमा, कुन्टिला व रास एल नारवेल या ठिकाणी असलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या राखणदारांना, ही शहरे सोडून जाण्याची सूचना मोशे दायान याने पाठविली. कारण २९ तारखेला सायंकाळीच या ठिकाणांचा कबजा इस्रायली फौज करणार होती.

२९ ऑक्टोबरला रात्री इस्रायलमधील सर्व शहरांत प्रकाशबंदी जारी करण्याची मुलकी अधिकाऱ्याची सूचना, दायानने फेटाळून लावली. त्याला अकारण घबराट आणि चिंता मंजूर नव्हती.

या मोहिमेवर जाण्यासाठी लष्कराबाहेरील लष्करी शिक्षण घेतल्यानंतर इस्रायलमध्ये नागरीजीवन जगणाऱ्या एक लाख लोकांना हुकूम सुटलेले होते. आश्चर्य म्हणजे यांपैकी ९० टक्के नागरिक स्वखुषीने सैन्य दाखल झाले होते. प्रत्यक्ष मोहिमेची सुरुवात होण्यापूर्वी बाकीचे दाखल होतील असा अंदाज होता. नागरिकांची खासगी मोटार वाहने सैन्याने मागितली होती. सुमारे १३-१४ हजार खासगी मोटारगाड्या, नागरिकांनी सैन्याच्या हवाली केल्या होत्या. खासगी मोटारी जितक्या चित्र-विचित्र रंगाच्या आणि प्रकारच्या असतात त्या प्रकारच्याच या हजारो मोटारी होत्या. अशा चित्रविचित्र वाहनांनी आगेकूच करू पाहाणारी इस्रायली सेना, ही जगात अशी पहिलीच असावी. सगळे राष्ट्र एकदिलाने नेत्याच्या मागे उभे असले, की काय चमत्कार घडतो याचे हे एक उदाहरण होते. सांगण्यांत आले होते की लढाई जॉर्डनविरुद्ध सुरू होण्याची शक्यता आहे आणि प्रत्यक्षात ही वाहने, सिनायवर स्वारी करण्यास सज्ज झालेल्या, इस्रायली सेना विभागाकडे धाडण्यात येत होती.

## आयसेन हॉवरची 'मध्यस्थी'

इस्रायलमध्ये लष्करी जमवाजमव सुरू झाल्याचे वृत्त अमेरिकेत पोचताच, अमेरिकेचा अध्यक्ष आयसेन-हॉवर याने २७ ऑक्टोबरला बेन गुरियानला तार दिली.

"इराकी सैन्य जॉर्डनमध्ये घुसल्याच्या बातम्या निराधार आहेत. तुम्ही सुरू केलेली लष्कराची हालचाल व सामुदायिक भरती काळजी वाढवणारी आहे."

बेन गुरियानने लवाडीचे उत्तर धाडले. यात मुख्य प्रश्नाला बगलच होती—

"इजिप्तचे आक्रमक धोरण आम्हांला धोकादायक आहे. संरक्षणासाठी आम्हाला उपाय योजलेच पाहिजेत."

दुसऱ्या दिवशी आयसेन हॉवरकडून दुसरी तार आली. त्यात पुन: घबराट निर्माण करू नका असा धमकीवजा इशारा होता—"आपल्या दोन्ही देशांचे मैत्रीचे संबंध व शांतता यात बिघाड होईल असे काही करू नका!"

मात्र पाठोपाठ अमेरिकन सरकारने आपापल्या वकिलातींना सूचना दिल्या की इजिप्त, जॉर्डन, सिरियामधील अमेरिकन नागरिकांना तावडतोब देश सोडूना जाण्यास सांगा.

आपल्या दुसऱ्या तारेत अध्यक्ष आयसेन हॉवर यांनी कळविले होते, "२५ मे १९५० रोजी, अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स यांनी मध्यपूर्वेतील देशांच्या अस्तित्वात असलेल्या सरहद्दीचा भंग होऊ दिला जाणार नाही, असे आश्वासन दिलेले आहेच. इस्रायलच्या संरक्षणाचा प्रश्न मी, इंग्लंड-फ्रान्सशी चर्चा करून त्यांच्यापुढे मांडीन."

अमेरिकेचे अध्यक्ष महाशय कसल्या अंधारात चाचपडत होते पाहा! याचा अर्थ इजिप्तविरुद्ध लष्करी कारवाई सुरू करण्याचा कट इंग्लंड–फ्रान्सने केला होता, याची गंधवार्ताही अमेरिकन सरकारला नव्हती. मध्यपूर्वेत शांतता रक्षणाची हमी दिलेल्या तीन श्रेष्ठींपैकी दोघेजण, काही दिवसांतच स्वत:च या भागात लढाई सुरू करणार होते. एकदा हे युद्ध पेटले की इंग्लंड व फ्रान्स ही दोन्ही राष्ट्रे इस्रायलच्या बरोबरीने नासरचा नक्षा उतरवण्यासाठी झटणार होती. . . . आणि या तिघांविरुद्ध अमेरिकेला उभे राहावे लागणार होते. अमेरिकेचे अध्यक्ष आपल्या तारेत सांगत होते—

"मला वाटणारी चिंता, मध्यपूर्वेतील इतर देशांना कळवण्याची मी व्यवस्था केली आहे. माझे या देशांना सांगणे आहे की शांततामंग होईल असे या देशांनी काही करू नये."

जोपर्यंत स्वत:चे काही जळत नसते, तोपर्यंत जगातली बडी राष्ट्रे अशीच उंटावरून शेळ्या हाकणारे, फसवे, जुजबी शब्दप्रयोग करीत असतात. काय अर्थ होता या शब्द बुडबुड्यांना? वापरून वापरून गुळगुळीत झालेल्या या शब्दांना आता निर्माल्याची अवकळा आलेली आहे. सरहद्दीचा भंग झाला, दुर्लक्ष करा. तुमच्या मुलखात बळजबरीने शिरून खून पाडले, सहन करा. तुम्हाला नष्ट करण्याच्या उघड वल्गना करून शत्रू राष्ट्र शस्त्रसज्ज होत असले तरी स्वस्थपणे हात बांधून

बसा, नाकेबंदी झाली–भिऊ नका. आम्ही ' राष्ट्रोत्तम ' तुमच्या पाठीशी आहोत--- बापहो ! तुमची नपुंसक धोरणे सोडून शांतताभंग होईल असे तुम्ही मात्र काही करू नका ! इतर देशांची क्षात्रवृत्ती, स्वाभिमान आणि देशप्रेम सतत खच्ची करीत, जगात स्वतःकडे आलेले स्वामित्व अखंड कसे टिकावे यासाठी दुबळयांचा दीस गोड करण्याचा हा बडया राष्ट्रांचा अट्टाहास असतो. परंतु एखादे इस्रायलसारखे लहानसे राष्ट्र या जाळयात क्वचित अडकत नाही. स्वाभिमानाची छोटोशी ठिणगी सणसणत उठते आणि शिरजोरांची शिबिरे जाळू लागते. शांतताभंग होताच जणू आकाश कोसळले, अशी धावपळ मग ही बडी धेंड सुरू करतात. आक्रमक कोण, आगळीक कुणी केली, सत्य काय आहे या रोखठोक प्रश्नांची उत्तरे देण्याचे टाळून मग एकच आक्रोश चौफेर सुरू होतो– " आधी हो लढाई थांबवा हो ! सीज फायर करा ! ! युद्धबंदी रेषा आखा ! " कधी कधी कुणाला हे सर्व नाटक पाहून उबग येतो. मग तिरमिरीत एखादा दुबळ्या देशाचा ' बहादुर ' गर्जना करतो-- " We will not go from one cease fire to another cease fire... पुनः पुन्हा युद्धतहकुबी आम्ही करणार नाही. काय तो सोक्षमोक्ष आता लावू. " छे: छे: तसे काहीच घडत नाही ! कारण शांतता काळात जो देश दुबळा असतो तो युद्धकाळातही दुबळाच राहतो ! रक्ताच्या शिंपलेल्या सडयावरून, जवान परत मागे येतात. पुनः त्याच जागतिक शांतता, सहजीवन आणि अशाच चावून चोथा झालेल्या शब्दांना ऊत येतो. पुनः सीज-फायरच होते ! जुनेच गाणे ऐकू येते— झाले गेले विसरून जा ! एखादा मोशे दायान मात्र या गाण्याचा ठेका चुकवतो ! !

इस्रायलचे नेते बेन गुरियान व मोशे दायान यांनी या वेळी अमेरिकन अध्यक्षाचे पाणी जोखले होते. केवळ इंग्लंड–फ्रान्स यांनी अंधारात ठवल्यामुळे मध्यपूर्वेतील घडामोडींबाबतचा आयसेनहॉवरचा सल्ला चुकीचा होता, असा हा निष्कर्ष नव्हता. मोशे दायान आपल्या दि. २९ ऑक्टोबर १९५९ च्या दैनंदिनीत लिहितो— (क्रमशः)




# वाल्याचा आमदार वाल्मिकी कसा झाला ?

- द. मा. पुराणिक

एका अरण्यात वाल्या कोळी नावाचा एक लुटारू गुंड रहात होता. आपली गुंडगिरी बरी, आपण बरे, अशी त्याची वृत्ती होती. लोकांना धाक दाखवावा, त्यांचे पैसे घ्यावेत आणि आपले घर चालवावे एवढेच त्याला माहीत होते. यापेक्षा अधिक त्याला काहीही कळत नव्हते. येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूंचे अडपझडप पळवावे आणि प्रपंच भागवावा एवढेच त्याला माहीत होते. इतर कुठल्याही भानगडीत स्वारी पडलेली नव्हती.

एकदा असे झाले की, जागतिक निवडणुकींचे दिवस आले आणि मुनीवर्य नारदाची स्वारी आपले कलापथक घेऊन प्रचार करण्यासाठी म्हणून त्या भागात आली ! 'नारायण नारायण, व्होट फॉर नारायण' अशा घोषणा करीत त्यांनी तेथे व्यासपीठ उभारले. टेबलखुर्ची ठेवली. लाऊडस्पीकर लावून सभेची गर्दी जमण्यासाठी आपल्या कलापथकाचा कार्यक्रम सुरू करणार तेवढ्यात वाल्या कोळ्याने आणि त्याच्या साथीदारांनी त्यांना अडवले. बाचाबाची, शिवीगाळ सुरू केली. वाल्या कोळ्याने तर नारदमुनींचा गळाच धरून पैसे काढ, नाहीतर जिवे मारतो म्हणून धमकी दिली.

वाल्या कोळ्याची ही गुंडगिरी पाहून नारद खुष झाले.

"तू कोणत्या पार्टीचा मेंबर आहेस ?" त्यांनी विचारले.

"पार्टीबिर्टी मी ओळखत नाही. पैसे काढ आधी. नाहीतर ही तंबोरी फोडतो बघ." वाल्या कोळी गरजला.

"माझ्यासारख्या भणंग भिकाऱ्याच्या अंगावरदेखील हात टाकून पैसे लुबाडायला तू कमी करीत नाहीस हे पाहून मला आनंद झाला. तुझी गुंडगिरी अव्वल दर्जाची आहे याबद्दल माझी खात्री पटली. तुझ्या अंगी एवढी थोर कला असताना तू या अरण्यात का खितपत पडला आहेस ? शहरात चल, म्हणजे तुझ्या या कलेचं सार्थक होईल."—नारदमुनींनी उपदेश केला.

वाल्या कोळी गोंधळून गेला. त्याने या गोष्टीचा विचारच कधी केला नव्हता. गुंडगिरी त्याच्या घराण्यात चालत आली होती. म्हणून तोही गुंडगिरी करीत होता इतकेच. यापेक्षा आज या कलेचा अधिक उपयोग होण्यासारखा आहे काय हे त्याला माहीत नव्हते. आपले अज्ञान त्याने कबूल केले.

नारदमूनी त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले,

"हे बघ, तू आता घरी जा. आपल्या बायका मुलांना विचार. म्हणावं, मी

आतापर्यंत जे काही केलं त्यात भर घालता येईल अशी काही कल्पना तुमच्याजवळ आहे काय ? गुंडगिरीचे क्षेत्र वाढवून मुबलक पैसा आणि कीर्ती मिळविता येईल— तेही थोडक्या श्रमात असा काही प्लॅन तुमच्याजवळ आहे काय ? ते काय म्हणतात ते मला सांग. मी इथंच थांबतो."

नारदांच्या बोलण्याने आणि विशेषत: त्यांच्या पाठीवर थाप मारण्याच्या उद्योगामुळे वाल्या कोळ्यावर बराच परिणाम झाला होता. घरी जाऊन तो विचारून आला. पण कुणाजवळ कसलाही प्लॅन नव्हता. वाल्याच्या गुंडगिरीचा अधिक उपयोग होईल, अशी कसलीही योजना त्यांच्याजवळ नव्हती. निराश होऊन वाल्या परत आला. म्हणाला "आचार्य, आज माझा भ्रमनिरास झाला. सगळे आमच्या घरातले बेवकूफ आहेत. नुसते माझ्या जीवावर खाताहेत अन् चैन करताहेत. माझ्या कलेला व्यापक स्वरूप देण्याइतकी बुद्धी एकाही जवळ नाही."

"तेच मी तुला सांगत होतो."

"मग आता मी काय करू ?"

"तू आता जवळपासच्या शहरात चल. लोकांच्या बाबतीत 'मरा मरा' असा मंत्र मनातून जप. 'मी—मी' हा मंत्र सारखा मुखावर ठेव. आणि राजकारण सुरू कर. तुझ्या आयुष्याचं अन् तुझ्या अंगातल्या गुणांचं सार्थक होईल."

एवढा प्रचार करून आचार्य नारद त्या मतदारसंघातून निघून गेले. वाल्या कोळ्याचे डोळे मात्र उघडले ते उघडलेच. त्याने तेव्हापासून साधी, शुद्ध गुंडगिरी बंद केली. तो राजकारण करू लागला. त्याने फार मोठी तपश्चर्या केली. तो एके जागी शहरात जाऊन तळ ठोकून बसला. हळूहळू त्याने स्थानिक राजकारणात आणि निवडणुकीत भाग घेतला. अत्यंत निष्ठापूर्वक गुंडगिरीचे व्रत पुढे चालू ठेवले. भेटेल त्या माणसाला तो 'मरा मरा, खुशाल मरा' म्हणू लागला. पहिल्यांदा तो नगरपालिकेचा मेंबर झाला. मग लवकरच आपल्या चिकाटीच्या बळावर तो नगराध्यक्ष झाला. मग जिल्हा परिषद, सहकारी बँक, सोसायट्या, आयात—निर्यात परवाने, सरकारी ठेके असे करता करता तो त्यात इतका रममाण झाला की, आपण पूर्वी कोण होतो, हेही त्याच्या आठवणीत राहिले नाही. वर्षामागून वर्षे लोटली. पण आपल्या या गुणांच्या जोरावर त्याने अमाप पैसा मिळवला. दिवसरात्र राजकारणाशिवाय त्याला सुचेनासे झाले. त्याने घर बांधले, बंगला बांधला. हॉटेलमध्ये आणि पेट्रोलपंपात भागीदारी केली. त्याची निष्ठा पाहून लोक चकित होऊन गेले. हळूहळू त्याच्या देहातही फरक पडत गेला. साध्या, फाटक्या अंगाचा वाल्या दिवसेंदिवस गलेलठ्ठ होऊ लागला. त्याचे अंग भलतेच स्थूल होऊ लागले. चरबीचा थरच्या थर त्याच्या मूळच्या अंगावर चढला. त्याचे डोळे मांसात बुडून गेले. गळ्याखाली चरबीची पोळी लोंबू लागली. त्याचे मूळचे रूप पार बदलून गेले. कोणालाही तो ओळखू येइनासा झाला. राजकारणामुळे तो लोकांच्या एवढ्या गर्दीत सापडला

की या गर्दीत तो अक्षरशः बुडालाच. त्याच्याभोवती प्रचंड गर्दी जमू लागली.

पुढच्या निवडणुकांचे दिवस आले. पुन्हा नारायणाच्या प्रचारासाठी नारदमुनी हिंडू लागले. शहरातल्या या मतदारसंघात त्यांची सभा होती. तेव्हा एका नव्या बंगल्याभोवती लोकांचा घोळकाच्या घोळका दिसला. मोटारींची, ट्रक्सची रांग लागलेली दिसली तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले. हा नवा बंगला यापूर्वी नव्हता. एवढी लोकांची अफाट गर्दीही यापूर्वी कधी दिसलेली नव्हती. हा काय प्रकार आहे म्हणून दोन्ही हातांनी लोकांना बाजूला ढकलीत नारद बंगल्यात जाऊन पोचले. पाहतात तो प्रचंड गलेलठ्ठ पुरुष शुभ्र वेषात आराम खुर्चीवर मांडी घालून बसलेला आणि लोकांची झुंडच्या झुंड त्याला चिकटलेली. नारदांना आणखी आश्चर्य वाटले. हा आहे तरी कोण महापुरुष म्हणून जिज्ञासेने त्यांनी जवळपासच्या लोकांना बाजूला काढून त्या शुभ्रवेषधारी इसमाकडे पाहिले. क्षणभर त्यांचा आपल्याच डोळ्यांवर विश्वास बसला नाही.

"तू–तुम्ही ? वाल्या कोळी ? " वाल्या कोळी काय म्हणता ? ते चाचरत म्हणाले. काही मॅनर्स आहेत की नाहीत तुम्हाला ?" एकजण नारदावर खेकसला. "भले ! वाल्मिकीराव म्हणा. आमदारकीचं तिकिट आजच मिळालंय. यांच्या हस्ते आमच्या नव्या गोडाऊनचं उद्घाटन आज व्हायचंय." धक्काबुक्कीत नारद मार खाण्याच्या बेतात होते. पण तेवढ्यात वाल्मिकीरावांनी त्यांना ओळखले. दोन्ही हात कोपरापासून जोडून नमस्कार केला.

"आपण केव्हा आलात ?"

"हा आत्ताच. तुमच्यात एवढा मोठा बदल झाला असेल याची कल्पना नव्हती मला."

"आपलीच कृपा आहे. आपण योग्य तो गायडन्स दिलात म्हणून आज हे दिवस पाहतो आहे ! नाहीतर साधी गुंडगिरी करीत खेड्यातच खितपत पडलो असतो. तुम्ही बरे वेळेवर भेटलात. अरे, यांना ठेवून घ्या आम्ही जरा मीटिंगला जाऊन येतो .." वाल्मिकीराव रुबाबात म्हणाले.

नारदमुनींना संतोष झाला. आपण जो हितोपदेश केला त्याचे सार्थक झाले असे त्यांना वाटले, वाल्या कोळीचा वाल्मिकीराव झाल्याबद्दल त्यांना धन्यता वाटली. "आमदार झाल्यासारखेच आहात ! असेच हुषारीने वागलात तर मंत्रीही व्हाल. आमचा आशीर्वाद आहे तुम्हांला .." असे म्हणून ते निघून गेले.

नारदांच्या आशीर्वादाप्रमाणे वाल्मिकीराव पुढे लवकरच आमदारही झाले. त्यांची योग्यता फारच वाढली. जो तो त्यांची स्तुती करू लागला. 'आमदार वाल्मिकीराव' अशी हाक मारू लागला. याच वाल्मिकीरावांनी मुख्य मंत्री रामचंद्र दशरथ सूर्यवंशी यांचे एक चरित्रही लिहिले. त्याला सरकारी पुरस्कारही लवकरच मिळाला. मुख्य मंत्र्यांनी त्यांना 'महाकवी' ही पदवी स्वातंत्र्य-दिनाच्या प्रसंगी बहाल केली. ○

# तारुण्य आणि अनुभव यांचा मिलाफ

मनोहर रेगे

जालंदर येथे १८ जुलैला मेक्सिको ऑलिंपिक्सकरिता भारतीय हॉकी संघाची निवड करण्यात आली. यंदाच्या ऑलिंपिक स्पर्धा मेक्सिको येथे १२ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. समुद्रसपाटीपासून सात हजार फुटांवर मेक्सिको शहर वसले असल्याने एका वेगळ्या वातावरणात हॉकीचे ऑलिंपिक्स सामने होणार आहेत. त्याकरिता भारतीय हॉकी संघाचा एक शिक्षण व सराव-वर्ग जालंदर येथे भरविण्यात आला होता. भारतीय हॉकी संघात पुढील १८ खेळाडूंची निवड झाली.

गोली–आर. ख्रिस्ती (म्हैसूर) व मुनीर सैत (मद्रास); बॅक्स–पृथुपाल सिंग (पंजाब), गुरुबक्ष सिंग (बंगाल), धरमसिंग (पंजाब); हाफ बॅक्स–बलवीरसिंग (सेनादल), जगजित सिंग (पंजाब), अजितपाल सिंग (पंजाब), हर्मिक सिंग (पंजाब), आर. कृष्णमूर्ती (रेल्वे); फॉर्वर्ड्स–बलबीर सिंग (रेल्वे), व्हिक्टर पीटर (सेनादल), हरविंदर सिंग (रेल्वे), इंदर–सिंग (रेल्वे), तार्सेम सिंग (पंजाब), इनाम–ऊर–रेहमान (बंगाल), बलबीर सिंग (पंजाब), गुरुबक्ष सिंग (रेल्वे). राखीव खेळाडू :–गोली–सतिंदरपाल सिंग (पंजाब), बॅक्स–डी. एस्. गिल् व बी. एस्. धिलन् (पंजाब); हाफ्–बॅक्स–हर्पाल सिंग (सेनादल) व ए. डिक्रुझ (मुंबई), फॉर्वर्ड्स–जानी मोहिउद्दीन (म्हैसूर) व शहीद नूर (भोपाळ).

भारताचा संघ जाहीर झाल्यानंतर सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात आले. भारतीय हॉकी संस्थेचे अध्यक्ष श्री. अश्विनी कुमार यांनी संघाचे वर्णन "तारुण्य आणि अनुभव यांचा संच" असे केले. भारताला पूर्व व पश्चिम जर्मनी, जपान, न्यूझीलंड आणि स्पेन संघांविरुद्ध जरी जोरदार लढत द्यावयाची असली तरी आमचे खेळाडू हिरीरीने खेळतील आणि मेक्सिकोला भारताचा झेंडा उंचावतील, असे मत त्यांनी पुढे व्यक्त केले.

निवडलेल्या अठरा हॉकीपटूंपैकी सात खेळाडू ख्रिस्ती, जगजित सिंग, पीटर, बलबीर सिंग (पंजाब), पृथुपाल सिंग, गुरुबक्ष सिंग आणि धरमसिंग–टोकियो ऑलिंपिक्समध्ये १९६४ साली खेळले होते. आणि त्यांनी भारताला सुवर्णपदक मिळवून दिले होते. १९६० मध्ये रोम येथे ते आपण गमावले होते. पतियाळाच्या शिक्षण–वर्गात जोगिंदर सिंग अनुपस्थित राहिल्यामुळे त्यांची निवड झाली नाही. जालंदरच्या निवडीच्या वेळी जोगिंदर आणि बंडू पाटील या जुन्या खेळाडूंवर निवड समितीच्या पाच सदस्यांनी विशेष लक्ष दिले. दोघांच्याही प्रकृतीकडे निवडसमितीची नजर होती. परंतु अखेर त्यांना निवडले नाही. याचे कारण हॉकी हा खेळ दमदारपणाचा असतो. नवे नवे रक्त पुढे येत असताना केवळ अनुभव आणि हुशारीलाच प्राधान्य देऊन चालत नाही. शिवाय जोगिंदर यांच्या आऊटसाईड–राईट किंवा इन्साईड–राईट या जागेवर रेल्वेचे बलबीर सिंग किंवा व्हो. जे. पीटर कितीतरी चांगले खेळाडू आहेत. त्याचप्रमाणे पाटील यांच्या इन्साईड–फॉरवर्ड जागेवर इंदर सिंग, गुरुबक्ष सिंग, इनाम–ऊर–रहेमान हे लेफ्ट–ईनप्रमाणेच इन्साईड–राईट आणि सेंटर–फॉरवर्ड या जागेवर अधिक कौशल्याने खेळू शकतात. म्हणूनच हे तिघे आणि हरबिंदर व पीटर (इन्साईड–फॉरवर्ड्स), बलबीर सिंग (रेल्वे), शहीद नूर, तारसेम सिंग हे फॉरवर्ड्सचे आठ उत्तम खेळाडू आहेत. त्यात शहीद नूर यांना राखीव ठेवून पंजाबच्या बलबीर सिंग यांना संधी दिली आहे.

जवळ जवळ ३० वर्षांनंतर ध्यानचंद व रुपचंद यांचेनंतर दोघे भाऊ भारतीय हॉकी संघात खेळत आहेत. १९३२ व ३६ साली ध्यानचंद व रुपचंद ऑलिंपिक संघात खेळले. त्यानंतर या संघात बलबीर सिंग व गुरुबक्ष सिंग हे दोघेही रेल्वेचे खेळाडू व बंधू भारतीय संघात निवडले आहेत.

## ओळख परेड

आता भारतीय हॉकीपटूंची थोडक्यात ओळख करून घेऊ या. निवड–समितीचे पाच सदस्य पुढीलप्रमाणे होते. जे. डी. नगरवाला (अध्यक्ष), व्हिक्टर सिमन, स्क्वॅड्रन लीडर आर. एस्. मोला, चरणजितसिंग व जनरल काल्हा. भारतीय संघात राजेंद्रन अब्सोलाम ख्रिस्ती आणि मुनीर सैत हे दोन गोली आहेत. लक्ष्मणचे सहाध्यायी म्हणून ख्रिस्ती १९६४ च्या टोकियो ऑलिंपिक्सला गेले होते. त्यांचे वय २८ असून लायन्स फेस्टिव्हल (१९६३) मध्ये भारतातर्फे त्यांनी भाग घेतला होता. बंगाल आणि म्हैसूरकडून ते राष्ट्रीय स्पर्धेत खेळले आहेत. मद्रासचे मुनीर सैत २६ वर्षांचे असून मद्रासतर्फे नियमितपणे गोलरक्षकाचे काम ते करतात. ख्रिस्ती यांच्याप्रमाणेच ते भरवशाचे गोली आहेत. स्पेन, सिलोन आणि जपानच्या दौऱ्यावर ते गेले होते.

पृथुपाल सिंग ३५ वर्षांचे असून सर्वांत जुने व अनुभवी असे ते खेळाडू आहेत. फुलबॅकला ते प्रामुख्याने खेळतात. पेनल्टी–कॉर्नरवरून गोल करण्यात ते पटाईत

आहेत. टोकियो ऑलिंपिक्समध्ये भारताने एकूण २२ गोल केले. त्यातले ११ पृथुपाल सिंग यांनी केले होते. १९६० च्या रोम ऑलिंपिक्समध्येही त्यांनी भाग घेतला होता. १९६१ मध्ये अर्जुन पारितोषिक मिळविणारे ते पहिले हॉकीपटू होत. पद्मश्री पदकही त्यांना लाभले आहे. अहमदाबादला झालेल्या हॉकी महोत्सवात त्यांनी जर्मनीविरुद्ध एकमेव गोल केला होता. १९५८ मध्ये पूर्व आफ्रिकेच्या दौऱ्यावर ते गेले होते. त्यानंतर म्युनिक, युरोपियन दौरा, रोम ऑलिंपिक्स, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, जाकार्ता, मलेशिया, सिंगापूर, टोकियो ऑलिंपिक्स, माद्रिद, बँकॉक, आशियायी स्पर्धा, माद्रिद महोत्सव (कर्णधार) व पूर्व जर्मनीचा दौरा (कर्णधार) असा समृद्ध अनुभव त्यांचे गाठीशी आहे. लुधियाना येथील शेतकी विद्यापीठात ते डेप्युटी डायरेक्टर आहेत.

गुरुबक्ष सिंग (बंगाल–वय ३२) फुल–बॅकमध्ये पृथुपाल सिंग यांचेबरोबर उत्कृष्ट कामगिरी करतात. लायन्स क्रीडा–महोत्सवात त्यांनी न्यूझीलंड येथे भाग घेतला होता. टोकियो ऑलिंपिक्स व हंबुर्ग स्पर्धेत ते खेळले होते. १९६६ च्या बँकॉक येथील आशियायी क्रीडा–स्पर्धांत विजयी भारतीय संघात ते समाविष्ट होते. भारताचे नेतृत्व त्यांनी अनेक वेळा सांभाळले असून सिलोन, जपान व लंडन येथे ते खेळले असून अर्जुन पदकाचे मानकरीही आहेत. तिसऱ्या फुल–बॅकच्या जागेसाठी पंजाबच्या धरमसिंग (वय ३०) यांनी जालंदरच्या शिक्षण व सराव वर्गात आपले कर्तृत्व गाजविले. राष्ट्रीय स्पर्धेत त्यांनी पंजाबकडून १९५९ पासून भाग घेतला आहे. लायन्स, टोकियो, हम्बुर्ग, जपान व बँकॉकचे दौरे त्यांनी केले आहेत.

सेनादलाचे बावीस वर्षांचे बलबीरसिंग राईट–हाफ जागेवर कुशलतेने खेळतात. लेफ्ट–हाफ ठिकाणीही उत्तम खेळतात. हम्बुर्ग, माद्रिद स्पर्धा आणि जपान व बँकॉकचे दौरे त्यांनी आतापर्यंत केले आहेत. पंजाबचे जगजिनसिंग (वय २५) टोकियो ऑलिंपिक्सनंतर एकदम पुढे आले. सेंटर–हाफ या जागेवर ते खेळतात. हम्बुर्ग, माद्रिद, लंडन, बँकॉक, सिलोन व जपान दौऱ्यांचा अनुभव त्यांचे गाठीशी आहे. केवळ २० वर्षांचे अजितपालसिंग (पंजाब) यांनी सेंटर–हाफ म्हणून दिल्लीच्या नेहरू स्पर्धेत संयुक्त विद्यापीठ संघाकडून भाग घेताना डौलदार खेळ केला. आघाडीच्या फळीत चातुर्याने वावरून ते उत्कृष्ट 'पासेस देतात. जपान व लंडनचे दौरे त्यांनी केले आहेत.

पी. कृष्णमूर्ती २२ वर्षांचे असून रेल्वे व मद्रासकडून खेळतात. राईट–हाफ जागेवर ते चपळाईने व अचूकतेने हालचाल करतात. लंडन, जपान, हाँगकाँग, मलेशिया, सिंगापूर या ठिकाणी त्यांनी दौरे केले आहेत. रेल्वेच्या बलबीरसिंग (वय २२) यांनी दोन वर्षांपूर्वी बँकॉकला एक गोल लावून आशियायी–क्रीडा स्पर्धेत भारताला प्रथम सुवर्णपदक मिळवून दिले होते. राईट–विंगर म्हणून भारतात ते सर्वश्रेष्ठ असून लंडन, माद्रिद व सिलोन येथेही त्यांनी दौरे केले आहेत. बंगालचे चोवीस वर्षांचे इनाम–उर–रहमान हे अगदी वैशिष्ट्यपूर्ण डौलदार

इनसाईड–लेफ्ट खेळाडू आहेत. हम्बर्ग, जपान व सिलोन यथे ते खेळण्यासाठी गेले होते. भारतात पूर्व जर्मनीच्या संघाने दौरा केला त्यात इमान–उर–रहमान यांचा खेळ उत्कृष्ट झाला.

व्हिक्टर जॉन पीटर ३२ वर्षांचे असून सेनादलात सोल्जर आहेत. टोकियोच्या आशियायी क्रीडा–स्पर्धांत त्यांनी आपल्या हॉकीला जोरदार प्रारंभ केला. इनसाईड–राईट जागेवर खेळून उत्तम पासेस देतात. १९६० व ६४ च्या रोम व टोकियो ऑलिंपिक्समध्ये भारताकडून ते खेळले. पूर्व आफ्रिका, हम्बुर्ग, माद्रिद, लंडन व बँकॉक येथे ते खेळले आहेत. आघाडीच्या फळीतील ते एक कल्पक व लढाऊ खेळाडू असून यंदाच्या अर्जुन पदकाचे मानकरी आहेत. धैर्य आणि धमक यांचा सुंदर समन्वय हरविंदरसिंग (रेल्वे–वय २५) यांच्या आघाडीच्या फळीतील खेळात सापडतो. सेंटर–फॉरवर्ड जागेवर त्यांना कुणीही प्रतिस्पर्धी नाही. टोकियो ऑलिंपिक्स, बँकॉक, लायन्स हम्बुर्ग, लंडन, न्यूझीलंड व ऑस्ट्रेलियातील स्पर्धेत त्यांनी भाग घेतला आहे.

बलबीरसिंग (वय २७) आणि तारसेम सिंग (वय २१) हे पंजाब पोलीस संघातील खेळाडू असून बँकॉक व जपानच्या दौऱ्यावर जाऊन आले आहेत. बलबीर आघाडीच्या फळीत कुठेही खेळतात. टोकियो ऑलिंपिक्सला त्यांची निवड झाली होती. तारसेम लेफ्ट–विंगमध्ये उत्कृष्ट खेळतात. रेल्वेचे इनसाईड–लेफ्ट इंदरसिंग (वय २३) पुन्हा फॉर्ममध्ये आले असून त्यांच्याकडून बऱ्याच अपेक्षा आहेत. हम्बुर्ग, बँकॉक, माद्रिद, लंडन, जपान आणि सिलोनचे दौरे आतापर्यंत त्यांनी केले आहेत. रेल्वेचे गुरुबक्ष सिंग २६ वर्षांचे असून १९६३ मध्ये ते जखमी झाल्यानंतर काही काळ विश्रांती घेत होते. इनसाईड–राईट व सेंटर–हाफला ते उत्कृष्ट खेळतात. भारताकडून प्रथमतःच ते खेळत आहेत. सर्व खेळाडूंच्या वयाची सरासरी २५ च्या आसपास असून भारताचे सांघिक सामर्थ्य पणाला लावले तर यंदाच्या मेक्सिको ऑलिंपिकमध्ये चांगली कामगिरी आपल्या हातून पार पडू शकेल.

## खेळाडूंच्या संख्येत वाढ

माजी ऑलिंपिक हॉकीपटू आर. एस्. जंटल यांनी भारताच्या विजयाबद्दल मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. भारताला यंदा भूतो न भविष्यती असा लढा द्यावा लागणार आहे असे त्यांचे मत आहे. मुंबईला झालेल्या आगाखान आणि गोल्ड-कप. हॉकी स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी हॉकीचे उत्कृष्ट प्रात्यक्षिक दाखविले असे त्यांनी सांगितले. मधल्या फळीत हाफ-बॅक, इन्साईड–लेफ्ट, आऊट–साईड लेफ्ट आणि एक फुलबॅक व गोलरक्षक या जागा कमकुवत आहेत असे जंटल यांना वाटते. शिवाय यंदा जर्मनी-स्पेनसारख्या बलाढ्य संघांशी भारताला टक्कर द्यावयाची आहे. जंटल यांच्या मते फुल–बॅकच्या ठिकाणी गुरुबक्ष सिंग उत्कृष्ट काम-

गिरी करतील. धरमसिंग आणि पृथुपाल सिंग यांना चांगला फॉर्म लागला पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

राईट–विंगर म्हणून रेल्वेच्या बलबीरसिंग यांचा जगात कुणीही हात धरणार नाही. परंतु त्यांच्या साथीला डाव्या फळीत तितकासा वाकबगार हॉकीपटू नाही. बलबीर सेंटर–फॉरवर्डलाही अत्युत्तम खेळतात. भारताचा हॉकीचा दर्जा खालावत चालला असून इतर युरोपियन देश मात्र प्रबळ होत आहेत असे जंटल यांचे म्हणणे आहे. भारताने परदेशात दौरे केल्यामुळे हॉलंड, पूर्व व पश्चिम जर्मनी, फ्रान्स, स्पेन, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड यांचे संघ तयारीत आहेत. भारतात ठराविक खेळाडूंच्या शिक्षण, सराव व निवडीवर भर दिला जातो. त्यापेक्षा हॉकी हा खेळ सर्व स्तरात पोहोचविला पाहिजे असे जंटल यांना वाटते. हॉकी खेळाडूंची संख्या वाढविली तर त्यातून उत्तमोतम हॉकीपटू बाहेर पडतील असा निष्कर्ष त्यांनी काढला.

१९२८ च्या भारतीय ऑलिंपिक संघातील खेळाडू जॉर्ज एरिक् मार्थिन्स यांनी नवी दिल्ली येथे नुकतेच सांगितले की पृथुपाल सिंग यांच्यासारखा एखादाच खेळाडू पेनल्टी कॉर्नरचा फायदा घेऊन गोल करतो किंवा हरबिंदर वा बलबीर इतर प्रकारांनी गोल लावू शकतात. हॉकीच्या सुवर्णकाळात फॉर्वर्डमधील प्रत्येक खेळाडू गोल लावीत असे. हाफमधील खेळाडूही अधूनमधून गोल करीत. तसे हल्ली घडत नाही. गोलाशेजारील अर्धवर्तुळात ('डी') चेंडू आला की लगेच तो गोलात बिनचूक फटकविला जात असे. हल्ली गोलाच्या तोंडाशी तो ढकलत नेऊन गोल करण्याचा प्रयत्न होतो.

एकंदरीत भारतीय हॉकी संघाला यंदा मेक्सिको येथे ऑलिंपिकचे सुवर्णपदक पटकावण्यास बरेच कष्ट पडणार आहेत. तारुण्य आणि अनुभव यांचा जरी भारतीय संघात उत्तम मिलाफ झाला असला तरी प्रत्यक्षात कर्तृत्व आणि सांघिक बळच अधिक उपयोगी पडते. शिवाय भारताप्रमाणे इतर पाश्चात्य देश अगदी नियमानुसार खेळतात असे नाही. सामर्थ्याचा आणि वेळप्रसंगी दांडगाईचा खेळ करण्यासही ते मागेपुढे पहात नाहीत. शिवाय ज्या विभागात भारताचा संघ आहे त्यातील प्रत्येक देश हॉकीत पुढारलेला आहे. भारतामधील अनेक हॉकी–शिक्षक ऑस्ट्रेलिया, जर्मनी, केनिया येथे जाऊन आले असल्याने भारतामधील खेळाडूंच्या क्लृप्त्या त्यांच्या अंगवळणी पडल्या आहेत. तरीपण भारतीय हॉकी संघाचे स्टिक्वर्क अजूनही अप्रतीम आणि अनाकलनीय आहे. ती परंपरा आपला संघ राखेल आणि त्याचे प्रात्यक्षिक दाखवून एकसंध खेळ करील अशी आशा बाळगावयास हरकत नाही.

# विकलांग नसलेली 'पॅरॅलिसीस'

"पॅरॅलिसीस" हा रोग शरीराला होत असला तरी, तो मानवाच्या तनूबरोबर मनालाही होत असतो. पक्षाघाताच्या या व्याधीमुळे तनूबरोबरच मनाचीही अवस्था विकलांग होते. अशाच एका सरळ, साधे जीवन जगणाऱ्या प्राध्यापकाच्या जीवनातील अंतरबाह्य पुनरूद्धाराची कथा 'पॅरॅलिसीस'मध्ये चंद्रकांत बक्षी यांनी निवेदन केली आहे.

या कादंबरीचा प्रपंच सुमारे एकशेसत्तर पानांचा असला, तरी वाङ्मयीन खऱ्या अर्थाने ही एक प्रदीर्घ कथा आहे. कादंबरीची रचना "फ्लॅश बॅक" पद्धतीच्या सिने-तंत्राचा अवलंब करून करण्यात आली आहे. या तंत्रामुळे कादंबरीमध्ये उत्सुकता शेवट-पर्यंत जिवंत राहते. कदाचित, ह्या तंत्रामुळे ही कथा निव्वळ एका रोग्याची राहत नसून तो प्राध्यापक अरामशहाच्या जीवनावर आच्छादून राहिलेल्या, त्यांची पत्नी, मारीशा आणि आशिका या तीन स्त्रियांच्या जीवनाची कथा तयार होते. त्यांपैकी सौ. अरामशहांची व्यक्तिरेखा अतिशय अस्पष्ट, आणि धूसर आहे. कदाचित या धूसर-पणामुळेच मारिशाची व्यक्तिरेखा, कादंबरीत अधिक उठावदार झाली असावी. मारिशा, प्राध्यापकाची कन्या, तिचे बाल्य, तिचे यौवन, तिचा ख्रिश्चन प्रियकर जॉर्ज आणि तिचा आकस्मिक होणारा, मनाला चटका लावणारा अंत हे सर्व प्रसंग योग्य त्या हळुवारपणे कोठेही भावनाविवश न होता, श्री. बक्षींनी रंगविले आहेत.

आशिकाने तर प्राध्यापकांना नव्या जीवनाची देणगीच दिली आहे. त्यामुळे 'मेट्रन'ची ही व्यक्तिरेखाही बक्षींनी अतिशय सामर्थ्यशालीपणे रंगवली आहे. तिच्या व्यक्तिमत्त्वातील अनुकंपेच्या भावनेला प्रथमपासूनच फारसा उजाळा न देता, प्राध्यापकाच्या आणि तिच्यामधल्या संबंधांना समजूतदार प्रीतीची झिलाई देऊन त्या दोघांमधील अलैंगिक संबंधाचे रेशमी धागे लेखकाने अतिशय हळूवारपणे उलगडले आहेत. आखीव अर्थाने या कादंबरीत खलपुरुषाला स्थानच नाही. परंतु चार जीवांच्या ह्या प्रवासात नियतीचे अदृश्य धागे हेच खलपुरुषांचे कार्य करीत असतात. कदाचित, म्हणूनच सरळ, साध्या वाटणाऱ्या या व्यक्तिरेखा अतिशय अर्थपूर्ण आणि तरीही सदैव समांतरच वाटत असतात. जॉर्जच्या व्यक्ति-रेखेला आलेला एकेरीपणाही त्यामुळेच रूढार्थाने खलनायकांच्या श्रेणीत जाऊन बसत नाही.

श्री. चंद्रकांत बक्षींनी या कथेमध्ये प्राध्यापकांच्या अर्ध्या शरीरातील "जिवंत-

["पॅरॅलिसीस" – ले. चंद्रकांत बक्षी : प्रकाशन – सिद्धार्थ साहित्य, मुंबई.]

पणाची प्रगती " जितक्या बारकाव्याने, खाचाखोचांनी चित्रीत केली आहे तितक्याच "पॉलिशपणा "ने त्यांनी प्राध्यापकांच्या भावविश्वांचा ठाव घेतला आहे. हे सारे रंग कादंबरीत भरत असताना कुठेही त्यांनी 'मनोविश्लेषणा'चे स्तोम माजवले नाही. नाहीतर या कथेमध्ये विषयाच्या दृष्टीने लेखकाला तशी संधी फारच सुलभतेने प्राप्त झालेली होती. एका 'हिल स्टेशन'वर कादंबरीची बैठक असूनही, निसर्गवर्णनाचा फापटपसाराही कुठे मांडलेला नाही. परंतु प्रतिमांच्या साहाय्याने अभिव्यक्ती सहज आणि लालित्यपूर्ण झाली आहे. उदा. 'अभ्रकी ऊन,' 'रंगीबेरंगी अंधाराचे अद्‌भुत विश्व' हे शब्दप्रयोग लेखकाच्या सामर्थ्याचीच उदाहरणे म्हणून दाखविता येतील. काही ठिकाणी सुभाषितवजा वाक्यांचा उपयोग लेखकाने केला आहे, परंतु ही वाक्येही आजारी पडलेल्या रोग्यांच्या तत्त्वज्ञानी वृत्तीचे अंग म्हणूनच आली आहेत.

अशी ही कुठेही विकलांग न झालेली सामर्थ्यशाली 'पॅरॅलिसीस' ही कादंबरी शेवटचे पान बंद करताना कळले की, कादंबरी गुजराथीतून अनुवादित केली आहे. शेवटी अनुवादकाने हा 'अनुवाद' आहे, त्याची जाणीव प्रारंभीच न देऊन वाचकांच्या मनात निर्माण होणाऱ्या ग्रहांना दिलेला फाटाही अभिनंदनीय आहे.

**रतनलाल भंडारी**

□

## गायनी कळा

पुण्यातील 'हिन्दुस्थान साहित्या'चे संचालक व संगीत-शास्त्राचे एक अभ्यासक श्री. हरी विनायक तथा बापूराव दात्ये यांनी 'गायनी कळा' या नावाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यास 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'ने प्रकाशनासाठी चार हजार रुपयांचे अनुदान दिले आहे.

या ग्रंथात श्री. दात्ये यांनी संगीताचा अभिनव पद्धतीने परामर्ष घेतला आहे. त्यात नवीन स्वर-लिपी, सांघिक व प्रांगणीय संगीताचा विचार, वाद्यांचे विवरण व त्यांच्या प्रमाणिततेचा विचार, पारिभाषिक शब्दकोश इत्यादी विषय आलेले आहेत.

मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई, यांच्याकडे 'गायनी कळा'च्या मुद्रणास प्रारंभ झाला असून लवकरच ग्रंथ प्रकाशित होईल.

# भिंतीच्या फेंबड्या

सुधाकर राजे

## □ एम्. एस्. मास्टर ऑफ सांबार !

परवा एक एक अजब बातमी वाचली. मद्रासच्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना विचारण्यात आले.–तुम्हाला सांबार करता येते का ? आणि रवा–बर्फी ही मिठाई कशी करतात ? घ्या ! मेडिकलची लाइन घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शरीरविज्ञान चांगले यायला हवे अशी माझी वेडगळ समजूत होती. पण शरीर–विज्ञानावरची कंटाळवाणी पुस्तके वाचीत बसण्यापेक्षा आधी कोपऱ्यावरच्या मद्रास हॉटेलात अन् मग बाजारातल्या हलवायाच्या दुकानात उमेदवारी करणेच होऊ घातलेल्या डॉक्टरला अधिक उपयुक्त दिसते. अथात् नेमके हेच प्रश्न का विचारण्यात आले याचे काही तरी वैद्यकीय कारण असले पाहिजे हे नक्की. काय बरे असावे हे कारण ? मला डोसे फार आवडतात, अन् त्यांच्याबरोबर सांबार भुरकून भुरकून माझी आता खात्री पटली आहे की सांबार करणे ही एक अवघड कला आहे. सांबाराचा मसाला बरोबर प्रमाणात पडायला हात कसा नाजुक हवा–अन् सांबार नीट करता येण्याइतका हात नाजुक असेल तर तो कुठलेही ऑपरेशन यशस्वी करण्याइतका नाजुक असणार हे ओघानेच आले.

अन् रवा–बर्फीचा व डॉक्टरकीचा कोठ बरं संबंध येतो. अर्थात् सबंध डॉक्टरी व्यवसायाचा संबंध खाण्याशी असला तरी रवा–बर्फीचा रेचकाशी घनिष्ट संबंध असावा असा माझा कयास आहे. नाहीतर एम्. बी. बी. एस्. च्या कोर्समध्ये तिला एवढे मानाचे पान मिळाले नसते. ते काही असले तरी एक गोष्ट स्पष्ट झाली. आपल्याला डॉक्टर होण्याइतके डोके नाही असे मी आतापर्यंत नम्रपणे धरून चाललो होतो. पण तसे काही नाही. आपण सांबारच्या वाट्या उडविण्यात अन् कुठल्याही बर्फीची चटणी करण्यात तरबज आहोत, तेव्हा एक मोठा डॉक्टर व्हायला आपण संपूर्णपणे लायक आहोत असा आता मला आत्मविश्वास वाटतो. मला वाटतं आता रसमची टेस्ट कल्टिव्हेट केली की एम्. डी. ची तयारी करायला हरकत नाही.

## □ स्वर्गातले ट्रॅफिक ॲक्सिडेंट

अमेरिकेतला एक तरुण पाद्री पार्ट–टाईम पोलिसाची नोकरी करीत होता. पोपने म्हणे त्याला हुकूम पाठवला—–हे असे करता येणार नाही. पाद्रयाने काय केले ?

पाद्रीपणा सोडून सशस्त्र पोलिसाची फुल-टाइम नोकरी धरली. आता बोला ! संतवचनांनी स्वर्गाचा मार्ग दाखविण्यापेक्षा बंदुकीच्या गोळीने स्वर्गाची वाट दाखविण्याची कल्पना या भूतपूर्व पाद्रयाला अधिक पटलेली दिसते. आता पाद्री आणि पोलीस या दोन व्यवसायांचा कोठे संबंध येतो हे आकाशातल्या बापालादेखील सांगता येईल की नाही याची मला शंका आहे. स्वर्गात भुरट्या चोरांचा उपद्रव झाला आहे काय ? का ट्रॅफिक ॲक्सिडेंट फार वाढले आहेत ? ते काही असले तरी हा पाद्री-पोलीस ज्या चोरांच्या मागे लागेल त्याला " दाऊ शॅल्ट नॉट स्टील " हे बायबल वचन ऐकविल्याखेरीज हातकड्या घालणार नाही.

## □ हूज नॉट हू

लंडनला प्रकाशित होणाऱ्या एका सुप्रसिद्ध हुज हू मध्ये भारताचे राष्ट्राध्यक्ष म्हणून श्री. व्ही. व्ही. गिरी यांचे नाव छापले आहे. आता हे प्रकाशन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे आहे. तेव्हा त्यात असा थोडा फार आंतरराष्ट्रीय घोटाळा व्हायचाच. मला नवल एवढंच वाटतं की हे असे घोटाळे नेमके भारताच्याच बाबतीत कसे होतात ? उदाहरणार्थ, शत्रू असलेल्या चीनमध्येच नव्हे तर मित्र असलेल्या रशियात देखील छापलेल्या नकाशांत भारताचा बराचसा भाग चीन किंवा पाकिस्तानात दाखविण्यात येतो. आणि यावर आपण काय करतो ?— अर्थात् बिचाऱ्या अज्ञानी जिवाची कीव !

## □ उत्साहाचे टाइम-टेबल

इंग्लंडमधील काही शास्त्रज्ञांनी चालविलेल्या प्रयोगात असे आढळून आले आहे की काही लोक सकाळी उत्साही असतात तर काही संध्याकाळी. म्हणून त्यांनी माणसांचे " सकाळची माणसे " आणि " संध्याकाळची माणसे " असे प्रकार पाडले आहेत. भले शाबास ! मग आमच्यासारख्या दुपारच्या चहावर जगणाऱ्या मंडळींची वाट काय ? अन् उत्साहाचंच टाइम-टेबल मांडायचं तर सकाळी हिच्या हातचा गुळमट चहा घेतल्यावरचा मी, एक वाजता थंडगार डबा संपविलेला मी, दुपारी ऑफिसातल्या धोंडूने आणलेला गरमागरम स्पेशल प्यालेला मी अन् संध्याकाळी घरी जायच्या आधी कुरकुरीत डोसा उडवलेला मी असे माझेच चार प्रकार मांडता येतील. मग इतरांचे काय ? आणि उत्साहाचा दररोज हिशेब लावायचा तर दर आठवड्याला अन् दर महिन्याला का नको ? उद्या शनिवार म्हणून शुक्रवारी खुर्चीवर टोपी ठेवून दिवसभर ऑफिसात चकाट्या फिरत हिंडणारा मी, शनिवारी अर्धा दिवसच ऑफिस, तेव्हा काम करायला पुरेसा वेळच नाही म्हणून काम न करणारा मी, रविवारी पुख्खा पाडल्यावर दुपारी एक ते संध्याकाळी सहापर्यंत ब्रह्मानंदी टाळी लावणारा मी, अन् सोमवारी " आली च्यायला ऑफिसची कटकट " असे म्हणून त्रासिक मुद्रेने ऑफिसच्या ववस्तंभाकडे

जाणारा मी हे अगदी वेगवेगळे मी नाहीत काय?--आणि एक तारखेचा मी व एकतीस तारखेचा मी यात जमीन-अस्मानचा--की अस्मान-जमिनीचा?--फरक आहे हे कोणत्याही सुज्ञ कारकुनास सांगणे नलगे. ☐


# मृत्युंजय

**वाचकांच्या उत्साही हाकेस साद देणारी**
**दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली!**

**लेखक : शिवाजी सावंत**

**किंमत रुपये पंधरा**

सूर्यपुत्र महारथी कर्णाच्या झंझावाती जीवनावर लिहिलेली शोकान्त कादंबरी! भारतीय मनात गेले कित्येक दिवस सलत असलेल्या दुःखाला दिलेले नाटयमय शब्दरूप! केवळ आठ महिन्यांच्या अवधीत दुसरी आवृत्ती काढावयास भाग पाडलेला एक प्रचंड ग्रंथ!! श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. ना. पेंडसे, रणजित देसाई, ना. सं. इनामदार, आचार्य अत्रे, पु. ग. सहस्रबुद्धे, सेतु माधवराव पगडी, राजकवी यशवंत, नानासाहेब गोरे, वि. स. खांडेकर, मधुकरराव चौधरी, यांच्यासारख्या श्रेष्ठींनी प्रशंसिलेला उगवत्या लेखकाचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न! परंपरानुगामी मराठी साहित्यक्षितिजावर उसळलेला एक शुभशकुनी धूमकेतू!!

**कॉन्टिनेंटल प्रकाशन**

**टिळक रोड, पुणे**

 पृष्ठ १० वरून

रशियाने ठरवावयाचे व इतर सभासदांनी ते निमूटपणे मान्य करावयाचे हे रशियाचे वर्चस्व चेकोस्लोव्हाकियास मान्य नाही. धोरण ठरविण्यात सर्वच सभासद राष्ट्रांनी भाग घेतला पाहिजे अशी नव्या नेत्यांची भूमिका या कार्यक्रमात मांडली आहे. कोणत्याही नागरिकाचा त्याच्या राजकीय मतांबद्दल छळ पोलीस करणार नाहीत. जुनी दहशतीची राजवट पुन: येणार नाही अशी हमी या कार्यक्रमात दिली आहे.

कारखाने चालविण्यात संचालकांना अधिक स्वातंत्र्य दिले गेले. "आम्हाला आता अधिक स्वातंत्र्य आहे. आमच्या उत्पादन–कार्यक्रमात कोणी ढवळाढवळ करीत नाही. सुटे भाग मिळण्यात, माल रवाना करण्यात अडचणी येत नाहीत. आमच्या मालाचे ग्राहक आमचे आम्ही शोधतो." अशा शब्दांत टॉस–हॉस्टिवार कारखान्याचे संचालक स्टॅनिस्लाव्ह कोलोसेक यांनी नव्या बदलाचे वर्णन केले.

## नोव्होट्नी राजवटीतील छळ

स्टॅलिनच्या निधनानंतर तीन वर्षांनी स्टालिनच्या धिक्काराची व स्टालिनवाद्यांच्या हकालपट्टीची मोहीम रशिया व पूर्व युरोपच्या काही राष्ट्रात झाली. हंगेरीत तर या चळवळीने कम्युनिस्ट राजवटीलाच धोका निर्माण झाला तेव्हा रशियाने लष्करी हस्तक्षेप करून तेथील कम्युनिस्ट राजवट टिकविली. पोलंडमध्येही बंड झाले पण रशियाला हस्तक्षेप करावा लागण्याइतकी वेळ तेथे आली नाही. चेकोस्लोव्हाकियात, मात्र गेल्या वर्षाच्या अखेरीपर्यंत नोव्होट्नीची स्टालिनवादी राजवट कायम होती. "नोव्होट्नी राजवटीत राजकीय छळ झालेल्यांची संख्या एक लाखापर्यंत जाईल असे या लोकांसंबंधी माहिती गोळा करून त्यांच्या पुनर्वसनाचे कार्य करणाऱ्या 'के २३१' या संस्थेचे अध्यक्ष प्रो. कॅरेल निग्रिन यांनी नुकतेच सांगितले. प्रो. निग्रिन यांनी स्वत: राजकीय छळाचा अनुभव घेतलेला आहे. त्यांना पंधरा वर्षांची शिक्षा झाली होती. त्यांच्याप्रमाणे तीस हजार जणांनी पंधरा वर्षांच्या शिक्षा भोगल्या. दोन हजार राजकीय कैदी ताप व इतर रोगांनी तुरुंगात मेले. छळ झालेल्या ४८,००० कैद्यांची नोंद संस्थेने केली असून हे कार्य अजून चालू आहे.

छळाच्या हकीकती अंगावर शहारे आणणाऱ्या आहेत. एक–दोनच उदाहरणे येथ देतो.

### शिक्षकास पंधरा वर्षे शिक्षा

एका सव्वीस वर्षांच्या शिक्षकास अटक झाली. त्याचा गुन्हा काय तर कम्युनिस्ट राजवट सुरू झाल्यावर एका मित्राला देश सोडण्यासाठी त्याने मदत केली. कायद्या-

प्रमाणे या गुन्ह्यास पाच वर्षांच्या शिक्षेची तरतूद होती. पण बेकायदा पळून जाण्यास मदत करणे हा गंभीर राजद्रोह ठरवून राजद्रोहाच्या आरोपाखाली त्याला पंधरा वर्षांची सजा झाली. प्रथम सोशल डेमोक्रॅट म्हणून त्याला नोकरीतून बडतर्फ केले. एक दिवस पहाटे चार वाजता त्याच्या घरावर पोलिसांनी धाड घातली व त्याला आपल्याबरोबर चलण्यास सांगितले.

"का ?" त्याने विचारले.

-"ते विचारू नकोस. कळेल." पोलिसांचे उत्तर.

तीन महिने त्याला एका तळघराच्या कोठडीत एकटेच ठेवले. त्याला सतत उभे राहायला सांगितले. झोपू दिले नाही. कोठडी फार लहान, आत काळाकुट्ट अंधार. तीनचारदा त्याला बाहेर काढीत व अंगावर ओरडत : 'बेकायदा पळून जाणाऱ्यांच्या संघटनेचा तू सभासद होतास, या कबुलीजबाबावर स्वेच्छेने सही कर. नाही तर तुला मरेपर्यंत या तुरुंगात रखडावे लागेल.' अखेर छळ असह्य होऊन त्याने सही केली. दीड वर्षांनी खटला होऊन गंभीर राजद्रोहाबद्दल त्याला पंधरा वर्षांची शिक्षा झाली. प्रथम एका मजुरांच्या छावणीत त्याला पाठविले व दगड फोडण्याचे काम दिले. त्याची प्रकृती बिघडली. त्याला क्षय झाला.

स्टॅलिनच्या निधनानंतर कम्युनिस्ट राष्ट्रात थोडे उदारमतवादी धोरण सुरू होताच आपल्या प्रकरणाचा फेरविचार करण्याची विनंती त्याने केली. पण तिकडे कोणी लक्ष दिले नाही व १९५६ च्या हंगेरीतील घटनांनंतर तर एकाही प्रकरणाचा फेरविचार झाला नाही. १९६७ मध्ये त्याची नव्याने चौकशी होऊन तो निर्दोषी ठरला व त्याची मुक्तता होऊन त्याला भाषांतऱ्याची नोकरी मिळाली.

## एका लेखकावरील खटला

चित्रपटकथालेखक व्हलाडिमिर स्कुटिना यांना अध्यक्ष नोव्होट्नी यांची अप्रतिष्ठा केल्याबद्दल शिक्षा झाली. एक दिवस दोन पोलीस अधिकारी दार न वाजविताच त्यांच्या कचेरीतील खोलीत आले व आम्हाला तुमच्याशी काही बोलावयाचे आहे. आमच्याबरोबर चला, असे म्हणून त्यांना घेऊन गेले. ते आपल्याला तुरुंगात घेऊन जात आहेत, याची स्कुटिना यांना त्या वेळी कल्पनाही नव्हती. घरी आजारी पत्नी व पाच आठवड्याची तान्ही मुलगी. पत्नीला फोन करण्यासाठी स्कुटिना फोनकडे जाऊ लागले पण अधिकाऱ्यांनी त्यांना फोन करू दिला नाही.

स्कुटिना यांना रुझिने तुरुंगात नेले. एका गणवेषधारी वॉर्डरने त्यांना खोलीत नेऊन अंगावरचे सर्व कपडे काढण्यास सांगितले. स्कुटिना यांच्याजवळच्या सर्व वस्तूंची त्याने नोंद केली. खिशामध्ये काय काय होते त्याची त्याने एका कागदावर नोंद केली. नंतर त्याने स्कुटिना यांना हात पाठीमागे घेऊन खाली जमिनीकडे पाहत त्याच्यापुढे चालायला लावले. समोरून कोणी आले तर भिंतीकडे पाहायचे. (कैद्याचे आम्ही डोळे बांधीत नाही ही आम्ही केलेली मोठी सुधारणा असे त्यांना अनेकदा

सांगण्यात आले) दुसऱ्या दिवशी स्कुटिना यांना एका कोठडीत हलवले. ही कोठडी फार लहान होती. तिला खिडकी होती. पण ती कायमची बंद केलेली होती. त्यामुळे बाहेरचे काहीच दिसत नसे. जमिनीस एक भोक होते त्यातून दुर्गंधी येत होती. मलमूत्र विसर्जन तेथेच करायचे. हात तोंड तेथेच धुवायचे, आणि पाणी त्यातलेच प्यावयाचे असा त्याचा तिहेरी उपयोग करण्यास वॉर्डरने त्यांना सांगितले. त्या कोठडीत अशा स्थितीत राहताना स्कुटिना यांना वेड लागायची पाळी आली होती. नंतर वॉर्डरने त्यांना कॅप्टनकडे नेले. कॅप्टनने त्यांना कोपऱ्यातील बाकावर बसायला सांगितले. कॅप्टन त्या वेळी कॉफी पीत होता. स्कुटिना यांना कॉफी पिण्याची इच्छा झाली. पण त्यांची ही इच्छा ते तुरुंगात दहा महिने असेपर्यंत पुरी झाली नाही. तेथे टेलिफोन पाहून स्कुटिना यांना पुन: पत्नीस फोन करून कुशल विचारण्याची इच्छा झाली· पण त्यांना तसे करू दिले नाही. तुमच्या पत्नीस कळविले आहे एवढेच वॉर्डरने सांगितले.

आपल्या पत्नीचा व तान्ह्या मुलीचा कसा छळ करण्यात आला याची हकीकत तुरुंगातून सुटल्यानंतरच स्कुटिना यांना समजली. त्यांना ज्या दिवशी तुरुंगात नेले त्याच दिवशी दुसऱ्या मोटारीतून दोन अधिकाऱ्यांनी पत्नीच्या घरावर छापा घातला. त्या वेळी मुलीस प्यायला घेण्याची वेळ झाली होती. पण अधिकाऱ्याने थांबायला सांगितले. आठ तास झडती चालू होती. स्कुटिना यांच्या ग्रंथालयात दोन हजार पुस्तके आहेत ती सर्व त्यांनी विसकटून त्यात कोठे काही दडविलेले नाही ना हे पाहिले. मुलगी भुकेने रडू लागली. पण अधिकाऱ्यांना पाझर फुटला नाही. स्कुटिना यांना अटक केली आहे हेसुद्धा त्यांनी पत्नीस सांगितले नाही.

अध्यक्ष नोव्होट्नी यांना गाढव म्हणून त्यांची अप्रतिष्ठा केल्याचा आरोप स्कुटिना यांच्यावर होता. त्याची पार्श्वभूमी अशी : दिग्दर्शक ओल्डरिच लिप्सकी यांनी चेकोस्लोव्हाक–युगोस्लाव्ह सहकार्याने ' दि स्टार गोज साऊथ ' नावाचा रंगीत चित्रपट तयार केला. स्कुटिना त्याच्या पटकथा लेखकांपैकी एक होते. चित्रपट तयार झाल्यानंतर आठ वर्षांनी तो प्रदर्शित करण्याची परवानगी मिळाली. दरम्यान नोव्होट्नी राजवट व टिटो यांचे संबंध पुन: बिघडून टिटोस ' सुधारणावादी' ठरविण्यात आले होते. सुधारणावादाचे स्वरूप व तो का टाळला पाहिजे यासंबंधी प्रदीर्घ व्याख्यान प्रागच्या संस्कृती व विश्रांती उद्यानात भरलेल्या एका परिषदेत नोव्होट्नी यांनी दिले. त्यात या चित्रपटाचा उल्लेख करून ते म्हणाले, " ओल्डरिच लिप्सकी व व्हलाडिमिर स्कुटिना यांच्यासारखे चित्रपट निर्मातेसुद्धा, ' दि स्टार गोज साऊथ' या आपल्या चित्रपटात युगोस्लाव्ह सुधारणावाद्यांच्या सर्वसमावेशक प्रवृत्तीस बळी पडले आहेत. "

नोव्होट्नी यांनी हे मत प्रदर्शित केल्यानंतर चित्रपटास अर्थातच बंदी करण्यात आली. त्या वेळी फिल्म क्लब व इतर अनेक सार्वजनिक ठिकाणी केलेल्या भाषणात

स्कुटिना म्हणाले, " नोव्होट्नी प्रजासत्ताकाचे अध्यक्ष असले तरी आपणास न समजणाऱ्या गोष्टींबद्दल त्यांनी बोलू नये."

स्कुटिना हा दुर्दैवी चित्रपट विसरूनही गेले होते. पण दोन वर्षांनी म्हणजे १९६१ मध्ये एक दिवस त्यांना पोलिस ठाण्यावर बोलावून प्रजासत्ताकाच्या अध्यक्षांची अप्रतिष्ठा केल्याचा आरोप ठेवण्यात आला. अशी काही अप्रतिष्ठा आपण केल्याचे माहीत नाही असे स्कुटिना यांनी सांगताच त्यांचा जाब-जबाब घेणाऱ्या तरुण व उत्साही पोलिसाने एका गुप्त फायलीतील एक कागद वाचून दाखविला. " प्रजासत्ताकाचे अध्यक्ष अँन्टोनिन नोव्होट्नी जुलमी, ठक व गाढव आहेत " असे उद्गार स्कुटिना यांनी काढल्याचा वृत्तांत त्यात होता.

हा वृत्तांत कोणी दिला असे स्कुटिना यांनी विचारताच पोलीस म्हणाला, " ते सरकारी गुपित आहे. सरकारला माहिती देणारांना पोलिस संरक्षण देतात. जाबजबाब घेणाऱ्या पोलिसास बरेच छेडल्यावर आरोपातील 'गाढव' शब्द सोडून बाकी सर्व शब्द त्यान मागे घेतले. पण 'गाढव' शब्द उच्चारल्याचाही स्कुटिना यांनी इन्कार केला.

डिसेंबर १९६१ मध्ये खटला प्राग जिल्हा न्यायालयापुढे दोनदा सुनावणीसाठी आला. मुख्य न्यायमूर्ती एक स्त्री होती. " प्रजासत्ताकाचे अध्यक्ष अँटोनिन नोव्होट्नी गाढव आहेत " असे शब्द आरोपीने उच्चारलेले नाहीत असे एकामागून एक अनेक साक्षीदारांनी शपथेवर सांगितले.

तिसरी सुनावणी १२ जानेवारी १९६२ ला झाली. या वेळी दोन साक्षीदार हजर होते. त्यांना स्कुटिना यांनी आयुष्यात पूर्वी कधी पाहिले नव्हते. त्यापैकी एक खेळाडू होता. घड्याळांचा चोरटा व्यापार केल्याबद्दल त्याला शिक्षा झाली होती व दुसरा त्याचा साथीदार होता. घड्याळांची विक्री केल्याबद्दल त्याला शिक्षा झाली होती. आरोपी स्कुटिना यांनी आक्षेपार्ह उद्गार काढल्याचे आम्हाला प्रत्यक्ष आठवत नाही. पण त्यांनी तसे उद्गार काढले असणे अगदी शक्य आहे असे या दोन साक्षीदारांनी सांगितले. या साक्षींच्या आधारावर कोर्टाने स्कुटिना यांना सहा महिन्यांची शिक्षा केली. नंतर असे निदर्शनास आले की स्कुटिना यांनी ज्या भाषणात आक्षेपार्ह उद्गार काढल्याचा आरोप आहे ते भाषण त्यांनी केले त्या वेळी वरील दोन्ही साक्षीदार तुरुंगात शिक्षा भोगीत होते. म्हणजे त्यांनी ते भाषण ऐकलेलेच नव्हते.

याच सुमारास खटल्यात स्कुटिनांच्या बाजूने साक्ष देणारे काही मित्र त्यांना भेटले. त्या सबंध प्रकरणावर त्यानी चर्चा केली. " प्रजासत्ताकाचे अध्यक्ष अँटोनिन नोव्होट्नी गाढव आहेत " असे आपण कधीच म्हटले नसल्याचे पुन: एकदा सांगून स्कुटिना म्हणाले, " पण तसे म्हटल्याबद्दल मला शिक्षा झालेली आहे आणि

# महत्त्वाचे टप्पे

रशिया : चेकोस्लोव्हाकिया संघर्षाचे स्वरूप स्पष्ट होण्यासाठी त्याची थोडी पार्श्वभूमी व इतिहासातील महत्त्वाचे टप्पे लक्षात घेतले पाहिजेत.

१९१८ : ऑस्ट्रो–हंगेरियन साम्राज्याच्या विनाशातून थॉमस मसारिक यांनी चेकोस्लोव्हाक प्रजासत्ताकाची स्थापना केली.

१९३७ : मसारिक यांचे निधन. बेनेस अध्यक्ष.

१९३८ : म्युनिक करार, पाश्चात्य राष्ट्रांनी हिटलरला चेकोस्लोव्हाकियाचे दान केले.

१९३९ : नाझी फौजांची प्रागवर चाल. सुडेटन लँड घतले. बेनेस लंडनला पळाले व तेथे त्यांनी निर्वासित सरकार स्थापले.

१९४६ : निवडणुका होऊन बेनेस अधिकारावर आले. (कम्युनिस्टांना ३५ टक्के ).

१९४८ : रशियाच्या पाठिंब्याने कम्युनिस्टांनी उठाव करून सर्व सत्ता आपल्या हाती घेतली.

१९५६ : स्टालिनवाद्यांची हकालपट्टी करण्याच्या धोरणास चेक कम्युनिस्टांचा विरोध.

१९६७ जुल : चेक लेखक संघाने लखनस्वातंत्र्यासाठी चळवळ सुरू केली

नोव्हेंबर : लेखकांच्या चळवळीस विद्यार्थ्यांचा पाठिंबा.

१९६८ : जानेवारी : नेतेपदावरून स्टालिनवादी नोव्होट्नी दूर होऊन उदारमतवादी डुबचेक त्या जागी आले. त्यांनी नव्या सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला.

–मार्च : सेन्सॉर निर्बंध सैल.

–एप्रिल : नोव्होट्नी यांची पक्षातून हकालपट्टी. नव्या पचप्रसंगाची सुरुवात.

–मे : चेकोस्लोव्हाक सीमेजवळ रशियन व पोलिश सेनेची संचलने. कोसिजिन यांची प्रागला भेट. चेकोस्लोव्हाक प्रदेशात वॉर्सा राष्ट्रांच्या फौजांनी संचलने करण्यास डुबचेकनी मान्यता द्यावी यासाठी त्यांचे मन वळविले.

–जून : संचलने झाल्यानंतर रशियाने फौजा ठरल्याप्रमाणे काढून घेतल्या नाहीत.

–जुलै : रशिया, पूर्व जर्मनी, पोलंड, हंगेरी व बल्गेरियाच्या कम्युनिस्ट पक्षांचे वॉर्सा बैठकीनंतर चेकोस्लोव्हाकियास पत्र. चेक सुधारणांचा निषेध, सुधारणा चालू ठेवण्याचा डुबचेक यांचा निर्धार.

–ऑगस्ट : सिओर्ना येथे चेक व रशियन नेत्यांच्या वाटाघाटी. डुबचेक यांच्या सुधारणा कायम. रशियाने नमते घतले.

–ब्राटिस्लाव्हा येथे रशिया व पूर्व युरोपच्या कम्युनिस्ट नेत्यांची बैठक. सिओर्ना येथील निर्णयांना मान्यता.

दि. २१ : रशिया, पूर्व जर्मनी, पोलंड, हंगेरी व बल्गेरियाच्या फौजांचे चेकोस्लोव्हाकियात आक्रमण.

माझे देणे मी एक प्रकारे आगाऊच दिल असल्याने अध्यक्ष नोव्होट्नी गाढव आहेत असे मी आता मात्र म्हणतो."

खोलीत पन्नास लोक हजर होते. पण त्यापैकी कोणी संतापले नाही. कोणी स्कुटिना यांना जाब विचारला नाही. उलट त्यांच्या विधानाबद्दल सर्वांना थोडी सहानुभूतीच वाटलेली दिसली.

अमक्या ठिकाणी अमुक वेळी अध्यक्षाविषयी तुम्ही अप्रतिष्ठेचे उद्‌गार काढले, असे वरील घटनेचा उल्लेख करून जाबजबाब घेणाऱ्या अधिकाऱ्याने सांगताच स्कुटिनांनी ते कबूल केले. टेपरेकॉर्डर चालूच होता तो बंद करण्यात आला.

स्कुटिना यांना नंतर दोन दिवस कोठडीत ठेवले. तिसऱ्या दिवशी सकाळी वॉर्डर त्यांना पुन: कॅप्टनकडे घेऊन गेला. या वेळी टाइपरायटरशी एक स्त्री बसली होती. तिने कबुलीजबाबाचा कागद टाइप केला. त्यावर लागलीच सही कर किंवा तुला सही करायला कसे भाग पाडायचे हे मी पाहतो अशी धमकी कॅप्टनने दिली. स्कुटिना यांनी अखेर त्यावर सही केली. नंतर त्यांना पुन: कोठडीकडे पाठविले.

तीन जुलै १९६२ ला स्कुटिना यांना हातकड्या घालून ओव्होक्नी तर् येथील कोर्टात नेले. अध्यक्षांची अप्रतिष्ठा करण्याचा गुन्हा आरोपी स्कुटिनांकडून दोनदा झाला असल्याने मुख्य न्यायमूर्ती असलेल्या महिलेने त्यांना गंभीर गुन्हेगार ठरविले. नंतर विचारविनिमयासाठी कोर्टाचे काम स्थगित झाले. पण निकालपत्र एवढ्या झटपट तयार झाले की आरोपीस मुतारीकडे जाण्यालासुद्धा वेळ मिळाला नाही. निकालपत्र तीन पानांचे होते. ते आधीच तयार केलेले होते. दहा महिने कारावासाची व सहा महिने पॅरोलची शिक्षा त्यांना झाली. तुरुंगात मणी ओवण्याचे काम त्यांना देण्यात आले.

तळघराच्या एका कोठडीस 'करेक्शन' कोठडी असे म्हटले जाई. कैद्यांना वठणीवर आणण्यासाठी येथे पाठवीत. तीन दिवसांतून फक्त एकदा अन्न मिळे. एखाद्या कैद्याने ठराविक संख्येपेक्षा कमी मणी ओवले तर त्याला या कोठडीत पाठवीत. अर्धी शिक्षा भोगल्यानंतर पॅरोलवर सोडावे अशी तरतूद कायद्यात होती. स्कुटिना यांनी त्यासाठी अर्ज केला. पूर्ण शिक्षेची मुदत संपली तरी त्याला उत्तर मिळाले नाही. नऊ मे १९६२ ला राजकीय कैद्यांना शिक्षेत सूट जाहीर करण्यात आली. ती स्कुटिना यांनाही लागू होती. पण सूट दिलेले सहा महिने कसे मोजायचे यावरच घोळ घालण्यात आला. आणि अखेर सूट पहिल्या सहा महिन्यांत लागू होते, असा निर्णय देण्यात आला. एवढी शिक्षा स्कुटिना यांनी आधीच भोगलेली होती त्यामुळे सवलत मिळाली नाही व बाकीची दहा महिन्यांची शिक्षा संपल्यावरच ते मुक्त झाले. ○

[ मुखपृष्ठ व पृष्ठ तीन यावरील व्यंगचित्रे
साप्ताहिक टाईमवरून घेतलेली आहेत. ]

# दोन जगे



अमेरिकेतील मिशिगन प्रांतराज्याचे गव्हर्नर आणि आगामी अमेरिकन अध्यक्षपदाचे इच्छुक जॉर्ज टॉम्बे काही दिवसांपूर्वी भारतात येऊन गेले तेव्हा आजच्या आर्थिक विषमतेमुळे जगाची कशी दोन शकले झाली आहेत व हे विभाजन दूर करण्यासाठी काय करावयाला हवे याबद्दल त्यांचे विचार ऐकायला मिळाले. "आजच्या जगाचे सधन आणि निर्धन असे दोन विभाग झाले आहेत, आणि या दोन विभागांच्या विकासातील तफावत वाढत आहे. याचे कारण पुढारलेले व सधन देश या कामासाठी पुरेशी कार्य-शक्ती खर्च करीत नाहीत" 'समृद्धीच्या बेटां'ना 'भोवतालच्या निर्धनतेच्या समुद्रा'ची जाणीव करून देणे हे (अमेरिकेच्या) परदेशी धोरणाचे एक प्रमुख अंग झाले पाहिजे. या दोन जगांतील खाई बुजविण्याचा मार्ग म्हणजे खासगी उद्योगधंद्यांना उत्तेजन देणे–हा मार्ग अजून अमेरिकन सरकारला सुचलेला नाही हे आश्चर्याचे आहे. खासगी उद्योग-धंदा "अमेरिकन अर्थव्यवस्थेचा आत्मा आहे," पण "तो आंतरराष्ट्रीय विकासासाठी आपली जबाबदारी पार पाडीत नाही. मागासलेल्या देशांना अधिकाधिक भांडवलाची अत्यंत गरज आहे. परंतु सरकारी भांडवल भरपूर मिळू शकत नाही व त्याचा उपयोगही संपूर्णपणे योग्य तसाच होईल असे नाही." "सरकारी मदतही खासगी भांडवलदाराला पूरक अशी असावी; उलट हल्ली ती खासगी भांडवलापेक्षा चौपट मोठी आहे. हे प्रमाण उलट असावयाला हवे." "खासगी विकासावरचा अमेरिकेचा विश्वास तो हाच का ?" सर्व देशांच्या सरकारांनी खासगी भांडवलाच्या गुंतवणुकीला योग्य असे वातावरण तयार करण्याच्या कामी सहकार्य केले पाहिजे. कारण जेव्हा भांडवल इकडून तिकडे जाते तेव्हा त्याच्या बरोबर तांत्रिक कौशल्यही जाते. ही 'विकासातली भागीदारी' आहे.

सर्वच जगाप्रमाणे प्रत्यक्ष अमेरिकेतही 'हॅव्' आणि 'हॅव् नॉट' अशी विभागणी झाली आहे. या दुसऱ्या प्रकारात मोडणारा एक वर्ग म्हणजे 'हिप्पी.' त्यांच्या आई-वडिलांनी त्यांना समाजाची मूलभूत मूल्ये समजावून न सांगितल्याने त्यांची समाजाशी फारकत झाली आहे. विस्कळित झालेली कुटुंब-व्यवस्था ही आजच्या अमेरिकन समाजाची सर्वांत मोठी दुर्बलता आहे. अमेरिकेतच ज्यांना मदतीची आवश्यकता आहे असे आणखी पददलित वर्ग म्हणजे सार्वत्रिक अल्पसंख्याक (निग्रो) व 'स्लम' निवासी. अमेरिकेतील या समाजाच्या वस्त्या इतक्या घाणेरड्या आहेत. त्यांची तुलना मध्यपूर्वेतील निर्वासित शिबिरांशी किंवा दिल्लीत जुन्या मशिदीच्या भोवतालच्या वस्तीशी करावी लागेल. "समाजाचा हा परावलंबी वर्ग आणि सधन वर्ग यांच्यांत सशस्त्र मुकाबला होण्याचे भय दिवसेंदिवस वाढत आहे." –समीर

MANOOS (Weekly) : 40 Paise ; Regd. No. MH-649


## तीन बोलक्या घटना....

- १९३९ मध्ये स्टॅलिनने पोलंडवर हल्ला चढविला.
- १९५६ मध्ये ख्रुश्चेव्हने हंगेरीचा आवाज बंद पाडला.

आणि आता

- १९६८ मध्ये कोसिजिनने चेकोस्लोव्हाकियात रणगाडे घुसविले.

समाजवादाच्या नावाखाली साम्राज्यवादाचा आविष्कार घडविणाऱ्या कम्युनिस्ट रशियाच्या मूलप्रेरणांचा मागोवा

# व्होल्गा जेव्हा लाल होते

| लेखक | प्रस्तावना | मूल्य |
| --- | --- | --- |
| वि. स. वाळिंबे | ना. ग. गोरे | सोळा रुपये |

**लवकरच प्रसिद्ध होत आहे**

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.